काळ अंकास ........ ....

Single copy ... ... ...

नोटिशी बद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस .... ०।०६
दुसरे खेपेस .... .... ०।

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs.
Per line over 10 ... 4 as.
Repetition Per line 3 as.

VOL XXIX AKOLA MONDY 1 JULAY 1895 NO 25

वर्ष २९ आकोला सोमवार तारीख १ माहे जूलै सन १८९५ इ० अंक २५

ESTABLISHED IN 1880.

HEALTH REGAINED AND STRENGTH MAINTAINED.

जी. बा. नाईक कंपनीच्या

जग प्रसिद्ध गुणावह.

विजेच्या आंगठ्या, पुतळया, कडीं, लेखण्या व गळपट्टेवगैरे

प्रत्येक वस्तुवर G. B. N. मार्क पाहून घेत ना. खोटा माल घेऊन फसू नका.

११०००० वर वि-
कल्या, रोज पुष्कळ
खपत आहेत.



गुण आल्याचे हजारों
दाखले मिळाले आहेत
व नित्य मिळतात

रक्त हें मनुष्याचें जीवित आहे व विद्युल्लता रक्ताचें जीवन आहे




रक्त खराब असल्यामुळें होणारे सर्व रोग अशक्तपणा, संधिवायु, शिरागतवायु, पोटांत वायु धरणें फेंपरें, हातपाय गळून जाणें, स्त्रियांचे बाळंतरोग वगैरे काळजाचे दर्द, सर्व पकारचे ज्वर, अर्धांशीशी, मस्तकशूल, मलावरोध, छातींत जळणें व दुखणें गळा सुजणें, सर्व प्रकारच्या मुळव्याधी. पाठींतील अशक्तपणा निद्रा न लागणें, मूत्राशयांतील रोग, खोकला, दमागनकर्णी, त्वचेचे विकार, मेह व इतर रोग, हे ह्या वस्तु वापरल्यानें बरे होतात, हें जगत्प्रसिद्ध आहे. गळपट्टा—लहान मुलांचे दंतोत्पत्तिसमयीं होणारे रोग शमन होऊन सुळे निर्विघ्नपणानें निघतात. लेखणी—हातास कांपरें व स्मरणशक्ति, अशा ह्या उत्तम, गुणकारी, सर्व रोग शमविणाऱ्या, अंगावर सुशोभित दिसणाऱ्या, औषधी खटपट चुकविणाऱ्या वस्तूंच्या संग्रहावांचून राहूं नका.

सर्व इस्पितळांमध्यें विजेचा प्रयोग रोग्यांवर करितात, व ज्या मनुष्याच्या अंगांत शुद्ध रक्त नाहीं त्या मनुष्यावर विजेचा प्रयोग केलेला पुष्कळांनीं पाहिला असेल. व त्यापासून रोगी बरे झाले आहेत. त्याबद्दल हजारों डाक्टर साक्ष देतील.

विजेच्या वस्तूची किंमत.

| | | |
|---|---|---|
| पितळी आंगठीस किं. रु. १॥ | पुतळीस किं. रु. १। | धातूचे कड्यास किं. रु. १॥ |
| चांदीचे आंगठीस किं. रु. ३ | धा. पुतळीस किं. रु. २ | धातूचे लेखणीस किं. रु. १॥ |
| सोन्याचे आंगठीस किं. रु. २० | सो. पुतळीस किं. रु. २२ | रेशमी गळपटा किं. रु. १॥ |

केबर पट्टा किं. रु. ६

एकदम बारा नग घेणारास एक नग जास्त मिळेल. रोख दाम आल्यास किंवा व्ही. पी. पार्सलनें मागविल्यास पाठवून देऊं. आंगठी करितां बोटाचें माप पाठवीत असावें पत्ता असावा. अनेक रोगांवर गुण आल्याचे डाक्टर, वैद्य, पत्रकर्ते, राजेरजवाडे वगैरे सद्गृहस्थांचे हजारों दाखले व विशेष माहितीचे, व एजंट व्यापारी दराचे पुस्तकाकरितां अर्धा आणा पाठवा, किंवा तें पुस्तक माला बरोबर फुकट पाठवूं. १ पासून ६ पर्यंत ट. ह. ६ आणे बंगी करणावळ माफ.

G. B. Naik and Company
Byculla Bombay

जी. बी. नाईक आणि कंपनी.

मुंबई, भायखळा जुन्या दावणी समोर; व पुणें, रविवार पेठ नं० ६०

## जाहिर खबर

बाहेर गांवच्या सर्व व्यापारी लोकांस कळविण्यांत येतें कीं; आमची पेढी मुंबईत फार दिवसांपासून चालू असून आह्मी पुष्कळ फायद्यानें माल खरेदी करून पाठवित असतों. ज्या व्यापारी लोकांस भुसारी, कापड, फरनीचरचें जातीचें सामान, लांकुड, लोखंड, किराणा, हॉडवर ( चुका, स्क्रू वगैरे ) स्टेशनरी व ग्यासलेट वगैरे कोणत्याही जातीचा माल मागणें झाल्यास आह्मी पुष्कळ फायद्यानें आणि कमेशीनें व त्वरित पाठवूं. एक वेळ माल मागविल्यावर खात्री होईल. आमच्या कामिशनचा भावही फारच कमी ह्मणजे शेंकडा एक टक्या प्रमाणें आहे. माल मागविणें तो व्ह्याल्यू पेबलनें अगर आगाऊ रुपये पाठवुन मागवावा. पण व्ह्याल्यू पेबलनें माल मागविणारांनीं शेंकडा २५ रुपये प्रमाणें रक्कम आगाऊ पाठविली पाहिजे. ज्या लोकांस माल मागविणें असेल त्यांनीं खालील पत्त्यावर आपलें नांव, गांव, स्टेशन वगैरे स्पष्ट खुलासेवार लिहून पत्रव्यवहार करावा. पत्रें पोस्टपेड पाठवावीं व उत्तराकरितां टिकीट पाठवावें.

तईयब अली मुलावली भाई.

मच्छी बाजार, अबदुल रहिमान स्ट्रीट. मुंबई.

वऱ्हाडसमाचार

मिती आषाढ शुद्ध ९ शके १८१७

## झांशीची राणी.

२३. लक्ष्मीबाईसाहेबांचे भ्रतार जनाने असल्याबद्दल जो लोकांत समज आहे तो 'बनिन्नस' खोटा आहे असें ग्रंथकारानें ठरविलें आहे. तो खोटा कां यांस ग्रंथकारानें मोठीं नामीं कारणें दिलीं आहेत ! ते ह्मणतात "स्त्री शौर्यगुणामध्यें प्रसिद्ध झाली कीं तिच्या नवऱ्याच्या अंगीं पाणी नव्हतें किंवा मर्दपणाचा अभाव होता असें लोकांचे उद्गार निघावे. हें साहजिक आहे" लक्ष्मीबाई साहेब शौर्यगुणामध्यें पतिमरणा नंतरच प्रसिद्धीस आल्याचें ग्रंथकर्त्यानें लिहिलें आहे; तेव्हां त्यांनीं दिलेलें कारण येथें लागूं पडत नाहीं. रेसिडेंट साहेबांनीं खुद्द गंगाधररावसाहेबांस त्यांचे तोंडावर या संबंधीं विचारिलें आहे. या वरून वाचकांच्या लक्षांत येईल कीं गंगाधरराव हयात असतांच ही गोष्ट लोकांस ठाऊक होती. व ती रेसिडेन्टाच्या कानीं जाऊन त्यांनीं ती प्रत्यक्ष महाराजांस त्यांच्या तोंडावर विचारावी आणि महाराजांनीं कांहीं तरी उत्तर देऊन विचारलेल्या प्रश्नाची उडवाउडवी करावी हें चमत्कारिक नाहीं काय ? या वेळीं महाराजांची सतेजवृत्ति कोणीकडे दडाली होती ? या हकीकतीवरून लोकांच्या ग्रहास बळकटी येत नाहीं काय ? तीर्थयात्रा प्रबंध या पुस्तकांत असाच मजकूर असल्याचें चरित्रकारांनीं लिहिलें आहे. "या मोठ्या संस्थानिकाची स्थिती व लोकरीतीहून कांहींसा वेगळाच आचार पाहून रघुनाथराव यांस आश्चर्य वाटलें." या पेक्षां एखाद्या ग्रंथकारानें ह्या संबंधी ज्यास्त खुलासेवार तें काय लिहावें ? चरित्रकारांनीं गंगाधररावावरील आरोप उडविण्याचा जो शुष्क प्रयत्न केला आहे त्यावरून तो नाहींसा न होतां उलट त्यास द्विगुणित बळकटी आली आहे. चरित्रकारानें ज्या श्लोकानें ही हकीकत दिली आहे त्यावरून त्यांचाही ग्रह लोकांच्या प्रमाणेंच असावा असें दिसतें.

२४ झांशी संस्थान खालसा झाल्याचा ठराव मेजर एलिस साहेबांनीं लक्ष्मीबाईसाहेबांस वांचून दाखविला त्यावेळीं त्यांच्या तोंडून "मेरा झांशी देऊंगा नही" असे निघालेले उद्गार "करुणोद्गार" होते असें आह्मास वाटत नाहीं. ह्याच संबंधी चरित्रकारानें टीप देऊन इंग्रजी उतारा दिला आहे त्यांत ह्मटल्या प्रमाणें ह्या शद्बांत विशेष अर्थ होता असें जरी नाहीं तरी एखाद्या तेजस्वी माणसाचा आशाभंग झाला असतां त्याच्या अंगीं आवेश येतो. अशा आवेश भरांत हे शद्ब उच्चारले गेले असें लक्ष्मीबाईच्या एकंदर स्वभावावरून दिसून येते. त्या किती बाणेदार वृत्तीच्या होत्या हें पाहणें झाल्यास त्यांनीं नथेखाला दिलेला जबाब वांचून पहावा शिवाय त्यांच्याकडून इंग्रजसरकारास जे खलितें गेले आहेत त्यांतही एक प्रकारें स्वाभिमान दिसून येत असून बाईसाहेबांची स्वातंत्र्यप्रियवृत्ति व्यक्त होते. दत्तकास मंजुरी देणें ही मेहेरबानी नसून तहा प्रमाणें इंग्रजसरकारचें तें कर्तव्यकर्म होय अशी त्यांची समजूत होती.

२५ राणी लक्ष्मीबाईसाहेबांचें अंग प्रथम पासून बंडांत मुळींच नसतांना त्या एकाएकी त्यात कशा सामील झाल्या याबद्दल ग्रंथकारानें जो उडवा उडवीचा प्रकार केला आहे तो अगदीं ग्राह्य नाहीं आहे. झांशी संस्थान त्यांनी इंग्रजांकरितांच आपल्या ताब्यांत घेतलें होतें यावर जर आपण विश्वास ठेविला तर "तोरणा किल्ला बादशाहाच्याच हिता करितां मी आपल्या ताब्यांत घेतला आहे" असा शिवाजीनें विजापूर दरबारास पाठविलेल्या निरोपावर कां भरंवसा ठेऊं नये ! झांशीची राणी जरी बंडवाली ठरली तरी तिच्या विषयीं आमची पूज्यबुद्धि कमी न होतां उलटपक्षीं वर्धिष्णूच होते. आतां तिला बंडवाली ह्मणावें अथवा इंग्रजांस बंडवाले ह्मणावें याचें उत्तर ज्यानें त्यानें आपआपल्याशींच द्यावें ! राणीसाहेब बंडांत सामील नव्हती यास ग्रंथकारानें जीं कारणें दिलीं आहेत त्या विरुद्ध त्यांच्याच लेखांत भरपूर पुरावा असून इतर टीकाकारांनीं या विरुद्ध बरेंच लिहिलें असल्या मुळें अधिक विवेचन करून लांबलेला लेख ज्यास्त लांबवीत नाहीं.

२६ ह्या चरित्रांत परस्पर विरोधी विधानें पुष्कळ ठिकाणीं केलेलीं आढळतात; पण तीं विशेष महत्वाचीं नसल्यानें सोडून देऊं. राणी साहेब संबंधीं 'पडदा नशीन' हा शद्ब चरित्रकारानें इतक्या स्थळीं आणि इतक्या वेळां वापरला आहे कीं त्यावरून ही स्त्री ब्राह्मणी नसून मोंगलांच्या जनान खान्यांत राहणारी बिबी कीं, जीचें नख देखील सूर्यास दिसावयाचें नाहीं अशी असावी कीं काय असा भास होतो ! न्याय कारभार पहात असतां आपत्यतुल्य प्रजेच्याही नजरेस न पडावी ह्मणून ग्रंथकारानें तिला दरबारांतील एका एकांत कोठडींत कोंडून ठेविली आहे! पण दुसरीकडे पहावें तो अनेक प्रसंगीं तिच्या समोर लोक व लोकांसमोर तिस ठेविलें आहे!

२७ पति मरणा नंतर लक्ष्मी बाईची जी दिनचर्या चरित्रकारानें कथन केली आहे तिच्यापाशीं, रा. विनायक कोंडदेव ओकांनीं

अहिल्या बाईच्या दिनचर्येसंबंधीं केलेलें वर्णन वाचकांनीं ताडून पहावें अहिल्या बाईही तरुण असतांनाच तिचा नवरा मेला; तिलाही धन द्रव्याची उणीव नव्हती तिच्या हातीं पण राजसत्ता होती, असें असतांना आहिल्याबाईचें वर्तन वर्णन वाचून त्या माऊलीच्या ठिकाणीं सुलोचना दमयंती मंडोदरी सीता आदिकरून प्रसिद्ध साध्वी प्रमाणें भक्तिभाव उत्पन्न होतो आणि लक्ष्मीबाई संबंधीं वर्णन वाचून वरील प्रकाराच्या उलट प्रकार होतो. चरित्रकारानें आपल्या ऐटबाज भाषा सरणी प्रमाणें तिचीही वर्तनसरणी ऐटबाज बनविली आहे! आणि त्या वर्तनावरून त्या काळाच्या मानानें पाहतां, लक्ष्मी बाईचें वर्तन चंचल व रंगेल असावें असा मनाचा ग्रह होतो. घटकेंत पठाणी वेष घेणें; कांहीं वेळ मर्दानी पोषाख करणें आणि कांहीं वेळ जनानी पोषाखानें असणें या वर्तनावरून अथवा वर्णनावरून राणी साहेबांच्या वर्तनासंबंधी वाचकांनीं दुसरी काय कल्पना करावी? शिवाय चरित्रकारानें ह्मटलें आहेच कीं त्या वैभवाचा पूर्ण उपभोग घेणाऱ्या होत्या. हें वर्तन त्या काळाच्या मानानें पहातां विधवेस—त्यांतून ब्राह्मणा सारख्या उच्चतम वर्णाच्या विधवेस— साजेसें होतें काय? त्यांचे पति गंगाधररावही त्यांजवर "नाराज" असें ग्रंथकारानें लिहिलें आहे, मात्र नाराज होण्याचें कारण बाईसाहेबांची सतेजवृत्ति हें दिलें आहे. या एकंदर वर्णनावरून आणि अन्य नाजूक कारणावरून बाईसाहेबांचें वर्तन शुद्ध नव्हतें असा मनाचा ग्रह होतो; मग असा ग्रह होण्यास चरित्रकारांचें वर्णन सदोष असो अथवा बाईसाहेबांचें वर्तन तसें असो. आह्मी वर जो "वर्तन" शब्द उपयोगांत आणला आहे त्याचा विशिष्टच अर्थ वाचकांनीं घेतला पाहिजे असें नाहीं.

२८ चरित्रांत राणी साहेबासंबंधी जी हकीकत आली आहे तिजवरून बाईसाहेबांच्या अंगीं ( administrative power ) राज्यकारभार चालविण्याची शक्ति नव्हती असें दिसतें.

२९ राणीसाहेबासंबंधी आमच्या प्रथमच्या झालेल्या ग्रहांत काय पालट झाला आहे हें येथें सांगणें अवश्य आहे. राणी साहेबांचें वर्तन शुद्ध नव्हतें हा पूर्वीचा ग्रह चरित्रवाचनापासून नाहींसा झाला नसून त्याविषयीं पूर्वीचा निश्चितपणा जाऊन आतां संशयीपणा मात्र झाला आहे ह्मणजे खात्री पूर्वक तें सांगतां येत नाहीं. ती बंडवाली होती हा ग्रह कायम आहे. झांशी येथील इंग्रज बायका मुलांच्या कत्तलींत तिचें अंग खचित नसावें असें वाटतें. तथील बंडांत तिचें प्रधान अंग होतें हा ग्रह कायम आहे. ती ध्याड होती ह्या ग्रहाचा मागमूस नाहींसा होऊन तिच्या रणशूरते बद्दल साक्ष पटून ती वंदनीय झाली आहे. ती कृतघ्न नसून तिनें प्रथम योग्य तोच उपाय केला आणि अखेरही योग्य तोच उपाय केला. या वरून सदरहू चरित्रग्रंथानें आपली कामगिरी किती बजावली हें वाचकांनीं पहावें.

चरित्रांत आणखी एक दोन स्थलें गंभीर असून विशेष टीकेस पात्र आहेत; परंतु त्यावर टीका करणें सध्या सोडून देणें भाग पडलें आहे.

३० ह्या चरित्रांतील उपसंहारांत राणी साहेबांच्या स्वभावाचें वर्णन करणें हें ग्रंथकर्त्याचें कर्तव्य कर्म होतें तें त्यानें न केल्यामुळें ग्रंथ अपुरा राहिला आहे. चरित्रास झांशी संस्थानचा एक नकाशा दिला असतां तर बरें झालें असतें. तसेंच प्रत्येक प्रकरणांतील सार दिलें असतें तर अधिकच चांगलें होतें.

असो एकंदरींत पुस्तक वाचनीय व संग्रहणीय आहे. ज्यास घेण्याची शक्ति असेल त्यांनीं याची एक प्रत अवश्य संग्रहीं ठेवण्याबद्दल शिफारस करून प्रस्तुत टीका पुरी करितों.

———०———

गेल्या अंकीं कैलासवासी गोपाळ गणेश अगरकर यांच्या विषयीं लिहितांना आह्मी लिहिलें होतें कीं मुंबई युनिव्हर्सिटीची म. ए. परीक्षा सरकारी नोकरी संबधानें निव्वळ बहुमानाची बरलेली आहे. या विधानानें कित्येकांस नवल वाटलें. एम. ए. परीक्षा उतरण्यास दृढ व्यासंग, दीर्घ परिशीलन व तेलबुद्धि ही सामग्री लागत असते पण तिची मातबरी सरकारी चाकरींत समजली जावी तशी समजली जात नाहीं. मुंबई युनिव्हरसिटीची ही एम. ए. ची परीक्षा नुसती भूषणार्थ धरलेली आहे. वस्तुतः बी. ए. आणि एम. ए. या दोन पदव्यामध्यें फारसा फरक मानीत नाहींत. सरकारी नोकरी देतांना शाळाखातें खेरीज करून इतर सर्व खात्यांत जी बी. ए. ची योग्यता मानली जाते तीच एम्. ए. ची ही मानली जाते. शाळाखात्यांत मात्र एम्. ए. पास झालेल्या उमेदवारास मे० चाटफील्ड साहेब प्रथम जागा देतांना जरा अधिक पगाराची जागा देऊ करितात. सन १८७९ सालीं कै० वामन शिवराम आपटे यांस कल्याणास ७५ रुपये वेतनाचीच जागा मे० चाटफील्ड साहेब यांनीं देऊ केली. मि० आपटे यांचे एम्. ए. भाषाविषयांत दुसरे वर्गांत होऊन क्वचित मिळणारें भगवानदास पुरुषोत्तम प्राईस संस्कृत–भाषा नैपुण्याबद्दल त्यांस मिळालें असून ही त्यांची ही स्थिती! हें बक्षीस दरसाल संस्कृतचे उमेदवार एम्. ए. स बसत असून कै० प्रि० आपट्यांच्या मागें एकवार रा. रा. श्रीधर रामकृष्ण भांडारकर व एकवार कै० लक्ष्मण रामचंद्र वैद्य यांस सन १८७८ सालापासून मिळालें. नाहीं तर प्रति वर्षी तें उमेदवारांच्या नालायकीमुळें कोणासच मिळत नसतें. हल्लींचे रत्नागिरी हायस्कूलचे हेडमास्तर मि० दामोदर पंत केळकर यांस ही प्रथम जागा ६९ रुपयांचीच सतरा वर्षांपूर्वी एल्फिन्स्टन हायस्कुलांत लागली. मि. महादेव यशवंत ढोले यांस ते एम्. ए; एल्. सी. ई. असून ही पुण्याच्या हायस्कूलमध्यें सन १८८१ मध्यें ८० रुपयांचीच मूळ जागा मिळाली. सन १८७८ सालीं प्रो० जिन्सीवाले यांस एम्. ए. असूनही ८० रुपयांचीच बदलीची सवा वर्षभर जागा पुण्याच्या हायस्कुलांत दिली होती. त्याचप्रमाणें सुरत हायस्कूल मधील मि० वेल्स, हल्लींचे भावनगर कालेज मधील गणिताध्यापक प्रो० संजाना व इंजिनिअरिंग अगर पूर्णे कालेज आफ सायेन्स मधील गणिताचे गुरु अतिपूज्य व मान्य प्रो० फरदंजी मंचरजी दस्तूर यांसही प्रथम जागा सुमारें सतरा वर्षांपूर्वी ही ऐशीं ऐशीं रुपयाच्याच लागल्या. पुढेंही इतर पदवीधारां प्रमाणें त्यांना दिनाधिक्य व रिव्हेंचच्या तत्वावर बढती मिळत जाऊन त्यांच्यांत आणि इतर बी. ए. पदवी धरांत फारसा फरक केलेला नाहीं. मात्र मि० रामचंद्र हणमंत देशपांडे जे हल्लीं धारवाड जिल्ह्यांत डेपुटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर आहेत त्यांना मूळ जागा शंभर रुपये पगाराची मिळाली. परंतु हा अपवाद कानडी लोकांस उत्तेजन मिळावें ह्मणूनच झाला. नगर सोसाइटी स्कूलचे हेड मास्तर मि० रामभाऊ भागवत हेही एम्. ए. च आहेत, परंतु आज पंधरा वर्षें त्यांची नोकरी झाली असून ही त्यांचा पगार शाळा खात्याच्या पटावर अद्याप शंभर रुपयेच आहे. इतर खात्यांत इतपतही फरक नाहीं.

———•———

मोठ्या आनंदाची गोष्ट कीं मि. बद्रुद्दीन तय्यबजी बारिस्टर यांस मुंबई हायकोर्टाचे जज्ज नेमण्यांत आलें. नामदार न्यायमूर्ती बेली साहेब यांस चीफ जस्टिसची कायमची जागा न मिळाल्यामुळें त्यांनीं पेनशन घेतलें. नामदार फ्यारेन साहेब चीफ जस्टिस झाले आणि नामदार बेली पेनशनदार झाले या मुळें एका जज्जाची जागा रिकामी झाली. या जागीं नामदार बद्रुद्दीन तय्यबजी यांची निवड झाली हें पाहून सर्वत्र मुंबई सरकारचे धन्यवाद गाऊं लागले. मुंबई हायकोर्टांत दोन नेटिव न्यायाधीश नेमण्याचें तत्व सुरू झालें हा दुहेरी फायदा झाला. नामदार बद्रूद्दीन यांचें वय हल्लीं ५१ वर्षांचें आहे यांची विद्वत्ता मोठी असून कायद्यामध्यें यांच्या तोडीचा अन्य पंडित विरळा सांपडेल. हेच गृहस्थ तिसऱ्या राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष होते आणि त्या वेळचें त्यांचें भाषण अप्रतिम झालें. अलोकिक वक्तृत्व, उत्कृष्ट विचारसरणी व महत्वाचे राष्ट्रीय विषय यांच्या संमेलनानें तें भाषण आज मित्तीस लोकांच्या कानांत दुमदुमत आहे. राष्ट्रीय सभेचे मुख्य चालक कायदे कौंसिलांतून, सरकारी वरिष्ट हुद्यांच्या जागीं व इतर राजकीय व सामाजिक प्रकरणांत तेजस्वी हिऱ्या प्रमाणें चमकत आहेत हें पाहिल्या नंतर राष्ट्रीय सभेचा खरा राजनिष्टपणा, लोकहितवादित्व व सरकारापाशीं मंत्रिपणा, हीं स्पष्टपणें लक्षांत येतील. ईश्वर करो आणि नामदार न्यायमूर्ती बद्रुद्दीन तय्यबजी यांची कारकीर्द यशस्वी, वैभवशाली व लोकमान्य होवो!

———•———

चित्राळची लढाई संपण्याचा काळ नजिक येत चालला आहे. सर्व हकीकती वरून असें स्पष्ट होतें कीं चित्राळच्या स्वारीमध्यें इंग्रज सरकारची मुख्य आगळिक होती. राज्य विस्ताराचा हव्यास व छंद इतका लागला कीं हिंदुस्थानच्या कल्याणा विषयीं अनास्था व निष्काळजीपणा वाढला. हल्लीं राज्यतृष्णेनें इंग्रज सरकारास वेडावून टाकलें आहे पण या रण माजविण्याच्या पद्धतीनें नानाविधें संकटें इंडियन राष्ट्रावर ओढून आणलीं आहेत. कोट्यावधि रुपयांचा फन्ना पडला व पडत आहे. खजिन्यांत मूळचीच तूट होती. नवीन कर बसविण्याची सीमा होऊन गेली कां कीं लोक अधिकाधीक कंगाल होत आहेत. चित्राळ प्रकरणांत इंडिया सरकारच्या मोठ्या घातुक चुका झाल्या आणि चित्राळ हस्तगत करूनही त्या डोंगराळ देशाच्या राज्या पासून कांहीं फायदा होण्या सारखा नाहीं. सर आकलंड कालव्हिन, डेव्हिड बारबर, लिंपेल ग्रिफीन इत्यादि मुत्सद्यांनीं चित्राळ प्रांत सोडून देण्या विषयीं आपापले अभिप्राय प्रसिद्धही केले आणि स्टेट सेक्रेटरी मि० फौलर यांच्या मतानें ह्याच विचार पक्का ठरला. पण सांप्रत प्रधान मंडळ बदलत आहे त्यामुळें हा ठराव बदलतो कीं काय हें कांहींच कळत नाहीं.

———०———

लिबरल पक्षाचें प्रधान मंडळ बदललें. लार्ड सालिसबरी मुख्य प्रधान झाले आणि त्यांनीं स्वपक्षांतील लोकांच्या मुख्य मुख्य जागीं नेमणुका करण्यास प्रारंभ केला आहे. हल्लींचें पार्लमेंट लवकरच मोडून नवीन निवडणूक होणार आहे. या निवडणूकीच्या निकालावर इंडियाच्या हिताहिताच्या गोष्टी पुष्कळ अवलंबून आहेत. कानसरव्हेटिव किंवा लिबरल प्रधान मंडळ असलें तथापि तत्वतः हिंदुस्थानाला सारखेंच खरें. परंतु अनुभव असें सांगतो कीं लिबरल प्रधान मंडळ फार चांगलें! तूर्त चिन्हें तर निराळीं दिसतात तथापि आह्मी उमेद करितो कीं आमच्या देशाकरितां झटणारी सभासद मंडळी नव्या निवडानिवडींत बहुमतानें पार्लमेंटांत पुन्हा येतील.

## सरकारी चाकरी

मद्रासेस वार्षिक पदवीदानाचा समारंभ झाला तेव्हां चान्सेलर व गव्हरनर लार्ड वेनलाक बोलले कीं सरकारी चाकरींत सुशिक्षित विद्वान लोकांचा भरणा जसजसा होत गेला तसतसें त्या चाकरीचें स्वरूप उत्तम प्रकारें पालटत आहे. काम चोख व जलद होत असतें आणि सरकारी कामगिरींत एका प्रकारची वर्णनीय नीतिमत्ता प्रेरित झाली आहे. विद्वान सर्वत्र पूज्य होतो असें ह्मणण्यापेक्षां विद्वत्तेचा प्रभावच असा आहे कीं तिच्या समागमें सुधारणा, न्याय, व नीति हीं आपोआप घरीं चालून येतात. सरकारी चाकरी ह्मणजे एका प्रकारचा विश्वासानें समर्पिलेला ठेवा आहे. या चाकरीमध्यें सरकारची मर्जी संपादून प्रजेचें हित करण्याच्या गोष्टी पुष्कळ असतात. सरकारी चाकरमाणसें एका दृष्टीनें प्रजेचे ही नोकर आहेत ह्मणजे त्यांस प्रजाकल्याणाच्या गोष्टी करावयाच्या असतात. प्रजेशीच संबंध सगळा. या चाकरी मध्यें सरकारनें नेमून दिलेलें काम प्रजेच्या कल्याणासाठीं करावयाचें असतें. चाकर जितका प्रामाणिक, कार्यदक्ष, व विद्वान मिळेल त्या मानानें सरकारची कामगिरी आणि जनहित या दोन्ही गोष्टी एकाच ओघानें घडून येतात; परंतु जेव्हां चाकर कच्या पीराचा अविद्वान, नर्मवृत्तीचा, व लांचखाऊ असा असतो तेव्हां सरकारचें काम विघ्नरातांनीं नीटसें तडीस जात नाहीं आणि लोकांचें बहुत नुकसान होतें असें आपल्या प्रत्ययास अनेक वेळां आलेलें आहे. राज्यकारभाराची इमारत रमणीय व मनोहर उभारण्यासाठीं तिचे आधारस्तंभ जें चाकरमंडळ तें भक्कम, शोभादायक व यशस्कर असलें पाहिजे. चाकरमंडळानेंच सरकार बनलेलें असतें. सरकाराच्या

हातीं एका प्रकारची ईश्वरी सत्ता असते आणि या सत्तेचा दुरुपयोग होऊं नये ह्मणून सरकारी चाकरांनीं लबाडी, जुलुम, अन्याय, शोटिंगशाही हीं आपल्या अपक्रियांनीं प्रचलित न होण्यासाठीं खबरदारी घेतली पाहिजे. सरकारची संस्था पवित्र देवालया प्रमाणें शुद्ध व वंद्य राखण्यांत आली तरच सरकारी चाकरांनीं कर्तव्य बजावल्यासारखें होणार आहे. सरकारची ईश्वरी सत्ता मनुष्याच्या हातून अमलांत येत असते तेव्हां प्रत्येक सरकारी चाकराचीं मनें अशा प्रबुद्ध विचारांनीं संस्कृत असलीं पाहिजेत. आपापल्या चाकरीचीं पुण्य फळें ह्मणजे आपल्या दिलाची पूर्ण खातरी असली पाहिजे कीं, लोकहितासाठीं आपल्या चाकरीचा काल खर्चिला गेला आहे.

सरकारी चाकरीचे खरें महत्व पुष्कळांच्या लक्ष्यांत नसतें आणि तिची जबाबदारी पूर्णपणें ओळखून आपली कामगिरी बजावतात असे कामगार विरळा आढळतात. सरकारी कामाची तासीर अशी असते कीं बऱ्या वाईट रितीनें सरकारचा गाडा कसा तरी हांकला जातो. कोणीहि मनुष्य सरकार या संस्थेचा चालक असला तरी तिचें काम कांहीं अडून पडत नाहीं. ही संस्था इतक्या यंत्रांनीं मिळून बनलेली असते कीं सर्व चक्रें बरोबर फिरत आहेत तोंपर्यंत समाजाचें अस्तित्व कायम आहे. सरकारचें यंत्रालय इतकें बिकट आहे कीं उत्तम उत्तम नाणवलेले देखील कारागिर तेथें फसतात. उदाहरणार्थ, हिंदुस्थान सरकार हें मोठें वर्तुळ कल्पिलें तर प्रांतिक सरकारें हीं अंतर्गत उपवर्तुळें आहेत. आणि या सर्व वर्तुळांचा परस्पर संबंध परस्पर पोषक आहे. आणि या दृष्टीनें आमच्या प्रांतांतली सरकारी चाकरमंडळी दीर्घ वर्तुळाच्या अस्तित्वाला चिरायुत्व आणणारी आह्मास दिसत नाहीं. आमच्या लेखाचा विषय व्यक्तिनिर्देशपर नसून सर्वांस लागूं पडेल असा आहे.

## The Berar Samachar

MONDAY JULY,
1, 1895

Charities ought to be discrimi—native. This is a sound doctrine and its application to the Charitable dispensaries in Berar has shown some good results. None will deny the rightness of the argument that those who can pay should pay for the medical aid they recieve at the dispensaries in order that the really poor should receive medical relief in a greater measure. New rules have been introduced to realize the fees for medicines given at the dispensaries and it is gratifying to find that these rules have not affected the popularity of hospitals and have brought a big sum of Rs.1557—4—0. The real danger we apprehend is that the Government may not find in the increase of such fees a loop-hole to reduce its grants to the Charitable Dispensaries. Doctor Little thus reports in connection with the gratuitous medical treatment restricted to the poor:—

"The total income from this source during 1894 was Rs. 1577-4-0 as against Rs. 1,354-0-6 in 1893. These general results tend to show—

(*a*) that the rules in a measure reach those for whom they were designed;

(*b*) that nearly 20 *per cent.* of the total cost of Europe medicines were recovered by fees;

(*c*) that the attendence has not been in any way affected, proving the popularity of our dispensaries amongst the class for whom they were established;

(*d*) that these institutions are in reality what they were hitherto only in name, viz., "Charitable Dispensaries."

Doubtless there are some, as Surgeon-Major Roe observes, who resent having to pay for medical treatment on the grounds that they have contributed to the support of the dispensaries; but they seem to forget that these contributions were for a charitable purpose, and that it is not consistent with charity to expect any return for what they give, in this world at least.

If Government takes upon itself the duty of providing medical aid for the poor, it must also see that the rights of the private practitioner are not interfered with, and that gratutous relief is restricted to those who cannot afford to pay for it.

The medical schools are yearly turning out more men than Government can provide posts for, and those who have to earn their living as private practitioners will naturally complain that Government take their bread away if medical charity is permitted to the man who can pay for it."

---

The big officers of the Government often ridicule a person who goes to them for service. No wonder that they do so. They are beyond want and their position is certainly enviable. They preach the applicants the lesson of trade, manufacture or some other independent profession. We would however ask them why it is that they should cliam the privileges of Government service which they deprecate when others seek them. In an open competition between the Englishmen and the Natives we are afraid that the latter will put the former in the back-ground. We would request such officers to read the acute and searching remarks made by Major Evans Bell in his 'Indian Polity when he advocated that Natives should be admitted into Government service on a larger scale to the consequent benefit of the Exechequer and the efficient discharge of public duties:—

"But, speaking candidly, we all know that practically this has been of no avail, and that natives are deliberately and systematically excluded from numerous appointments for which they are perfectly competent, solely on account of their' "birth," "colour," and "religion." The greater number of appointments in the possession of the covenanted Civil Service, are still, probably for a very short time, secured to them by Act of Parliament, and no outsiders have yet been allowed to trespass on those preserves. I have nothing therefore to say on that score at present. But there are other departments to which military officers, and the |" uncovenatnted " of every race and colour, except the pure native have been admitted. No native has been placed in charge of a district in the Non—regulation Provinces,—the Punjab, Nagpore, or Mysore,—or even admitted into the list as a regular Assistant Commissioner. Though frequently invested with the same powers, and engaged in the same duties as the English officers, the native officials, with some of the less favoured of the uncovenant—ed, are always separately classified under some inferior designation, such as that of Extra Assistant, and thus kept out of promotion And thus in the Regulation Provinces there is a distinct list of Deputy C tors and Sudder Ameens, with subordinate functions, undefined rank and circumscribed prospects.

And if it were now to be proposed to make a native the Superintendent of a district in Mysore; or, at some future period, when the privileges of the close Civil Service are abolished, if there should be any rumour of a native being raised to the position of a Sessions Judge or of a Collector, no one who knows the traditional prejudices, the general tone and temper of the officials' class, can doubt that the strongest opposition would be offered, the most vigorous objections, made, not on account of want of qualifications, not on the ground of defects of character, but simply because the nominee was "a native." I wish to see this exclusive and insulting prejudice practically disavowed and abandoned as speedily as possible, before that pressure commences which destroys the grace and favour of concession. I am convinced that the question of the fair participation of the higher class of educated natives in the administration and government of India, will at no distant period, if it be neglected, become the question of the day, and will assume giant proportions."

Indian Polity.

---

"It will be seen that after meeting all charges for annuities and interest (including interest on capital expended on lines not opened for traffic ), charges for land for Companies' lines and miscellaneous expenditure on surveys, etc., the result of the year is a net charge to the State of Rx. 1.536,503. The traffic was considerably in excess of that of previous years, and the loss now brought out may be directly attributed to the unfavourable rate of exchange which obtained during the year. The interest and annuities paid in England amounted to £5,744, 313 which, at the exchange of 1s. 2.54664222*d*. the rupee, aggregated Rx. 9,477,341, the difference between this and the old par of exchange being no less than Rx. 3,733,028."

G. I

## वऱ्हाड

हवामान— एकंदर पाऊस सहा इंचावर झाला. आकाश साभ्र असतें. पण मधून मधून चांगली उघाडी होती. रोगराई ह्मणण्यासारखा विशेष नाहीं.

मे. हेअर साहेब डेपुटी कमिशनर वर्ग ३ यांस वर्ग २ ची बढती देण्यांत आली हें चांगलें झालें.

मि. इलियट साहेब सेशन जज्ज नेमिले गेल्या मुळें यवतमाळच्या डेपुटी कमिशनरच्या जागीं क्याप्टन ग्यारिट असि. डायरेक्टर, लाडरेकार्डस, यांस नेमण्यांत आलें

जळगांवचे तहशिलदार रा. रा. माधवराव आण्णाराव हे दोन महिन्यांच्या रजेवर या महिन्या पासून जाणार आहेत.

त्यांच्या रजेंत रा. रा. दामोदर नानाजी शिंदेकर क्लार्क आफ कार्ट, अकोला यांस जळगांवास तहशिलदार नेमण्यांत आलें हें कळविण्यास आनंद वाटतो.

वऱ्हाडचे पोस्टल सुपरिनटेंडंट मि. पुसी हे आज आपले कामाचा चार्ज देऊन अजमीरास नवीन बदलीच्या जागीं जात आहेत.

आणि अजमीरच सुपरिनटेंडंट मि. फर्थ यांची बदली वऱ्हाडांत झाली आहे. पण ते रुजूं होईपर्यंत रा. रा. आबाराव महादेव इनस्पेक्टर हे तूर्त सुपरिनटेंडंटचें काम पाहतील.

आकोला जिल्ह्यांत सार्वजनिक मिरवणुकी निघतांना हिंदु मुसलमानांचा तंटा होऊं नये ह्मणून मि. हेअर साहेब यांनीं मिरवणुकीचे परवाने घेण्याविषयी सर्व लोकांस जाहिरखबर दिली. ही वेळ मोहरमच्या सणाची आहे आणि आषाढी एकादशीचा योग आतांच आला आहे तेव्हां पंत, डोले, परी इत्यादिकांच्या व दिंड्या भजनांचे मेळे इत्यादिकांच्या सार्वजनिक मिरवणुकीच्या वेळीं दंगा होण्याचा संभवच राहूं नये ह्मणून परवाने देते वेळीं पोलिस सुपरिनटेंडंट यांनीं आगाऊ खबरदारी घ्यावी अशी योजना केली आहे. मिरवणुकीच्या वाटेंत जीं देवळें व मशिदी लागतील त्यांच्या समोर कशा रितीनें वागावें अशा विषयीं सक्त हुकूम फर्माविले जातील. ही व्यवस्था फार चांगली झाली आणि आह्मी उमेद बाळगतों कीं यंदाचा मोहरमचा सण मोठ्या आनंदानें बिनतक्रार सिद्धीस जाईल. मि० हेअर साहेबांच्या या खबरदारी बद्दल लोकांनीं यांचे फार आभार मानले पाहिजेत.

आकोला मुनसिपाल कामिटीची सभा गेल्या सोमवारीं भरली होती. या सभेस नवीन सरकारमार्फत नेमलेले व लोकांनीं निवडलेले सभासद आले होते. चालू साला करितां नवीन प्रधानमंडळ नेमण्यात आलें. त्यांत मे. हेअर साहेब प्रेसिडेंट, मेसर्स आयव्हर्स व पटवर्धन व्हाइस चेअरमन; व मेसर्स साठे व काळे सेक्रेटरी असे मुख्य अधिकारी नेमण्यात आले. आरंभीं राव साहेब देवराव विनायक यांनीं आपल्या प्रकृतीच्या अस्वस्थते मुळें व्हाइस चेअरमनचे जागेचा दिलेला राजिनामा नमूद करण्यांत आला. राव साहेब देवराव विनायक यांच्या पूर्वीच्या उत्कृष्ट, परोपकारबुद्धीच्या व सार्वजनिक कार्यमालेचा उल्लेख करून त्यांची बहुत प्रशंसा केली व कृतज्ञतेनें त्यांचें अभिनंदन करून त्यास थोडा विसावा देण्यासाठीं राजिनामा मंजूर केल्या विषयीं कमिटीनें ठराव केला. राव साहेबांनीं सभेच्या अखेरीस जमलेल्या मंडळीस चार हितबोधाच्या व स्वानुभवाच्या उपदेशपर गोष्टी सांगितल्या आणि सार्वजनिक कार्यांत लोकसेवा करण्यास कसें लागावें हें स्पष्ट करून दाखविलें.

परवां रात्रीं 'करुणेश प्रासादिक' वाशिमकर नाटकार मंडळीनें विक्रम शशीकलेचा संगीत प्रयोग करून दाखविला. खेळ चांगला झाला. शशिकलेचें व विदुषकाचें काम उत्कृष्ट वठलें.

## वर्तमानसार.

दिनापूरच्या छावणींत गोऱ्या सोजरांस वारा घालण्याकरतां असलेला एक नेटिव पंखेवाला भिंतीजवळ बसून भिंतीस टेकून पंखा ओढीत असतां पंखा ओढणें बंद झालें. अर्थात एक सोजीर पंखा कां बंद झाला हें पहाण्यास आला तों पंखेवाला भिंतीस टेकून स्वस्थ बसला आहे असें त्यांस आढळलें. सोजरानें मोठ्या दयाळूपणानें पंखेवाल्यास आपल्या बुटाची एक लाथ मारली आणि त्यामुळें तो पंखेवाला त्या पवित्र लत्ताप्रहारानें कैलासवाशी झाला.

अंबाल्याचा पोस्टमास्तर बैरन व त्याचे मुलेग यांच्या शिकारींत जे नेटिव मेले ते कैलासास गेले असें ठरून बैरन साहेब निर्दोषी ठरून सुटले. पंजाबच्या चिफ कोर्टानें ही मोठीच कामगिरी बजावली ह्मणावयाची.

इंडियन एम्पायर ह्मणून जें एक प्रदर्शन होणार आहे त्यांत हिंदुस्थानांतल्या जंगलाचा देखावा आंतील पशुपक्षी व शिकार यांच्यासह दाखविण्यांत येणार आहे.

अमिरानें उमराखानास कैद केलें व त्याणें बाजोरहून आणलेली मालमिळकत जप्त करून खालसा केली.

इंडियन पीनलकोडांत दुरुस्ती करण्यास स्टेट सेक्रेटरीची मंजुरी मिळाली.

फोर्मोसा बेटांत तेथील लोकांचा इंग्रजांशीं तन्टा होण्याचा रंग आहे.

पंजाबचे गहूं सिंधप्रांतांत फार जाऊं लागले आहेत.

निझामसरकारचे हिशेबी सेक्रेटरी मौलवी चिराघअली हे मागच्या शनवारीं मरण पावले.

१८९२।९३ सालीं बंगाल इलाख्यांतील २,८०० एकर जमिनींतलें जंगल वणवा लागून जळालें व १८९३।९४ सालीं ७२,६०० एकरांतलें जळालें.

सिमल्याचे तेलो फार नफा घेतात याकरतां तेथें कोणी तेल काढण्याची गिरणी चालु करील तर फायदेशीर होईल अशी तेथील इंग्रजांची ओरड आहे.

मध्यआफ्रिकेंत कोंगो संस्थान व माधीची फौज यांची एक मोठी लढाई झाली व माधीची फौज माघारी आली.

इटालीसरकार थोड्याच दिवसांत अबिसीनियावर चाल करून जाणार आहे व इटालीपासून आपचा बचाव करण्याकरतां आह्मास मदत करा अशी अबिसीनियाच्या राजानें रशियाच्या बादशहास विनंती केली आहे.

काबूलचा अमीर थोड्या दिवसांकरतां जलालाबादेस गेला आहे. अ.

सगळ्या जगांत मोठे असे पुतळे— अफगाण देशांतील सरहद्द ठरविण्यास नेमलेल्या कमिशनरांना मध्य आशियांतील बामिअन शहरानजीक सगळ्या जगांत अत्यंत प्रचंड असा पुतळा आढळला. त्यांना एका प्रचंड पहाडांत कांहीं विलक्षण लेणी आढळलीं. या लेण्यांत किती तरी वांकडे तिकडे मार्ग आणि किती तरी वळणें. येथें कोणी तरी आतां ज्यांचा वंश अगदीं नष्ट झाला आहे असे लोक रहात असावेत.

हीं लेणीं कोसानुकोस लांब असून त्यांनीं संबंध पहाड व्यापिला आहे. पहाडाच्या अगदीं मध्यावर अगदीं केवळ दगडांत कोरलेला असा सुमारें १७३ फूट उंचीचा पुतळा दिसला. दिसला. हा तेथल्या रहिवाशांच्या देवाचा असावा हें खास. त्याच प्रांताच्या आसपास दुसरा एक तसाच १२० फूट उंचीचा पुतळा आहे. यांच्याशीं तुलना करून पहातां इंग्लिसमधला ९१ फूट उंचीचा मेम्नचा पुतळा व अमेरिकेंतील १०५ फूट उंचीचा स्वतंत्रता देवीचा पुतळा, हीं अगदीं तुच्छ होत असें वाटूं लागतें.

सौंदर्याच्या कल्पना.

बायका सुंदर असाव्या असें ज्यांना त्यांना वाटतें; आणि बायकांनाही आपण सुंदर दिसावें असें वाटतें. नैसर्गिक सौंदर्य असलें, तरी तें त्यास किंवा पुरुषांस पुरें वाटत नाहीं, त्यांत कांहीं कृतीची भर घालण्याची इच्छा व खटपट असते. मग नैसर्गिक सौंदर्य नसल्यावर कृतीची भर पुष्कळ पडेल यांत नवल काय? कृत्रिम सौंदर्य आणण्याकरितां भिन्न भिन्न लोकांचे कसकसे प्रयत्न चालतात ते पहा:—

अरबस्थानांत बायका हातापायांच्या बोटांना मेंदी लावून तीं तांबडीं करितात. भिवयांना काळा रंग देतात व ओंठाना निळा रंग देतात!

इराणांत डोळ्यांभोंवतीं एक काळीं वर्तुलाकार पट्टा ओढतात व तोंडावर चित्रें काढितात!

जपानी बायका आपल्या दातांस गिलीट करून घेतात. व तांबड्या इंडिअन आपले दांत तांबडवितात.

हिंदुस्थानांत नाक, कान टोंचून दागिने चढाविणें, गोंदणें, मेंदी लावणें व केंव्हां केंव्हां दांतवण लावणें अगर दांतांनाही तांबडा रंग देणें हीं कृत्रिम सौंदर्य आणण्याचीं मुख्य साधनें होत.

ग्रीनलंडमधील बायका तोंडाला हिरवा, पिवळा रंग लावतात. रंगिवलेला दोरा कातडीच्याखालीं टोंचून ठेवून मग कांहीं दिवसांनीं काढतात ह्मणजे छापदार गोंदणें होतें.

न्यूझीलंडांत शिपाई अंगावर जखमा करून घेऊन त्यांचे चांगले वण राहतील असें करितात. ते वण ह्मणजे त्यांत भूषणें वाटतात. शिवाय ते आपलीं नखें इतकीं लांब वाढवितात कीं, त्यांना इजा होऊं नये ह्मणून मग बांबूचीं टोपणें करावीं लागतात.

आफ्रिकन सुंदरी ह्मणजे तिचें नाक अगदीं बसलेलें, ओंठ भयंकर जाड, डोळे अगदीं बारीक, आणि कातडीं अगदीं काळीं कुळकुळीत असलीं पाहिजे.

रोज सकाळीं पहांटेस उठून जर नियमितपणें कांहीं वेळ गात बसलें तर त्यापसून शरीराला व्यायाम चांगलाच होतो. गाण्याच्या व्यायामासारखा दुसरा व्यायाम नाहीं. कारण गाण्यानें श्वासोच्छास पुष्कळ होतो. व श्वासानें जाणाऱ्या हवेची गति कंपित होते त्यामुळें फुफ्फुसांला व्यायाम मिळतो आणि त्या योगानें रुधिराभिसरण वृद्धि पासून इंद्रियें सबळ होतात आणि श्वासोच्छासाची क्रिया व पूर्णपणें चालते. करमणूक.

मिनिटांत झाड— फार्यिक आसिडची पांच हजार पुटें बीला देऊन ती लाविली असतां एका मिनिटांत त्या बी पासून फल पुष्पांनीं लवलेला असा वृक्ष तयार होईल.

विशेष अधिकार—श्री० छत्रपति साहेब कोल्हापूर, यांस सरकारानें खुनी अपराध्यांस फांशी देण्याचा अधिकार दिला. ह्मणजे, त्यांचे कडून मिळालेल्या फांशीच्या शिक्षेस सरकारी मंजूरी घेणें नको.

घरें:— लंडन नगरांत ६ लांख घरें, प्यारिसमध्यें ९०,००० आणि न्यूयॉर्कमध्यें १,१६,००० घरें आहेत. लंडनमध्यें दर घरांत सरासरीनें ७ माणसें रहातात. प्यारिसमध्यें २९ व न्यूयॉर्कमध्यें १८ प्रमाणें मनुष्यें आहेत.

न्या. सिं.

सुमारें तीन वर्षांपूर्वी हिंदुस्थानचे अबकारीचें उत्पन्न १३० लक्ष रुपये होतें तें आतां ५०० लक्ष झालें आहे.

निजाम सरकारानें महाराणी साहेबांच्या वाढदिवसा निमित्त नजर भेट तयार करविली आहे. खरें गुल्जार हें ह्या चित्राचें नांव. त्या चित्राकडे नुसतें पाहिलें तर. एक झाड असून त्याच्या एका फांदीवर एक राघू बसला आहे व तो आपले पंखांनीं राणी साहेबांस वारा घालीत आहे, असें दिसतें. तेंच चित्र दुर्बिणीतून पाहिलें तर पर्शिअन लिपींत राणी सरकरचें सर्व चरित्र निरनिराळ्या रंगांनीं व रुपेरी व सोनेरी वर्खांनीं साद्यंत काढलें आहे.

गोदावरी प्रांतांतील कलेक्टर मि० लीव्हर ह्यानां ह्या प्रांतांत शिसें सांपडलें आहे ह्मणतात. क. त.

तारेचा वेग— गेल्या एप्रील महिन्यांत लंडन आणि कलकत्ता या दोन शहरांस तारेची बातमी एका तासांत येत होती. ह्या दोन शहरांत पृथ्वीच्या परिघाचा तिसरा हिस्सा अंतर आहे.

पृथ्वीला एक मैल भोंक— सन १९०० सालीं पारिस येथें जें प्रचंड प्रदर्शन व्हावयाचें आहे त्या वेळीं पृथ्वीला एक मैल भोंक पाडून अंतरथ चमत्कार दाखवावयाचा फ्रेंच लोकांचा बेत आहे. शु० सू०

---

नोटीस

खुशाल वलद जानजी पाटील भाकरे व सजन नवंजे मारुती भाकरे राहणार मोरगांव यांस मौजे मोरगांवची जमीन सर्वे नंबर ८ पैकीं एकर गुंठे ५८९ आकार रुपये ८ अजान नवंजे लक्ष्मण उमाळे ही च्या मालकीची आह्मी दीडशें रुपयांस विकत घेतली असून ती सजन नवंजे मारुती भाकरे हीजला २९ रुपये नगदीनें वहितीस दिली. तिनें कबुलायत लिहून दिली नाहीं. ह्मणून आह्मी योग्या माहारा कडून परास्या उपडविल्या त्या जमीनींत खुशाल पाटीलानें बखर घालून पेरणीस तयार केली आहे. हे आमच्या संमती शिवाय खंडूजी काकड व पांडे यांच्या मतानें केलें.

यास्तव तुह्मांस कळवितों. तुह्मास या जमिनीची लागवड करणें आहे तर आह्मांस लेखी कबुलायत पंचवीस रुपयांची लिहून द्या जर ही कबुलायत नोटीस पावल्या पासून आठ दिवसांत लिहून दिली नाहीं. तर एक सालचे रुपये ४० चाळीस व या नोटिसीचा खर्च व जमिनीचा ताबा घेणेंस तुह्मावर दिवाणी कोर्टांत दावा करूं. तारीख २४ जून १८९९ इ.

(सही)

अमृतराव आबाजी कर्णीकर

दस्तुर खुद्द.

---

## कवाइतीचें पुस्तक

फारच उपयुक्त; हुकमाचे शब्द मराठींत व इंग्रजींत (उच्चारासह) जेथल्या तेथें सुरेख चित्रें. उत्तम अभिप्राय वऱ्हाड शाळाखात्यानें पसंत केलेले किंमत ८१०

गोविंद भास्कर ओक

वाशिम, वऱ्हाड.

---

जाहिरात

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं अकोलें म्युनिसिपल कमेटीचें हद्दींतील वारा फत्तराचे आंत गुरें चारण्याचे हक्काचा लिलांव सन १८९९।९६ इसवी सालाबद्दल ता. २ माहे जुलै सन १८९९ इसवी रोजीं सकाळीं ७॥ वाजतां टौनहालांत केला जाणार आहे. ज्यांची घेण्याची इच्छा असेल त्यांनीं सदरहू तारखेस सदहू वेळीं टाऊनहालांत हजर व्हावें कळावें तारीख ८।६।९९

Gopal Hari.

सेक्रेटरी- मुनसिपाल कामिटी

आकोला

---

नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्या साठी सरटीफिकिट मिळवें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टांस अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८८९ चा अक्ट ७ कलम६ प्रमाणें

वि. क्का. १५ मि. नंबर १/१८९५

वि० सिव्हिल जज्ज साहेब जिल्हा अकोला यांचे कोर्टांत.

नांव मंगळ परबत

बापाचें नांव गुरू दुवळत परवत जात गोसावी

राहणार अकोट तालुके व जिल्हा अकोला यांस मयत

आनंदी मर्द दवळतगीर राहणार अकोट ता० अकोट व जि० अकोला यांचें कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून सदहू अर्जदार यानें अर्ज केला आहे त्याजकरितां सदरहू मयत मनुष्याचे मालमिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं त्यांणीं तारीख ६ माहे जुलै १८९९ इसवी रोजीं सदहू अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपआपले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

तारीख १९ माहे जून सन १८९९ इ०

V. N. Dandakar.

सिव्हिल जज्ज

---

☞ हें आकोलें येथें के० व० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

Six monthly ... ... ... 3 ,, 8 as.
Single copy ... ... ... ... 4 as.

नोटिशी बद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस .... ०।०६
दुसरे खेपेस .... .... ०१

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs.
Per line over 10 ... 4 as.
Repetition Per line 3 as.

VOL XXIX AKOLA MONDAY 8 JULY 1895 NO 26

वर्ष २९ आकोला सोमवार तारीख ८ माहे जूलै सन १८९५ इ० अंक २६

ESTABLISHED IN 1880.

HEALTH REGAINED AND STRENGTH MAINTAINED.

जी. बा. नाईक कंपनीच्या

जग प्रसिद्ध गुणावह.

विजेच्या आंगठ्या, पुतळया, कडीं, लखण्या व गळपट्टेवगैरे

प्रत्येक वस्तुवर G. B. N. मार्क पाहून घेत जा. खोटा माल घेऊन फसू नका.

११०००० वर विकऱ्या, रोज पुष्कळ खपत आहेत.



गुण आल्याचे हजारों दाखले मिळाले आहेत व नित्य मिळतात

रक्त हें मनुष्याचें जीवित आहे व विद्युल्लता रक्ताचें जीवन आहे




रक्त खराब असल्यामुळें होणारे सर्व रोग अशक्तपणा, संधिवायु, शिरागतवायु, पोटांत वायु धरणें फेंपरें, हातपाय गळून जाणें, स्त्रियांचे बाळंतरोग वगैरे काळजाचे दर्द, सर्व प्रकारचे ज्वर, अर्धांशीशि, मस्तक शूल, मलावरोध, छातींत जळणें व दुखणें गळा सुजणें, सर्व प्रकारच्या मुळव्याधी. पाठींतील अशक्तपणा निद्रा न लागणें, मूत्राशयांतील रोग, खोकला, दमा, गजकर्ण, त्वचेचे विकार, मेह व इतर रोग, हे ह्या वस्तु वापरल्यानें बरे होतात, हें जगत्प्रसिद्ध आहे. गळपट्टा—लहान मुलांचे दंतोत्पत्तिसमयीं होणारे रोग शमन होऊन सुळे निर्विघ्नपणानें निघतात लेखणी—हातास कांपरें व स्मरणशक्ति, अशा ह्या उत्तम, गुणकारी, सर्व रोग शमविणाऱ्या, अंगावर सुशोभित दिसणाऱ्या, औषधी खटपट चुकविणाऱ्या वस्तूंच्या संग्रहावांचून राहूं नका.

सर्व इस्पितळांमध्यें विजेचा प्रयोग रोग्यांवर करितात, व ज्या मनुष्याच्या अंगांत शुद्ध रक्त नाहीं त्या मनुष्यावर विजेचा प्रयोग केलेला पुष्कळांनीं पाहिला असेल. व त्यापासून रोगी बरे झाले आहेत. त्याबद्दल हजारों डाक्टर साक्ष देतील.

विजेच्या वस्तूची किंमत.

| | | |
|---|---|---|
| पितळी आंगठीस किं. रु. १॥ | पि. पुतळीस किं. रु १। | धातूचे कड्यास किं. रु. १॥ |
| चांदीचे आंगठीस किं. रु. ३ | चां. पुतळीस किं. रु. २ | धातूचे लेखणीस किं. रु. १॥ |
| सोन्याचे आंगठीस किं. रु. २० | सो. पुतळीस किं. रु. २२ | रेशमी गळपटा किं. रु. १॥ |

केबर पट्टा किं. रु. ६

एकदम बारा नग घेणारास एक नग जास्त मिळेल. रोख दाम आल्यास किंवा व्ही. पी. पार्सलनें मागविल्यास पाठवून देऊं आंगठी करितां बोटाचें माप पाठवीत असावें पत्ता असावा. अनेक रोगांवर गुण आल्याचे डाक्टर, वैद्य, पत्रकर्ते, राजेरजवाडे वगैरे सद्गृहस्थांचे हजारों दाखल्याचे व विशेष माहितीचे, व एजंट व्यापारी दराचे पुस्तकाकरितां अर्धा आणा पाठवा, किंवा तें पुस्तक माला बरोबर फुकट पाठवूं. १ पासून ६ पर्यंत ट. ह. ६ आणे बंगी करणावळ माफ.

G. B. Naik and Company
Byculla Bombay

जी. बी. नाईक आणि कंपनी.

मुंबई, भायखळा जुन्या दोवणी समोर; व पुणें, रविवार पेठ नं० ६०

## जाहिर खबर

बाहेर गांवच्या सर्व व्यापारी लोकांस कळविण्यांत येतें कीं; आमची पेढी मुंबईत फार दिवसांपासून चालू असून आह्मी पुष्कळ फायद्यानें माल खरेदी करून पाठवित असतों. ज्या व्यापारी लोकांस भुसारी, कापड, फरनीचरचें जातीचें सामान, लांकूड, लोखंड, किराणा, हार्डवर ( चुका, स्क्रू वगैरे ) स्टेशनरी व ग्यासलेट वगैरे कोणत्याही जातीचा माल मागणें झाल्यास आह्मी पुष्कळ फायद्यानें आणि कसोशीनें व त्वरित पाठवूं. एक वेळ माल मागविल्यावर खात्री होईल. आमच्या कामिशनचा भावही फारच कमी ह्मणजे शेंकडा एक टक्या प्रमाणें आहे. माल मागविणें तो व्हाल्यू पेबलनें अगर आगाऊ रुपये पाठवून मागवावा. पण व्हाल्यू पेबलनें माल मागविणारांनीं शेंकडा २५ रुपये प्रमाणें रक्कम आगाऊ पाठविली पाहिजे. ज्या लोकांस माल मागविणें असेल त्यांनीं खालील पत्त्यावर आपलें नांव, गांव, स्टेशन वगैरे स्पष्ट खुलासेवार लिहून पत्रव्यवहार करावा. पत्रें पोस्टपड पाठवावीं व उत्तराकरितां टिकीट पाठवावें.

तईयब अली मुलावली भाई.

मच्छी बाजार, अबदुल रहिमान स्ट्रीट. मुंबई.

## नोटीस

नोटीस बशामी बापूजी वल्द वनासिंगजी राहणार कजबे सावळापूर प्रगणे थुगांव तालुके व जिल्हे एलिचपूर यास खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुह्मास ता. २५ मे सन १८९१ इसवी रोजीं कुलमुक्त्यारपत्र करून दिलें होतें परंतु त्याप्रमाणें माझे वतीनें तुह्मी आजपावेतों कांहींच काम केलें नाहीं व पुढेंही तुमचे हातानें मला काम करविणें नाहीं सबब तुमचे मुखत्यारपत्र रद्द केलें ह्मणून दोन वर्षांपूर्वी तोंडी समजही दिली आहे व जाहीर होण्याकरितां हल्लीं ही नोटीस दिली आहे तरी माझे नावें कोठेंही काम करण्यास तुह्मी जाऊं नये कळावें तारीख २९ माहे जून सन १८९५ इ.

निशाणी अंबाबाई मर्द किसनजी बरखदे राहणार कुंभारगांव बुजरुख प्रगणे अंजनगांव ता. दर्यापूर यांचे हातची असे.

## TO MARY IN HEAVEN.

Thou lingering star with less'ning ray,
That lov'st to greet the early morn,
Again thou usher'st in the day
My Mary from my soul was torn.
O Mary! dear departed shade!
Where is thy place of blissful rest?
Seest thou thy lover lowly laid?
Hear'st thou the groans that rend his breast?

That sacred hour can I forget?
Can I forget the hallowed grove,
Where by the winding Ayr we met,
To live one day of parting love?
Eternity will not efface
Those records dear of transports past;
Thy image at our last embrace—
Ah! little thought we 'twas our last!

Ayr, guargling, kissed his pebbled shore,
O'erhung with wild woods, thickening green;
The fragrant birch and hawthorn hoar
Twined amorous round the raptured scene;
The flowers sprang wanton to be prest,
The birds sang love on every spray,—
Till too, too soon, the glowing west
Proclaimed the speed of winged day.

Still o'er these scenes my memory wakes,
And fondly broods with miser care!
Time but the impression stronger makes,
As streams their channels deeper wear.

## स्वर्गस्थ रमा

तूं क्षीणप्रभ होउनी भटकसी ताऱ्या नभीं एकला,
भेटाया रमणी उषेप्रत सदां आल्हाद होतो तुला!
गेलेला दिन ये पुनः हि उदया हें दाविशी तूं; परी
अप्राप्ता मज ती रमा चिरुनि जी मत्प्राण नेली दुरी!
माझा प्राण जणो बहिश्चर अशी झालीस तूं निर्गत!
कोठें सांग तुझें निवासपद तें आहे रमे सांप्रत?
येथें कान्त तुझा असा तळमळे हें तूं पहातेस ना?
येती ना श्रवणीं विलाप हृदया देतात जे यातना? २
वेळा पावन ती मदीय मन हें पावेल कां विस्मृति?
कैसा मी विसरेन पावनकरा ती पादपांची तति?
वाहे निर्झर वक्र निर्गुंड तिथें, त्याच्या तटीं भेटुन
नेला शेवटलाच एक दिन तो तूं मी प्रिये सारुन ३
संगें घालविला तुझ्या सुखद मी जो काळ कांते अगे
त्याच्या विस्मरणार्थ शक्य नसतीं लाखो युगेंच्या युगें!
तेथें निस्तुळ शोभलीस तुजला देतां घनालिंगन
अंत्यालिंगन तें-- अशी न आपणा शंका तदां ये पण! ४
वाहे निर्झर तो खळाळ अपुले चुंबी शिलाचे तट.
शोभे वन्य नगीं सुरम्य हिरवा तो पल्लवांचा पट.
नेवाळी लतिका सुवास भरिता अन्या नगीं वाढुनी
देता खैव तरूंत सेथें असल्या रम्य स्थळीं मोहुनी ५
पुष्पांचा भर दाटला उमलुनी चोहोंकडे सुंदर,
आनंदें खग प्रीत गान करिती प्रत्येक शाखे वर,
तों झाला तितुक्यांत पश्चिम जवें हाः! रक्त त्या वासरीं
तेणें सूचित तो दिनांत अपणा झाला ह्मणूनी करी! ६
हे आहेत प्रसंग जागृत सदां चित्तांत माझ्या गडे?
लोभ्याची मति कांचनीं मति तशी माझी तिथें गे जडे
होते निर्झर पात्र खोल जणु कां काळें करूनि तसें
जातां काळ प्रसंग ते उठविती संदृढ चित्तीं ठसे. ७

* सुप्रसिद्ध कवी राबर्ट बर्न्स याची मेरी नांवाची स्त्री लग्न झालें त्याच दिवशीं सायंकाळीं मरून गेल्यास सहा वर्षें झालीं होतीं तिच्या सहाव्या मृततिथीच्या दिवशीं त्यानें

वरील कविता रचिली तेव्हां उषःकाळचा वेळ असून कवि आपल्या शय्येवर पडलेला होता आणि गवाक्षांतून दिसणाऱ्या एका मावळणाऱ्या ताऱ्याकडे सोत्कंठ पहात होता. ह्या पहिल्या प्रतीचा कवि असून यानें केलेल्या उत्तम काव्या पैकीं हिच्या तोडीची दुसरी उत्कृष्ट कविता क्वचितच सांपडेल.

१ पहाट २ धूस. ३ गाढ मिठी. ४ शेवटचें आलिंगन. ५ आडांबर. ६ आलिंगन ७ त्वरेनें ८ संगूढ- खोल हें 'ठसें' यांचें विशेषण.

---

# वऱ्हाडसमाचार

मिती आषाढ वद्य २ शके १८१७

---

हिंदुस्थानच्या खजिन्यांत भयंकर तूट पडत चालली आहे. अगोदरच, जमा व खर्च या दोन तोंडाचा मेळ नव्हता. खर्चाच्या बाजूला कांहींच निश्चितपणा नाहीं आणि खर्चाचे दरवाजे असे खुले आहेत कीं वसूलाची रक्कम कितीही व कोणत्याही प्रकारें वाढविण्याची अखेर मजल मारली तथापि खर्च भागत नाहीं. आदा असेल त्या मानानें जेथें व्यय नाहीं तेथें नादारी उभी ठाकलीच असें समजलें पाहिजे. आणि हीच स्थिती आमच्या कर्जबाजारी व बेताल खर्चिक सरकारची आहे. हिंदुस्थानचे धूर्त फडणीस वेस्टलांड हे आंकडे इतक्या खुबीनें मांडतात कीं यांनीं गुदस्त सालचा आढावा व चालू सालचा जमाखर्चीं अंदाज हे कळवितांना हिंदुस्थानच्या खजिन्याची सुस्थिती दर्शविली आहे. वास्तविक प्रकार फार शोचनीय आहे. वसूल वाढविण्याची कमाल झाली आणि खर्चाच्या तोंडास तर कांहींमात्र धरबंध नाहीं.

सर आकलंड काल्व्हिन व डेव्हिड बार्बर सारखे हिशोबी विद्वान व अनुभवी फडणीस वरील गोष्ट कबूल करितात आणि हिंदुस्थानची भावी स्थिती ब्रिटीश राज्याला अपायकारक होऊं नये ह्मणून त्यांनीं बहुत उपाय सुचविले आहेत. सर्व उपायांचा माथितार्थ असा कीं खर्चाची सर्वेर कमी करून पुष्कळ प्रकारें त्यांत छाटाछाट केली पाहिजे. सांप्रतची राज्यपद्धति मोठी वातुक आहे. खर्च वाढता ठेवून तो भपाऱ्यानें चालवीत आहेत. आणि प्रजेवर करांचा बोजा फार भारी बसविला असून तो अमर्यादपणें दुणावत आहे. मि. वुइल्सन नांवाच्या एका मुत्सद्यानें एक सुंदर लेख या विषयावर लिहिला आहे. त्यांत ते ह्मणतात कीं सालोसालची बजेटें पाहिलीं ह्मणजे स्पष्टपणें दिसतें कीं लष्करी खर्चा प्रीत्यर्थ सालीना पंचवीस कोट रुपयांहून ज्यास्त खर्च लागतो. सरकारी कर्जावरील व्याजाच्या रकमा, रेल्वे साठीं काढलेल्या भांडवला वरील व्याज, पेनशन खर्च व फर्लो रजेचे आलावन्स इत्यादि लष्करी खर्चांत मिळविले ह्मणजे एकून रक्कम ४९॥ कोट रुपया पर्यंत जाते. जमिनीचें उत्पन्न व इतर सर्व खर्च उत्पन्नाच्या बाबी यांची मिळवणी केली तर अंदाजा ९७ कोट रुपयांचा होतो. वसूल गोळा करण्याचा, पोष्ट खात्याचा, व किरकोळ कांहीं प्रकरणाचा खर्च अदमासें २४॥ कोट रुपये होतो व वरील लष्करी वगैरे खर्च ४९॥ कोट रुपये या दोन्ही रकमा मूळ वसूलांतून वजा केल्या ह्मणजे बाकी २३॥ कोट रुपये राज्यकारभाराच्या खर्चा निमित्त शिल्लक राहतात. या थोड्या रकमेनें निभाव बिलकूल लागण्या सारखा नाहीं. दुष्काळा निमित्त स्वतंत्र राखलेल्या फंडाची अशा स्थितींत आहुती झाली यांत कांहीं नवल नाहीं. सर वेस्टलांड यांनीं गेल्या बजेटपत्रकांत जमे कडे जो वाढवा दाखविला आहे तो पोकळ व भ्रामक आहे. हुंडणावळीचा भाव वाढला ह्मणून सरकार कर्जाच्या पेचांत आलें ह्मणून जी ओरड आहे ती सत्याला सोडून आहे. हुंडणावळी मुळें नुकसान आलें तथापि सरकारच्या लढाया, सरहद्दी वरील कमिशनें वगैरे अवाढव्य खर्चाचीं कार्यें नाजुक स्थितीचीं खरीं कारणें आहेत.

---

कर्नल लेन यांनीं पोलीस खात्यांत एक विलक्षण फेरफार केला आहे. तो फेरफार वास्तविक काटकसरीच्या हेतूनें केला आहे असें दिसतें. शंका एवढीच कीं हेतु चांगला आहे पण त्याला फळें तशींच चांगलीं येतील असें वाटत नाहीं. पोलीस स्टेशनें व औट पोस्ट ( पोलीस चौक्या ) ह्मणून जे आज पर्यंत दोन प्रकार होते ते नवीन फेरफारानें मोडल्या सारखेच झाले आहेत. प्रत्येक पोलीस स्टेशनाला एक एक चीफ कानस्टेबल असे आणि या पोलीस स्टेशनच्या हद्दींत कांहीं औट पोस्ट स्टेशनें असत. औट पोस्टांत गुन्हे रजिस्टर आदिकरून ३६।३७ प्रकारचीं रजिस्टरें ठेवावीं लागत नव्हतीं. रजिस्टरांचा कारभार पोलीस स्टेशनमध्यें होत असे. परंतु नवीन फेरफारा प्रमाणें सर्व औटपोस्टें ह्मणजे वर्ग २ चीं पोलीस स्टेशनें समजलीं जातील. औट पोस्टांत ९॥ रुपये पगाराचा एक हेड कानस्टेबल व ७ रुपये पगाराचे चार कानस्टेबल असतात. या पोलीस आफिसरांनीं चीफ कानस्टेबलच्या अधिकारा प्रमाणें अधिकार चालवावेत, आणि गुन्हे रजिस्टर करावे, तपास करावे इत्यादि नानाविध महत्वाचीं, जबाबदारीचीं व जोखिमीचीं कामें करावीत असें नव्या नियमा बरहुकूम ठरविण्यांत आलें आहे.

कर्नल लेन साहेबांची ही सुधारणा रयतेस सुखावह व पोलीस खात्यास सोयस्कर होणार नाहीं असा आमचा पक्का ग्रह झाला आहे. पोलीस खात्यांत चांगले शिकलेले लोक नसतात ह्मणून आमची पूर्वी पासून ओरड आहे. अक्षरशत्रु पण मोठ्या अधिकारावर आरूढ असे पोलीस अंमलदार बहुत असल्यामुळें प्रजेचा वारंवार छळ झाल्याचीं व बंदोबस्ताचीं कामें कच्चीं व फिकी पडल्याचीं उदाहरणें वारंवार दृष्टीस पडतात. अशा स्थितींत औट पोस्टांतील हलक्या पगारवाल्या अंमलदारास चीफ कानस्टेबलाचे अधिकार देण्यांत आले ही गोष्ट चांगली झाली असें कोण ह्मणेल बरें! थोडी बहुत काटकसर होऊन कामाची उठावणी उत्तम होईल असा कर्नल लेन साहेबांचा समज झाला असावा पण वस्तुस्थितीच्या स्वरूपा वरून पाहतां कर्नल लेन यांचा संकल्प सिद्धीस जाईल असा रंग दिसत नाहीं. पगार चांगले ठेविले ह्मणजे मनुष्य अधिक लायकीचा मिळतो आणि काम उत्कृष्ट होतें. प्रस्तुत फेरफारानें अन्याय, जुलूम व लांच लुचपत हीं ज्यास्त्यानें वाढतील व सरकारी कामही व्यवस्थशीर, टापटीप व यथायोग्य होणार नाहीं. स्वस्त वस्तु परिणामीं अति महाग पडते असें ह्मणतात तें कांहीं खोटें नाहीं आणि तसाच प्रकार या फेरफारामुळें होऊन त्या शिवाय अनेक अनर्थ होण्याचा संभव मोठा आहे. आह्मी आशा करितों कीं कर्नल लेन साहेब आमची सूचना चांगली लक्ष्यांत घेतील आणि ती पसंत पडल्यास योग्य सुधारणाही अमलांत आणितील.

---

लार्ड रोझबरी यांनीं राजिनामा दिला आणि त्या बरोबर डळमळत असणारें लिबरल प्रधान मंडळ विलयास गेलें. लार्ड सालिसबरी यांचें कान्सरव्हेटिव प्रधानमंडळ अधिकारसंपन्न झालें हें खरें तथापि या कारकीर्दीची इतिश्री जान होऊन प्रस्तुत पार्लमेंट मोडण्यांत येईल. नवीन निवडानिवडीची चळवळ इंग्लंडांत सुरू झाल्या प्रमाणेंच आहे. इंग्लंडच्या धांदली बरोबर आमच्या देशाची ही तारंबळ उडणार आहे. नामदार दादाभाई यांची पुन्हा बहुमतानें निवड झाली पाहिजे आणि त्याच प्रमाणें हिंदुस्थानचे कळकळीचे, अकारण मित्रही भावी पार्लमेंटांत समारूढ होऊन आले पाहिजेत. या गोष्टी विषयीं या देशचें तनमनधन नव्या पार्लमेंटरी निवडणुकीच्या निकालाकडे विशेष लागणार आहे. आपला पक्ष विजयी होईल याबद्दल आपण हरतऱ्हा करून टाकिली पाहिजे.

---

# The Berar Samachar

MONDAY JULY,
8, 1895

---

The administration of justice in Berar is imperfect, unsound and inefficient. The system of judicial appointments is in itself faulty. Judges learn law when they begin to administer it. We think we are not exaggerating matters when we affirm that men who have received no legal education are appointed judges. And in order that such nominees may not remain strangers to the trade they undertake to follow a scheme of lower and higher examinations is introduced to test their late learning in law. As a matter of fact, we daily experience that these departmental examinations deceive us to all practical intents. Raw students get through these tests by annual instalments. They have no legal knowledge at stake when they begin service. Ripe experience, contact with the nice quibblings and mature counsels of the pleaders, and the continuous groping in the official routine have made good judges of some of these beginners; but at the best one can say that they are *tolerable*.

We do not complain against any individual person. We find fault with the very system which allows a building to be built on shaky and tottering foundations. A laborious reading, a calm and patient hearing, a deep insight into human affairs and a keen judicial turn of mind have enabled some *empirics* to attain to the high dignity and stateliness of a judge. We are glad to observe that we can easily point to such examples in Berar but as a rule, the system of appointments in the judicial service is crude, defective and unsolid. If a competition be held between the bench and the bar we are sure that with some honorable exceptions the pleaders will totally eclipse the judges. The reason is pure and simple. Men are made judges irrespective of their legal learning, judicial aptitudes and practical experience. We believe that a high time has come when the judicial line should be recruited from the group of able, learned and practising lawyers. We make bold to propose this mode of appointments on the the parallel instance of the Bombay Presidency. The line of subordinate judges of those provinces presents an enviable institution and the honorable judges of the Bombay High Court have certified to their effecient and satisfactory discharge of duties. Mr. R. Obbard is now the Judicial Commissioner and we hope that he will sooner or later improve the department he controls. The Government will find an ample supply of honest and able judges amongst the prominent members of the bar and it will be a memorable beginning if this policy be ever followed. The recent appointment of Mr. Badruddin Tayabaji to the vacant judgeship of the Bombay High Court well illustrates the principle of our proposal and we recommend it to the Judicial Commisssioner for what it is worth.

---

The para we quote below from Colonel Szczepanski's review of the annual report of the Charitable dispensaries in Berar gives a summary of their financial condition:—

"The sum received from Government on account of salaries, medicines, &c., amounted to Rs. 38,418-12-11. The contribution from local funds was Rs 9,775 11 4 and from municipal funds Rs. 5,916 5-7. The interest on investments amounted to Rs. 2,314-6 10, subscription from natives to Rs. 6,796-13-10, and miscellaneous receipts to Rs. 155-1-2. All these items, together with a cash balance in hand of Rs. 22,536-2—9, made up a total at the credit of the dispensaries of Rs. 85,943—6—5. Of this sum the total expenditure was Rs. 60,427—9—4, leaving a cash balance in hand on the 31st. December 1894 of Rs 25,515—13—1. The percentage of total cost by Government was 65.0"

---

The Poona Sarwajanik Quarterly publishes an important portion of a lecture on widow-remarriages. The lecturer Mr. Vidyadhar Waman Bhide B. A. has strengthened his arguments in favour of such marriages by regular statistics. His conclusions are very sound and we would gladly endorse the summary of his arguments with which he concludes. He proceeds to remark:—

"The number of females remaining unmated if widows are allowed to remarry will be a little more than one fourth of the number of males remaining unmated now, when widows are not allowed to remarry, and so this will be a distinct improvement. Secondly, whi[illegible] [illegible]merly large numbers of bo[illegible] to remain unmated [illegible]ssity, now only

a small number, and that too only one of sex, will have to remain unmated, and that through natural necessity, and not by reason of the artificial rules of society. Thirdly, this number of unmated females will contain a large number of girls under 15, whose chastity will be in no danger of being compromised for want of husbands. Fourthly, although for the sake of argument we have taken it for granted that every widow will remarry, still, practically there will be many widows who will vountarily remain as widows in memory of their love for their departed husbands, and for the sake of their children by their first husbands and so there will hardly be any females who will be compelled to remain virgins for want of husbands. Fifthly, many widows that have already tasted the happiness of married life will, from feelings of delicacy, remain unmarried; and many others that have found the nuptial bed a thorny bed will be unwilling to sacrifice their independence. Sixthly, even admitting that girls will find it difficult to obtain husbands, I say that in the long run, this will be beneficial to society as tending to late marriages, as we actually see to be the case in some castes in which the number of females preponderates over that of males, and this tendency towards late marriages deserves to be encouraged rather than discouraged. And seventhly and lastly, as a consequence of late marriages, the school—going period of girls will be lengthened, which will also be a very desirable improvement."

## वऱ्हाड

हमामान— पाऊस नाहीं म्हणून मोठी चिंता पडली आहे. हवा रुक्ष आहे. वारा कांगरा सुटतो. वाऱ्यांत किंचित् थंडावा वाटतो. मध्यंतरीं ढग पुष्कळ येतात त्यावरून पाऊस लवकर पडेल असें वाटतें.

खान बहादूर शमसुद्दीन अलिखान डेपुटी कमिशनर, वाशिम हे आठ दिवसांच्या विरकोळ रजेवर हैदराबादेस गेले आहेत.

मंगरूळपीर येथील हिंदु मुसलमान लोकांची जाहिर सभा भरून गेला मोहोरम व एकादशी यांचे उत्सव उभय लोकांच्या एक दिलानें निर्भयपणे शेवटास नेण्याचें ठरलें. ही युक्ति तेथील तहशीलदार मे० शेर महमद खान यांनीं योजिली आणि उभय लोकांचा सलोखा कायम राखून एक सल्यानें भांडण निर्मूळ केलें हें त्यांस अत्यंत भूषणावह आहे. इतरत्र असाच प्रकार सुरू होईल तर बरें!

रा० रा० लक्ष्मण गोपाळ देशपांडे यांस येथें तहशीलदार नेमल्या अन्वयें ते परवा आपल्या नव्या जागीं रुजूं झाले. राजश्री लक्ष्मणराव हे वऱ्हाडांतील जुन्या सुप्रसिद्ध अडवांबकर देशपांड्याच्या घराण्यांतील असून चांगले शिकलेले आहेत. बहुत वर्षां नंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं त्यांच्या उत्तम ठरलेल्या दीर्घ चाकरी बद्दल योग्य पारितोषक दिलें हें पाहून आनंद वाटतो. घरंदाज कुळांतील गृहस्थ तहशीलदारा सारख्या हुद्याच्या अधिकारावर नेमण्यांत आले ही गोष्ट विशेष श्रेयस्कर असून प्रजेस हितावह होईल.

रा. रा. रामचंद्र अंबादास यांनीं आक्टिंग तहशिलदारीचा चार्ज दिल्यामुळें ते लवकरच कायमच्या नायब तहशिलदारीवर मंगरूळास रवाना होतील.

रा. रा. दामोदर नानाजी शिंदेकर हे जळगांवास तहशिलदारीच्या जागीं गेल्या आठवड्यांत रुजूं होऊन रा. रा. माधवराव आण्णाराव दोन महिन्यांच्या रजेवर गेले. या रजेंत ते लोअर स्टांडर्डचा अभ्यास पुरा करून येत्या सप्टेंबरांत परीक्षेस बसणार आहेत.

मंगरूळचे तहशिलदार मे० शेर महमद्खान हे डिपार्टमेंटल परीक्षेसाठीं एक महिन्याच्या रजेवर जाणार आहेत.

येथील वर्षोत्सवव्याख्यानमालेस काल प्रारंभ झाला. पहिलें व्याख्यान विद्वन्मुकुटमणि रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी एम. ए. यांचें झालें. गेल्या ११ वर्षांचा वऱ्हाडांतील शेतीचा इतिहास हा अत्यंत उपयुक्त विषय होता. व्याख्यान समग्र यथास्थल प्रसिद्ध करूं. अध्यक्ष रा. रा. बी. बी. सुळे हे झाले होते.

हैदराबादेस जो 'बिरार हास्पिटल असिस्टंट' तयार करण्याचा वर्ग आहे त्या वर्गांत खालील ६ उमेदवार परीक्षेंत पसंत करून ठेवले आहेत:— त्रिंबक, गणपत गंगावर मुदलिआर, जी. एम. कोलिया, हयात महमद खान, ए. गोपाळ कृष्ण आणि पी. सदानंद.

यवतमाळ मुनसिपाल कमिटीनें सालिना ९९ रुपया वरील उत्पन्नावर कर बसविण्याचा ठराव आलिशान गव्हरनर जनरल व रेसिडेंट यांच्या मंजूरातीनें केला आहे. गेल्या एप्रील १ ली पासून कर वसूल केला जाईल.

खालील गृहस्थास वऱ्हाडांत हास्पिटल असिस्टंट वर्ग ३ च्या दर्ज्यावर नेमण्यांत आलें. हे सर्वजण हैदराबाद काळेजांत शिकून परीक्षेंत पास झालेले आहेत:—

रा. रा.

प्रल्हाद एकनाथ, सय्यद अब्दूल अझिझ, चिंतामण हरी गोखले, नरहर शिवराम, माधव रामकृष्ण आणि मुलिया चिनया.

रा. रा. यशवंत महादेव तहशिलदार हे रजेवरून परत अकोल्यास आले आणि मित्र मंडळीस भेटून बुधवारीं मोर्शीस बदलीच्या तहशिलीवर रुजूं होण्या साठीं रवाना झाले.

पुसद येथील सब जज्जाची कचेरी वाशिमास आणिली आहे. त्याला कारण असें झालें कीं पुसदास कचेरीला जागेची चांगलीशी सोय नाहीं व शंभर रुपयावरील किंमतीचे दावेही फार कमी असतात. पण पुसद तालुक्यांतील उमरखेड सारख्या दूरच्या व सुपीक भागांतील लोकास दिवाणी व फौजदारी कामा निमित्त वाशिमास या नवीन व्यवस्थेमुळें यावें लागत आहे, १०० रुपया पर्यंतचे दिवाणी दावे व सेकंड क्लास माजिस्ट्राटच्या अधिकारांतले मोकदमेही पुसदास चालतील परंतु वरिष्ठ प्रकारच्या कामांत पक्षकार लोकांचे फार हाल होतात इकडे सरकार लक्ष्य पुरवील काय?

डाक्टर लिटल सानिटरी कमिशनर यांजकडे हैदराबाद कांटिंजट फौजेचे मुख्य मेडिकल आफिसरचे कामही देऊन मूळच्या १२०० रुपये पगारांत २०० रुपये भर घालणार असल्याचें कळतें. राजश्री वैदर्भकर्ते आक्षेप घेतात तो यथार्थ आहे आणि आह्मी ही सानिटरी कमिशनरची कचेरी हैदराबादेस नेदळण्यास कधीं रुकार देणार नाहीं.

वाशिमाहून एक गृहस्थ लिहितात कीं, जुन्या बाजारी कडील रस्ता निसरडीचा व नादुरस्त आहे आणि मोठ्या बाजाराच्या पायऱ्या उतरतांना रात्रीं अंधारामुळें हात पाय मोडतात तेव्हां मुनसिपालिटी ही सार्वजनिक गैरसोय दूर करितील तर कमिटीला मोठें पुण्य लागेल.

मोहरमचा मोठा सण या जिल्ह्यांत निर्विघ्नपणें शेवटास गेला आणि या गोड शेवटास कारण अगाऊ केलेल्या तजविजी हें होय. मोहरमच्या उत्सवांत तीन चतुर्थांश लोक हिंदु असतात, आनंदानें नाचणें वागडणें, अचकट विचकट सोंगें घेणें, अल्लातल्ला लेळ खेळणें इत्यादि गोष्टी मोहरमाच्या अंगभूत उपाधि बनल्या आहेत. महंमदाची पुण्यतिथी अशा सोहळ्यांनीं साजरी व्हावी असें खऱ्या धर्मशील मनुष्यास आवडणार नाहीं. हिंदु असो किंवा मुसलमान असो, धर्मबुद्धि अशा कुपथगमनानें विलयास जाते हें आह्मी निराळें सांगण्याची गरज नाहीं. कालान्तरें चांगल्या सुधारणा होतील अशी उमेद आहे.

गांविकपांत दलाली— भव्य गंध लावून संभावितपणाच्या बाण्यानें घरीं पाळण्या करितां म्हणून गाय विकत घेऊन ती लागलीच थोड्याशा नफ्यानें खाटिकांस विकणारा एक दलाल उजेडांत आला आहे. लोकांनीं सावध व्हावें.


ADVERTISEMENT.

The following rules for securing a proper registration of births and deaths within the limits of the Ellichpur Civil Station Municipality having been made under sub-section 1 (c) of section 116 of the Berar Municipal Law, 1886, at a special meeting of the Municipal Committee, and confirmed by the Resident under section 116 (3) of the said Law, shall come into froce from the 1st. July 1895:—

I. On every birth of a child within the limits of the Municipality the father or the mother or a guardian of the child, or in case of their absence or death or inability on account of sickness or other similar cause, any person living in the house in which the child was born, or any person who was present at its birth, shall, within 72 hours from the time of birth, give information on the following points at the Municipal office, or the divisional member of the Committee in whose division the child war born, or to his peon or to any other member of the Committee appointed for the purpose, or to the Conservancy Inspector, if there is one:—

(1) The division and street of the Municipality in which the child was bron.

(2) Names of its parents.

(3) Caste, occupation, and religion of the parents.

(4) Sex of the child.

(5) Date of the child's birth.

(6) Whether the child was born alive or was still-born, or whether havieg been born alive it died imme diately after birth.

II On every death within the limits of the Municipality, a member of the family to which the deceased belonged, or in case of there being no such member, or such member being unable on account of absence, sickness or other similar cause, any person living in the house in which the death took place, shall, within 72 hours from the occurrence of the death, give infor— mation on the following points at the Municipal office, or to the divisional member of the Committee in whose divi sion the death took place, or to his peon, or to the member of the Commi ttee who has care of the conservancy and sanitation of the town, or to the Conservancy Inspector, if there is one:—

(1) The division and the street of the Municipality in which the death took place.

(2) The name, caste, religion, sex, and age of the deceased.

(3) The disease causing death, and how many days ill,

(4) The date of the death.

(5) The occcpation of the deceased.

III. Any Municipal Officer receiving information under Rules I and II from any person shall, if required, furnish him with forms in the forms given in the appendices A and B to these Rules, as may be required, and shall on the receipt of the information give a receipt to the person furnish—ing it in the form given in appen—dix C.

IV. Whoever refuses or neglects to give information in accordance with Rules I and II, it being his buty under those Rules to give information, shall, on conviction before a Magistrate, be liable to pay a fine not exceeding Rs. 5.

V. The responsibility of collecting information regarding births and deaths within the Ellichpur Civil Station Municipality shall primarily be with the beat peons, and the work of collecting this information shall be considered a part of their duty.



नोटीस

रा. रा. रेणुकादास बळवंत जाहागिरदार टुनकी तालुके जळगांव यांस.

मंगणीराम हजारीमल मारवाडी दुकान जळगांव यांज कडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्माकडे आमचे दुकानचें बाकी बद्दल रुपये १४१॥= व व्याज ३८ एकून रुपये १७९॥= निवत असोन शिपाई, गुमास्ते बाकी मागण्यासाठीं पाठविलें असतां त्यांजला पैसा न देतां उलट शिवीगाळ करितां हें तुह्मा सारख्या सभ्य गृहस्थास काहीं शोभत नाहीं. मर्जी आपली, कृपा करून ही नोटीस पावल्यावर आठ दिवसांचे आंत आमचे दुकानची सफाई करावी नाहीं पेक्षां या नोटिशीचे खर्चासह दिवाणी कोर्टांत फिर्याद करून पैसा सर्व भरून घेऊं. कळावें तारीख १ माहे जुलै सन १८९५ इसवी.

(सही)

मंगणीराम हजारीमल मारवाडी

दुकान जळगांव

दस्तुर खुद.


## वर्तमानसार.

Six monthly, ingle

लंडनमध्यें वचीखर्च एक कोट बारा लक्ष रुपये आहे. पारिसमध्यें एक कोट चाळीस लक्ष रुपये आहे; व न्युयार्कमध्यें वत्तीस लक्ष रुपये आहे. धुराचे दिवे प्रथमतः लंडनांत सुरूं झाले. नंतर एक वर्षानें पारिसमध्यें सुरूं झाले, त्या नंतर आठ वर्षांनीं न्युयार्कमध्यें सुरू झाले. लंडनमध्यें ७५००० दिवे आहेत; पारिसमध्यें ५०००० दिवे आहेत व न्यूयार्कमध्यें २८०० दिवे आहेत न्यूयार्कमध्यें या शिवाय विजेचे दिवे आहेत.

फ्रान्समध्यें टच्यूलिन गांवीं एक हिंसक पशूंचा प्रदर्शनवाला आला होता. त्या वेळीं तेथील एका न्हाव्यानें पैज मारली कीं "सिंहाचे पिंजऱ्यांत मी एकाचें डोचकें शेवटापर्यंत भादरीन." त्या गब्रूनें पिंजऱ्यांत जाऊन चैनींत एका चांभाराचें डोकें भादरलें! सिंहोबाही चैनींत गमत पहात पडले होते!

मध्यअमेरिकेंत पांपीआय सारखें एक बुजलेलें शहर आग्वा नामक ज्वालामुखीचे पायथ्यापाशीं सांपडलें आहे. त्यांत उकरतां उकरतां मातीचीं व धातूंचीं भांडीं, कांचेचीं भांडीं, जवाहीर, गारगोट्यांचीं हत्यारें व सहा फुटापेक्षां जास्त उंचीच्या माणसांचे सांपळे सांपडले.

नवीन युक्ती— ऑस्ट्रियांतील ग्रझट नांवाच्या ठिकाणीं दोघां विद्युत्शास्त्रज्ञांनीं तारायंत्राच्या द्वारें पुष्कळ ठिकाणीं एकदम वर्तमानपत्रें छापण्याची नवीन युक्ती काढली आहे.

व्हाइसरायांची स्वारी येत्या नवंबरांत मद्रास इलाख्यांत फिरावयास जाणार आहेत. आ. व.

स्कालरशिपा— कलकत्ता येथील एक विद्याभिलाषी उदार बंगाली बाबू इंग्रजी शाळांतून दरमहा ५१५ रुपयांच्या १५० स्कालरशिपा सुरूं करणार आहेत. त्यांत २५ मुंबई इलाख्याचे वांटणीस येतील ह्या स्कालरशिपा इंग्लिश, देशभाषा, आणि इतिहाससज्ञान ह्या विषयांत प्रत्येकीं शेंकडा ५० गुण मिळविणाऱ्या हुशार विद्यार्थ्यांस देण्याचा सदर्हू उदार गृहस्थांचा संकल्प आहे.

हाय कोर्टाचा ठराव— खानदेश पोलिसानें उदरनिर्वाहाचें साधन नसलेला एक उंटप्पु मनुष्य धरून तेथील फ० क्लास माजिस्ट्रेट पुढें नेला. तो निरुद्योगी आहे असें फक्त पोलिस शिपायानें सांगितलें. माजि० नीं त्या शिपायाला दुसरा एकही प्रश्न विचारला नाहीं, किंवा दुसरा साक्षीपुरावा कांहीं एक नव्हता, तथापि चांगल्या वर्तणुके बद्दल त्या मनुष्याचा १०० रु० चा जामीन माजि० नीं घेतला. एवढ्या पुराव्यावर जामीन घेता येत नाहीं असें हाय कोर्टानें ठरवून माजि० चा ठराव रद्द केला.

नाशीक येथें गेल्या क्रिमीनल सेशनमध्यें निपाणी तालुक्यांतील एका मराठी शाळेच्या मास्तराला त्यानें एका मुलाला पायाखालीं तुडवून मारल्या वरून जन्मठेप काळ्या पाण्याची शिक्षा झाली.

बेळगांव जिल्ह्याच्या अथणी तालुक्यांतील जानवदी नांवाच्या गांवीं अंतू नामक सावकारानें थोड्याच अवकाशांत तीन खून केले! प्रथम त्यानें सिद्धां नांवाच्या मनुष्याला आपला एक भाऊ व एक नोकर यांच्या साह्यानें शेतांत ठार मारून जाळून टाकिलें, नंतर त्यानें याच्या आईला बोलत बोलत एका विहिरीशीं नेऊन आंत लोटून दिलें व ही गोष्ट एका सहा वर्षांच्या मुलानें पाहिली होती. तो बातमी फोडील म्हणून त्यालाही विहिरींत ढकलून मारिलें. पोलिसनें याचा भाऊ व नोकर यांस पकडलें आणि त्यांना खुनाला सामील असल्या बद्दल बेळगांवच्या सेशनांत फांशीच्या शिक्षाही झाल्या. अंतू मात्र पळाला असून पोलिस त्याचा माग काढीत आहे. दी. बं.

प्रत्येक मनुष्य आपली जमा काय व खर्च किती हा हिशेब ठेवीत जाईल तर त्यास शिलकेची किंमत कळून येईल. जो माणूस हिशेब ठेवीत नाहीं त्यास शिलकेची योग्यता मुळींच कळणार नाहीं. ज्यापाशीं शिल्लक नाहीं तो सदा भिकारी समजला पाहिजे. अशाच प्रकारचा पारमार्थिक हिशेब ज्याचा त्याच्याजवळ नसेल तर त्याची स्थिति सर्वकाळ अर्धवट व गोंधळाची रहाणार आहे; म्हणून प्रत्येकानें प्रापंचिक व पारमार्थिक हिशेब ठेवण्याची काळजी घेतली पाहिजे. हिशेब ठेवणें तो कीर्द व खतावणी ठेविल्यानें अधिक चांगला समजतो. हे सर्व नमुने रामदास, तुकाराम, या साधूंनीं घालून दिलेल्या नमुन्या प्रमाणें चालविल्यास उत्तम ताळा बसून तो मनुष्य इहलोकीं व परलोकीं सन्माननीय होणार आहे.

आजपर्यंत पोष्टांतून पाठवावयाच्या बंग्यास दर २० तोळे वजनास ४ आणे प्रमाणें हाशील द्यावें लागत असे; ते येत्या आगष्टच्या पहिले तारखेपासून दर ४० तोळ्यास ०४ आणे प्रमाणें हाशील द्यावें लागून हलक्या बंग्या रजिष्टर करण्याचें कारण नाहीं, असा सरकारानें ठराव केला आहे.

कलकत्यांत हिंदूंची वस्ती ४ लक्ष असून १॥ लक्ष हिंदू गंगास्नान करणारे आहेत. म. मि.

लाहोरास खून, चोऱ्या वगैरे फार होऊं लागल्या आहेत.

ग्वाल्हेर सरकारची 'सीवनी' येथील छावणी. इंग्रजांनीं ताब्यांत घेतली होती ती परत केली असें कळतें.

भरतपूर संस्थानावर इंग्रजी रिपायन चालू आहे, राजे साहेब मथुरेस आहेत. गरिबांची दाद घेणारा कोण आहे.

लंडनास प्रिन्स ऑफ वेल्स यांच्या अध्यक्षते खालीं देशदेशाच्या रेल्वेच्या प्रतिनिधीची सभा झाली.

चित्राल प्रकरणांत नावाजलेला उमराखान काबुलच्या अमीराजवळ खुशाल आहे.

रशिया, चीनावर दया दाखवूं लागला आहे, याचें खरें कारण काय आहे हें हल्लींच्या काळीं कोणासही सांगण्याची जरूर नाहीं. तें उघडच दिसतें, कीं 'स्वार्थ!' स० वि०

देणगी— बडोदे श्री० मन्महाराज साहेबांनीं श्री० छत्रपति शिवाजी महाराजांच्या समाधीच्या जीर्णोद्धारार्थ दहा हजार रुपयांची देणगी दिल्याचें कळतें.

नवें कर्ज काढण्यास रशियानें चिनास फार मोठी मदत केली, त्या कर्जास आपण हमी भरली आणि चिनाचा पुष्कळ मुलूख जपानच्या हातीं जात होता तो जाऊं दिला नाहीं ह्या उपकारामुळें बद्ध होऊन चीन मांचुरियातून रशियास रेल्वे करून देईल, आणि चीनचा व्यापार आपल्या हातांत येईल अशी रशियास मोठी आशा आहे. अडचणींत सांपडल्यामुळें मांचुरियातून रेल्वे करण्यास चीन रशियास परवानगी देईल असें भय इतर राष्ट्रांसही वाटूं लागलें आहे.

रशिया, आणि फ्रान्स ह्या तिन्ही प्रचंड राष्ट्रांची एक गट्टी झाल्यास काय होईल आणि काय नाहीं ह्याचा कांहीं नेम नाहीं. अशी सर्व लोकांची समजूत आहे. त्यांत चीन म्हणजे धातु. खनिज पदार्थ, वगैरे साधनांनीं भरलेला देश, त्यांत चिनी लोक अत्यंत उद्योगी, तेव्हां असलें निधान रशिया सारख्या हव्यासी आणि परोत्कर्षासहिष्णु राष्ट्राच्या हातीं गेलें म्हणजे तो दुसऱ्या राष्ट्रांस कांहीं मिळूं द्यावयाचा नाहीं ह्या भयानें दुसरीं राष्ट्रें चिवचींव करावयास लागलीं आहेत. तेव्हां रशिया आणि चीन यांची एकी इतर राष्ट्रांच्या मुळावर खरोखरच येणार कीं काय हें एक देव जाणें.

अमीर पुत्राच्या यात्रेचा खर्च— काबूलच्या अमीर साहेबांच्या चिरंजीवास महाराणी साहेबांनीं विलायतेस बोलावून नेलें. त्यांच्या जाण्या येण्याचा खर्च ३०००० पौंड होईल असा गेल्या मार्च महिन्यांत हिंदुस्थानच्या स्टेट सेक्रेटरींनीं अजमास केला होता. आतां टृथ पत्राचे एडिटर लाबोचर म्हणतात कीं त्यांच्या स्वारीचा खर्च २०००० पौंड म्हणजे ३९ लक्ष रुपये होईल असें म्हणतात. हा सगळा खर्च हिंदुस्थानाकडून घ्यावयाचा असें स्टेट सेक्रेटरी म्हणतात. दुर्दैव बिचाऱ्या हिंदुस्थानचें!

स्तुत्यकृत्य— बडोद्याचे सयाजीराव महाराज गायकवाड ह्यांनीं दरसाल २०००० रुपये खर्च करून बियें घेऊन तीं बडोदा, नौसरी, कडी, आणि अमरेली प्रांतांतील शेतकऱ्यांस पुरवावी असा हुकूम केला आहे. ही मंजुरी दोन वर्षां पुरतीच आहे बडोदा सरकारचें आपल्या प्रजेच्या कल्याणाकडे फार लक्ष आहे असें अनेक गोष्टीवरून दिसून येतें.

कोल्हापूर स्टेट रेल्वेचा फांटा घाट सर हद्दीपर्यंत नेऊन भिडविण्याचा विचार कोल्हापूर दरबारचा असून त्या प्रमाणें पुढील होणार रेल्वेचे फांट्याचे सर्वेचें काम सुरू असून आतां लवकरच पुरें होईल असा अजमास आहे. हा फांटा सुमारें चाळीस मैल तरी निदान होईल. शु० सू०


## उत्तम सोप

आम्ही हिंदुस्थानांतील सर्व लोकांकरितां [ व्यापारी अथवा खासगत ] सोलापूर येथें सुती व रेशमी लुगडीं, खणाळी, संत्रज्या (कच्चे व पक्के रंगाच्या) खाद्या, घोंगड्या, नाना तऱ्हेच्या, ठाना क्लाथ व येथील गिरणींत तयार होणारें सर्व प्रकारचें कापड तसेंच कर्नाटक व मद्रास इलाख्यांतील उपरणीं रुमाल धोतरजोडे साधे व रेशमी व जरीचे रोख पैशानें अगर व्ही. पी. रीतीनें माफक कमिशन घेऊन तावडतोब रवाना करूं.

आमचे तंबाखूचे कारखान्यांत मुंबई, पुणें व कल्याण येथील नमुन्याप्रमाणें उंची मध्यम व मिश्र विड्या तयार होत असतात भाव किरकोळ व ठोक असे दोन आहेत. समक्ष अगर पोस्टपेड पत्रद्वारा चोकशी आम्हापाशीं करावी.

केशवराव साटये
सदर बाजार, सोलापूर



## कवाइतीचें पुस्तक

फारच उपयुक्त; हुकमाचे शब्द मराठींत व इंग्रजींत ( उच्चारासह ) जेथल्या तेथें सुरेख चित्रें. उत्तम अभिप्राय वऱ्हाड शाळा खात्यानें पसंत केलेले किंमत ०१०

गोविंद भास्कर ओक
वाशिम, वऱ्हाड.


## SIMULTANEOUS EXAMINATION.

Notice of Motion
The House of Commons
1895

Mr. Naoroji— Civil Service ( India ) (Simultaneous open Competitive Examinations in England and India), —That, in the opinion of this House, in order to preserve and maintain the stability of British Power, the loyalty, confidence, contentment, and gratitude of the people of British India, to improve their material and moral condition, and to increase largely commercial and industrial benefits to the people of the United Kingdom, it is expedient that the solemn pledges of the Act of 1833, of the proclamation of 1858 after the Mutiny, of the Proclamation of 1877 on the assumption of the Imperial Title at the great Delhi Durbar, and of the further confirmation of these Proclamations on the Jubilee by Her Most Gracious Majesty the Queen and Empress of India, should be fulfilled by, among other reforms, giving effect to the Resolution adopted by this House on 3rd. June 1893, viz: That all open Competitive Examinations heretofore held in England alone for appointments to the Civil Services of India shall henceforth be held simultaneously both in India and England, such Examinations in both Countries being identical in their nature, and all who compete being finally classified in one list according to merit.

हिंदुस्थानांत ब्रिटिश अम्मल चिरस्थायी करण्यासाठीं, हिंदुस्थानांतील लोकांची राजनिष्ठा विश्वास आणि संतोष कायम ठेवण्यासाठीं त्यांची औद्योगिक आणि नैतिक स्थिति सुधारण्यासाठीं आणि त्याचे योगानें ब्रिटिश संयुक्त राज्याचा फायदा करण्यासाठीं, १८३३ च्या कायद्यांतील, बंडा नंतरच्या १८५८ सालच्या जाहिरनाम्यांतील, १८७७ च्या दिल्ली दरबारच्या व. १८८७ सालीं जुबिली दरबारच्या वेळीं दिलेलीं वचनें पाळलीं पाहिजेत आणि १८९३ च्या जुन्या ३ ऱ्या तारखेस सिव्हिलसर्व्हिस परिक्षा इंग्लंड व हिंदुस्थान ह्या दोन्ही देशांत एकसारखी घेत जावी असा जो ठराव आपण पास केला तो अमलांत आणिला पाहिजे."

☞ हें आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

...... ८४

Annual in ... ... 4 ... ... as.
Six monthly ... arrears ... 1 as.
Single copy ... ... ... ... ... 4 as.

नोटिशी बद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस .... ०।०६
दुसरे खेपेस .... .... ०।

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs.
Per line over 10 ... 4 as.
Repetition Per line 3 as.

VOL XXIX AKOLA MONDAY 15 JULY 1895 NO 27

वर्ष २९ आकोला सोमवार तारीख १५ माहे जूलै सन १८९५ इ० अंक २७



ESTABLISHED IN 1880.

HEALTH REGAINED AND STRENGTH MAINTAINED.

जी. बा. नाईक कंपनीच्या

जग प्रसिद्ध गुणावह.

विजेच्या आंगठ्या, पुतळया, कडीं, लेखण्या व गळपट्टेवगैरे

प्रत्येक वस्तुवर G. B. N. मार्क पाहून घेत जा. खोटा माल घेऊन फसू नका.

११०००० वर विकल्या, रोज पुष्कळ खपत आहेत.



गुण आल्याचे हजारों दाखले मिळाले आहेत व नित्य मिळतात

रक्त हें मनुष्याचें जीवित आहे व विद्युल्लता रक्ताचें जीवन आहे




रक्त खराब असल्यामुळें होणारे सर्व रोग अशक्तपणा, संधिवायु, शिरागतवायु, पोटांत वायु धरणें फेंपरें, हातपाय गळून जाणें, स्त्रियांचे बाळंतरोग वगैरे काळजाचे दर्द, सर्व प्रकारचे ज्वर, अर्धशीशी, मस्तकशूल, मलावरोध, छातींत जळणें व दुखणें गळा सुजणें, सर्व प्रकारच्या मुळव्याधी. पाठींतील अशक्तपणा, निद्रा न लागणें, मूत्राशयांतील रोग, खोकला, दमा, गजकर्ण, त्वचेचे विकार, मेह व इतर रोग, हे ह्या वस्तु वापरल्यानें बरे होतात, हें जगत्प्रसिद्ध आहे. गळपट्टा—लहान मुलांचे दंतोत्पत्तिसमयीं होणारे रोग शमन होऊन सुळे निर्विघ्नपणानें निघतात लेखणी—हातास कांपरें व स्मरणशक्ति, अशा ह्या उत्तम, गुणकारी, सर्व रोग शमविणाऱ्या, अंगावर सुशोभित दिसणाऱ्या, औषधी खटपट चुकविणाऱ्या वस्तूंच्या संग्रहावांचून राहूं नका.

सर्व इस्पितळांमध्यें विजेचा प्रयोग रोग्यांवर करितात, व ज्या मनुष्याच्या अंगांत शुद्ध रक्त नाहीं त्या मनुष्यावर विजेचा प्रयोग केलेला पुष्कळांनीं पाहिला असेल. व त्यापासून रोगी बरे झाले आहेत. त्याबद्दल हजारों डाक्टर साक्ष देतील.

विजेच्या वस्तूची किंमत.

| | | |
|---|---|---|
| पितळी आंगठीस किं. रु. १॥ | पि. पुतळीस किं. रु. १। | धातूचे कड्यास किं. रु. १॥ |
| चांदीचे आंगठीस किं. रु. ३ | चां. पुतळीस किं. रु. २ | धातूचे लेखणीस किं. रु. १॥ |
| सोन्याचे आंगठीस किं. रु. २० | सो. पुतळीस किं. रु. २२ | रेशमी गळपट्टा किं. रु. १॥ |

केंबर पट्टा किं. रु. ६

एकदम बारा नग घेणारास एक नग जास्त मिळेल. रोख दाम आल्यास किंवा व्ही. पी. पार्सलनें मागविल्यास पाठवून देऊं. आंगठी करितां बोटाचें माप पाठवीत असावें पत्ता असावा. अनेक रोगांवर गुण आल्याचे डाक्टर, वैद्य, पत्रकर्ते, राजेरजवाडे वगैरे सद्गृहस्थांचे हजारों दाखल्याचे व विशेष माहितीचे, व एजंट व्यापारी दराचे पुस्तकाकरितां अर्धा आणा पाठवा, किंवा तें पुस्तक माला बरोबर फुकट पाठवूं. १ पासून ६ पर्यंत ट. ह. ६ आणे बंगी करणावळ माफ.

G. B. Naik and Company
Byculla Bombay

जी. बी. नाईक आणि कंपनी.

मुंबई, भायखळा जुन्या दावणी समोर व पुणें, रविवार पेठ नं० ६०



## जाहिर खबर

बाहेर गांवच्या सर्व व्यापारी लोकांस कळविण्यांत येतें कीं; आमची पेढी मुंबईत फार दिवसांपासून चालू असून आह्मी पुष्कळ फायद्यानें माल खरेदी करून पाठवित असतों. ज्या व्यापारी लोकांस मुसारी, कापड, फरनीचरचें जातीचें सामान, तांकूट, लोखंड, किराणा, हार्डवेर (चुका, स्क्रू वगैरे) स्टेशनरी व म्यासलेट वगैरे कोणत्याही जातीचा माल मागणें असल्यास आह्मी पुष्कळ फायद्यानें आणि कमेशीनें व त्वरित पाठवूं. एक वेळ माल मागविल्यावर खात्री होईल. आमच्या कमिशनचा भावही फारच कमी ह्मणजे शेंकडा एक रुपया प्रमाणें आहे. माल मागविणें तो व्हाल्यू पेबलनें जर आगाऊ रुपये पाठवून मागवावा. पण व्हाल्यू पेबलनें माल मागविणारानें शेंकडा २५ रुपये प्रमाणें रक्कम आगाऊ पाठविली पाहिजे. ज्या लोकांस माल मागविणें असेल त्यांनीं स्वार्लीक पत्यावर आपलें नांव, गांव, स्टेशन वगैरे स्पष्ट खुलासेवार लिहून पत्रव्यवहार करावा. पत्रें पोस्टपेड पाठवावीं व उत्तराकरितां तिकीट पाठवावें.

तईयब अली मुलावली भाई.

मच्छी बाजार, अब्दुल रहिमान स्ट्रीट, मुंबई.



## कवाइतीचें पुस्तक

फारच उपयुक्त; हुकमाचे शब्द मराठींत व इंग्रजींत (उच्चारासह) जेथल्या तेथें सुरेख चित्रें. उत्तम अभिप्राय वऱ्हाड शाळा खात्यानें पसंत केलेलें किंमत ०।१०

गोविंद भास्कर ओक
वाशिम, वऱ्हाड.



## उत्तम सोप

आह्मी हिंदुस्थानांतील सर्व लोकांकरितां [ व्यापारी अथवा खासगत ] सोलापूर येथें सुती व रेशमी लुगडीं, खणाळी, संत्रज्या (कच्चे व पक्के रंगाच्या) खाद्या, घोंगड्या, नाना तऱ्हेच्या, ठाना क्लाथ व येथील गिरणींत तयार होणारें सर्व प्रकारचें कापड तसेंच कर्नाटक व मद्रास इलाख्यांतील उपरणीं रुमाल धोतरजोडे साधे व रेशमी व जरीचे रोख पैशानें अगर व्ही. पी. रीतीनें माफक कमिशन घेऊन तावडतोब रवाना करूं.

आमचे तंबाखूचे कारखान्यांत मुंबई, पुणें व कल्याण येथील नमुन्याप्रमाणें उंची मध्यम व मिश्र विड्या तयार होत आहेत. भाव किरकोळ व ठोक असे दोन आहेत. समक्ष अगर पोस्टपेड पत्रद्वारा चौकशी आह्मापाशी करावी.

केशवराव साटये
सदर बाजार, सोलापूर


वऱ्हाडसमाचार

मिति आषाढ वद्य ८ शके १८१७

## हिंदुस्थानची राजनीति

[ २१ अं. व. पुढें चालू ]

१८ नेटीव लोकमताची अनुकूलता हाच राज्याचा भक्कम आधार आहे आणि तलवार बहादरीवर देखील राज्य डळमळण्याची भिती असून तलवारीचा जोर घातुक असतो:— इंडियाच्या लोकांचें राज्यकर्त्यांनीं पुष्कळ कल्याण केलें आहे. इंडियन लोक अंधा सारखे होते त्यांस ज्ञानदृष्टी देऊन डोळस केलें. त्यांस विचारशक्ति नव्हती व ते ...रवाकनगार होते. विद्यामृतानें ते विचारशालि झाले असून सर्व गोष्टींचें उत्तम परिशीलन करितात. त्यांस ... सरकारची संवय आहे व राजाच्या लहरी प्रमाणें ते हुकूम आणि त्यामुळें बादशहाची तंत्रेत संभाळण्यांत ते दास बनले होते पण इंग्रजी राज्याच्या प्रभावानें कायदेवान व पद्धतशीर सरकार ला भलें, व लोकांचे हक्क संभाळण्या विषयीं व उदार तत्वांचा प्रसार करण्या विषयीं हें सरकार दक्ष आहे. एवढ्यानेंच राज्यकर्त्यांचें कर्तव्य आटोपलें नाहीं. ब्रिटिश सुधारणेची सोन्या सारखीं फळें लोकांस दाखऊन दिलीं आणि त्यांची त्यांस गोडीही लाविली तेव्हां त्या फळांचा स्वाद घेण्यास, हातांत अमलका प्रमाणें वागविण्यास, तीं चाखण्यास आणि तीं उपभोगण्यास इंडियन लोकांस परवानगी दिली पाहिजे. सुधारणेचीं गोड गोड फळें द्या ह्मणून पुढें केल्या नंतर तीं राज्यकर्त्यांनीं परत घेता उपयोगी नाहीं. सुधारणेच्या वुजलेल्या वाटा त्यांस दाखऊन दिल्या पाहिजेत आणि त्यांच्या पूर्व संस्थाची पुन्हां उभारणी B[...]च्या हातून करविली पाहिजे. वेळ पाहून AY, ...कर्त्यांनीं अगाऊ वरद हस्त पुढें करित गेलें पाहिजे कोणी कांहीं मागितल्यावर ती मागणी मान्य करण्यांत थोरवी नसते. जों पर्यंत ब्रिटिश सरकार नेटीव लोकमत व नेटिवांची कर्तबगारी साधारणपणें लक्षांत घेऊन त्या धोरणानें पुढें पाऊल टाकील तों पर्यंत नेटीव समाजांतील वजनदार लोकांची नेहमीं साह्यता मिळेल. न मिळाली तर शांतता व अबादानी हीं बिनधोकपणें चिरस्थायी राहणार नाहींत. तलवारीच्या बळावर राज्य चालवूं ह्मटलें तर राज्याची शाश्वती राहणार नाहीं व सर्वत्र दुर्लौकिक होईल.

१९ एक राष्ट्रीयत्व क्रमाक्रमानें अनुभवास येईल— सामाजिक व राजकीय उन्नतीच्या मुख्य पायरीस इंडियन लोक पोचले नाहींत. त्या पायरीला पोचले ह्मणजे प्रगमन चक्राला तेच चांगली गती देतील आणि राज्यकर्त्यां पासून आपापले हक्क व सुधारणा पूर्णतेनें संपादन करितील. इंडियन लोक अलिकडे एकराष्ट्रीय विचारानें वागण्यास शिकत आहेत; आणि त्याच्या पैकीं जे पुष्कळ पुढें सरसावले आणि उत्तम सुशिक्षित झाले त्यांचे राजकीय गोष्टींत अद्याप बालपणच आहे. राष्ट्रीयपणा त्यांच्या विचारांत अद्याप ह्मणण्या सारखा भरला नाहीं आणि राष्ट्रीयपणाचा जोम किंवा स्फूर्ती हीं अंगीं खेळण्या इतका पहिला धडा देखील ते नीटसे शिकले नाहींत. त्यांच्या मनांत राष्ट्रीय स्फूर्ती होऊं लागल्या आहेत. सध्यां दुसऱ्याचें अनुकरण करण्या इतकी त्यांची मजल पोंचली आहे. ते अजून विद्यार्थिदशेंत असून त्यांच्या अंगीं राष्ट्रीयत्वाची अवधारणा येत चालली आहे. ब्रिटिश सरकारनें या सर्व जबाबदाऱ्या आपल्या शिरावर घेतल्या ह्मणजे लोकांस स्वतंत्रपणाचे पूर्ण हक्क मिळून सरकारा विषयीं मनात अत्यंत राजनिष्ठ राहून सरकारची सर्वत्र चहा होईल. मेजर इव्हान्स बेल स्वतां विषयीं ह्मणतात कीं पुष्कळ लोकांना जो पक्ष तोच पक्ष का... नाहीं; आणि ब्रिटिश राज्यां सारख ...च्यें

अंकास ५



मूळ हेतु, उद्देश व राजनीति यांचें खरें महत्व न जाणतां त्यांच्या विरुद्ध लोक जर अज्ञानानें व गतानुगतिकतेनें ओरड करितील तर मी त्या ओरडण्याला कांहींच मान दे‍त नाहीं

२० तडजोड हीच खरी गुरुकिल्ली होय. बुद्धिपुरस्सर अन्याय करणें आणि मनांतल्या पक्षा सवजुतीस कांटा देणें ही तडजोड नाहीं:— राजधर्मांचें शास्त्र हें मुख्यत्वें करून अनुभवावर [बसविलें] आहे. नुसत्या काल्पनिक तत्वावर राज्य स्थापण्याचा किंवा समाज बनविण्याचा प्रयत्न केला तर तो निर्फळ होय. प्लेटो, सर थामस् मनरो, राबर्ट ओवेन इत्यादि ग्रंथकारांनीं मनःसृष्टींत निर्माण केलेलें लोकसत्तात्मक राज्य, उत्तम कीर्तिंतली राज्यसंस्था, फ्रान्सांत स्वतंत्रता व समसमानता या तत्वावर रचलेलें राज्य, एकादीचें राष्ट्र इत्यादि ग्रंथ गहन व अगाध बुद्धिचातुर्याचीं उदारणें असून विजयस्तंभा प्रमाणें बुद्धिवैभवाचीं व अदूषित कल्याणदृष्टीचीं दर्शकें आहेत; पण या ग्रंथामध्यें विचार व नीति यांचा तात्विकदृष्ट्या मेळ बसत नाहीं आणि त्यांचा व्यवहारांत उपयोग केला तर ब्रह्मघोटाळा होऊन सर्वच विलय पावतील. तडजोडीची पुष्कळांनीं दुर्दशा केली आहे तथापि तडजोड हीच खरी गुरुकिल्ली आहे आणि राज्य चालविणाऱ्या मुत्सद्याची हीच खरी राजनीति होय. धुरंधर मुत्सद्यावर राज्य हाकण्याची जबाबदारी असते आणि त्याला एकदम व निश्चयात्मकपणें कांहीं धोरणानें वागण्याची जरूरी त्यांच्या डोळ्या पुढें वारंवार असते. आपल्या हातांत व अधिकारांत जें येईल त्याचा फायदा करून घेण्याची पद्धत अदूरदृष्टीची आहे कांकीं तशा करण्यांत परिणामावर नजर जात नाहीं. व लोकांच्या हक्कांची पायमल्ली होते. तडजोडीची पद्धत अगदीं निराळी आहे. समजून उमजून अन्याय करणें आणि आपल्या मनाचे पक्के ग्रह बाजूस सारणें हा कांहीं योग्य राजमार्ग नाहीं. जेथें लोकांचा हक्क ह्मणून कांहीं नाहीं तेथें पद्धतशीर असा मार्ग कोणताच नाहीं.

[ ( पु० चा० )

---

पार्लमेंट गेल्या सोमवारीं आटोपलें. नवीन निवडानिवड होण्यास सुरवात झाली आणि असें ठरलें आहे कीं तारीख १२ आगष्ट रोजीं नव्या पार्लमेंटाच्या सभेस प्रारंभ होईल. हल्लीं सभासद निवडण्या विषयीं गांवोगांवच्या मतदार लोकांमध्यें सर्वत्र धांदल उडाली आहे आणि सभासद होऊं इच्छिणारे उमेदवार स्वतांची बहुमतानें निवड होण्यासाठीं हरतऱ्हा करून सोडीत आहेत. लिबरल प्रधानमंडळ अधिकारारूढ होतें किंवा कान्सरव्हेटिव प्रधानमंडळ अधिकारावर बढतें हें पाहण्याकडे सर्व राष्ट्राचे डोळे लागले आहेत.

पार्लमेंटच्या निवडानिवडींत कोणत्या पक्षाला प्रधानकी मिळते एवढेंच कळण्यासाठीं आह्मी पूर्वीं आतुर व चौकस होत होतों पण आमचा पार्लमेंटाशीं संबंध अधिक निकट झाला आहे. हिंदुस्थानची कळकळ बाळगणारे व काळजी वाहणारे असे कांहीं सद्गृहस्थ वि[ला]‍[य]‍तेंत आहेत आणि [ति]‍[कडी]‍[ल] कांग्रेस कमिटीमध्येंच हे गृहस[्थ आ]‍हेत. या लोकांच्या पक्ष[ाचा जय] बनला पाहिजे. गेल्या पांच [वर्]षांतच विलायतच्या लोकांमध्यें इंडिया विषयीं जागृति व अनुकंपा उत्पन्न झाली आहे हा सर्व पराक्रम सर वुलियम वेडरबर्न आदिकरून गृहस्थांचा होय. क्रमाक्रमानें पार्लमेंटांतही आपल्या पक्षाची एक जोरदार मंडळी निवेल अशा आमच्या उमेदी बहुत दिवसांच्या आहेत तेव्हां आपल्या देशाचें सर्व अवधान विलायतेंतील निवडानिवडीच्या चळवळीकडे रात्रंदिवस लागलें तर तें साहजिकच आहे.

कांग्रेसच्या ब्रिटिश कमिटीमध्यें पार्लमेंटरी नऊ जण सभासद आहेत आणि त्या शिवाय कांहीं पार्लमेंटांतले गृहस्थ आमच्या मंडळीच्या कार्याला अनुकूळ असे आढळतात या सर्वांची निवड नव्यानें फलद्रुप झाली पाहिजे. यांच्या निवडणुकीवर आपल्या राष्ट्राचें कल्याण सर्वथैव अवलंबून आहे. ईश्वर करो आणि आमचा भाग्यकाल चिरकाल टिको!

---

मोठ्या आनंदाची गोष्ट कीं सेंट्रल फिन्सबरीच्याच वतीनें नामदार दादाभाई पुन्हा उमेदवार आहेत. फिन्सबरीचे मतदार लोक पूर्वीं प्रमाणेंच नामदार दादाभाई यांस अनुकूल आहेत आणि त्या लोकांच्या आग्रहपूर्वक अश्वासना बद्दल आनंद प्रदर्शक ताराही इंडियांतून जात आहेत. दुसरी कल्याण सूचक उमेदवारी बरो—इन—फरनेस येथील होय. बाबू डब्ल्यू. सी. बानरजी या गृहस्थांस तेथ त्या मतदार लोकांनीं आपल्या वतीनें सभासद होण्यासाठीं विनंती केली आहे. सर्व इंडियांतील लोकांस या बातमीनें आनंद वाटेल. हे बाबू या देशाचे मुख्य चालक आहेत आणि त्यांच्या वर सर्व राष्ट्राचा विश्वास आहे. राष्ट्रीय सभेचे मूळ संस्थापक असून दोन वेळ अध्यक्ष होते. तेव्हां असे लोकमान्य गृहस्थ नामदार दादाभाई व बाबू बानरजी पार्लमेंटांत निवडून गेले तर पार्लमेंटांत इंडियन पक्षाचा विजय सत्वर होईल असें आह्मास वाटतें. मि० भावनगरी हे पार्शी गृहस्थ इंडियांतून तिकडे कान्सरव्हेटिव पक्षाकडून उमेदवारी करण्यास गेले आहेत. पण अद्याप त्यांस कोणत्याही बरोतील लोकांनीं उमेदवार होण्याविषयीं रुकार दिल्याचें कळलें नाहीं. यांचे विचार व मतें मागेंच उजेडांत आलीं तेव्हां त्यांच्या विषयीं लोकांचा प्रतिकूळ ग्रह झाला आणि तो बदलण्यास अझून कांहीं कारण घडलें नाहीं. आमच्या पक्षांतील लोकांचा या निवडणूकींत चांगला विजय होवो अशी परमेश्वराजवळ प्रार्थना आहे.

---

सिव्हील सर्व्हीस परीक्षा इंग्लंडांतल्या प्रमाणें इंडियांतही समकाली घेतली जावी अशी नामदार दादाभाई यांची सूचना पार्लमेंटा समोर येणार होती आणि त्या सूचनेला इंडियातील लोकांनीं अनेंद्रा आपल्या मताचें पाठबल द्यावें ह्मणून पूर्ण प्रसिद्धीसाठीं ती सूचना आज कित्येक महिन्यापासून आह्मी छापीत होतों. आमच्या मनोदया प्रमाणें बाह्य प्रांतांतल्या लोकांनीं जाहिर सभा भरवून पार्लमेंटास अर्ज धाडले परंतु आमच्या प्रांतस्थ लोकांनीं आपली उदासीनता, व आळस्य हीं व्यक्त केलीं ह्मणून दुःख वाटतें. या प्रांतातर्फें एक सार्वजनिक अर्ज जाऊं नये ही अत्यंत लाजिरवाणी गोष्ट होय.

पण पार्लमेंटच बरखास्त झाल्यामुळे ही सूचना सध्यां तहकूबच ठेवण्यांत आली आहे. आतां नवीन इटी व नवीन दांडू या प्रमाणें खेळ चालणार आहे. नवीन निवडानिवड होऊन पार्लमेंट पुन्हां बसलें ह्मणजे हा प्रश्न काढण्या विषयीं दुसऱ्यानें विचार करावा लागेल.

---

श्री छत्रपति शिवाजी महाराजांची समाधि रायगडावर आहे. तिच्या जीर्णोद्धारार्थ सर्व देशभर प्रयत्न चालूं असून वर्गण्या गोळा होत आहेत. देशाभिमानी लोकांच्या गांवोगांव सभा झाल्या आणि फंड उभारण्यांत आले. पण आमच्या प्रांतीं श्री शिवाजी महाराजांचें जणूं काय नांवच ठाऊक नाहीं अशांतला प्रकार दृष्टीस पडतो हें कळविण्यास देखील लाज वाटते. राष्ट्राला पूज्य व वंद्य अशा वस्तु थोड्या असतात आणि त्या आमच्या या पादाक्रांत झालेल्या देशांत अगदींच विरळा आढळतात. श्री शिवाजी महाराजांची समाधि अशा विरळ वस्तूं पैकीं प्रमुख आहे किंबहुना समाधीच्या तोडीची दुसरी वस्तु नाहीं. या समाधीचा जीर्णोद्धार करण्यांत आला आणि श्री शिवरायाच्या पुण्यतिथीचा महोत्सव आह्मी करूं लागलो ह्मणजे आमच्या इतिहासांतील निराळ्या अध्यायास प्रारंभ झाला असें आह्मी समजतों. या आमच्या कृतीनें दोनशें अडीचशें वर्षांपूर्वींचा सुंदर इतिहास आपण उपयोगांत आणिला असें होईल. इतिहासापासून भावी गोष्टींविषयीं अतर्ज्ञान व अंतर्स्फूर्तीही झालीं पाहिजेत. देशाभिमानाचें बीजारोपण आपण केलें इतकेंच नाहीं तर भावी गोष्टींचें कर्तृत्व पुष्कळ आपण आपल्या हातीं घेतल्या सारखें होणार आहे. कालमानाप्रमाणें कार्यमाला बदलते पण तिच्या प्रवर्तक हृदयस्थ प्रवृत्ती व विचार हीं सर्व मूळ द्रव्यें एकच असतात. हीं मनोद्रव्यें पुन्हा इतिहासांतील गोष्टीशीं आपला निकट संबंध जुळल्यानें त्वरित प्रचलित होतात आणि ज्या सद्गुण समुच्चयानें श्रीशिवाजी महाराज मराठी राज्याचे संस्थापक झाले त्या सद्गुणांचे आपण मनोभावानें थोडे बहुत तरी विभागी होऊं. राष्ट्रीय कल्पना व विचार समाधि सारख्या उद्दीपक गोष्टीनें चांगले प्रादुर्भूत होतात. मागील इतिहासाकडे जो वळतो तो सदोदित आपला नवा जुना संबंध तोडीत नाहीं आणि प्रस्तुत गोष्टी व गत गोष्टी यांच्या मधील सांखळी कायम व मजबूत राखतो. समाधि आदिकरून गोष्टी दर्शनीय सांखळ्या आहेत त्या प्राकृत जनांस नेहमीं सद्बोध करितात व वीरश्रीला चढवीत असतात. मूर्तिपूजा जशी देवभजनाला लागण्या पूर्वींची स्थूल व दृश्यमान पहिली पायरी आहे त्या प्रमाणें समाधि स्मारकें, पुतळे वगैरे गोष्टी होत. समाधिच्या जीर्ण स्थितीला नूतनत्व आणण्यासाठीं वऱ्हाडांत अद्याप कांहींच प्रयत्न चालूं नाहीं हें वाईट होय. लोकांच्या मनांत देशाभिमानाची प्रेरणा लवकर होऊन आमच्या प्रांताची अल्पस्वल्प तरी वर्गणी समाधिफंडाला मिळावी अशी उत्कट इच्छा आहे. अलिकडे आमच्या प्रांतस्थ लोकांमध्यें सार्वजनिक गोष्टीविषयीं बहुत अनास्था व औदास्य दिसून येतें हें ठीक नाहीं. हल्लीं राजकीय व सामाजिक उन्नति होत आहे ती वरील चैतन्यशून्यत्वानें बंद होईल आणि मागील वर्षांच्या श्रमांचें चीज न करितां ते फुकट घालविल्याचें पाप मात्र आपल्या माथीं येईल. खरोखर, लोकांच्या मनोवृत्तीला लवकर पालट पडो असें आह्मी इच्छितों.

---

( रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी यांनीं वऱ्हाडच्या गेल्या दहा अकरा वर्षांच्या शेतकीच्या स्थिती विषयीं सुंदर निबंध लिहून तो गेल्या ७ व्या तारखेस ज्ञानप्रकाशांत वाचविला त्यांतील दुसरा व तिसरा पारिग्राफ सांप्रतच्या स्थितीचा मजल कशी पोचली हे उत्कृष्ट प्रकारें दाखवितात. हे भाग येणें प्रमाणें:—

"सन १८८१ च्या खानेसुमारी वरून असें कळतें कीं वऱ्हाडची लोक संख्या त्या वर्षीं २६,७२,१०१ होती. ती सन १८९१ च्या खानेसुमारींत २८९७४१९ भरती ह्मणजे दहा वर्षांत लोकसंख्येची वाढ शेंकडा ८.४१ झाली. एकंदर संख्येपैकीं सुमारें शेंकडा ७० लोकांचा उदरनिर्वाह प्रत्यक्ष शेतीवर आहे परंतु परंपरेनें ज्यांचा निर्वाह शेतीवर आहे अशांचें प्रमाण शेंकडा ९० जवळ येईल. असें फामिन कमिशननें जें अनुमान सर्व हिंदुस्थानच्या स्थितीबद्दल केलें आहे, तें वऱ्हाडास तर विशेषच लागूं पडेल. या वरून वऱ्हाडाला शेतीचा प्रांत अशी संज्ञा देतात, ती किती यथार्थ आहे, हें दिसून येईल.

३. गेल्या दहा वर्षांत जी सुमारें सवा दोन लाखांनीं वऱ्हाडांतील वस्ती वाढली तिचा निर्वाह कसा झाला हा अर्थात् साहजिक प्रश्न निघतो. त्याचें उत्तर हें कीं ज्यास्त शेती करून निर्वाह झाला आहे. वऱ्हाडांत शेती करण्या लायक जमीन ८९,६७,९९२ एकर आहे, त्या पैकीं मेळघाटांत ३,९०,१६६ एकर आहे. मेळघाटांत अझून वस्ती फार नाहीं हें खरें, पण खऱ्या वऱ्हाडांतल्या लोकांना तेथील हवा मानवत नाहीं, तेव्हां पाईनघाटांतील लोक तिकडे जाऊन शेती करितील असा संभव नाहीं. ह्मणून मेळघांतील जमीन वजा जातां शेती करण्या लायक जमीन ७९,२७,०८६ एकर आहे ती पैकीं सन १८९३—९४ साली ७१,७७,९१४ एकर जमीन लोकांनीं वाहायाला घेतली होती व वाहायाला घेतली नव्हती अशी काय ती ९,३९,१७२ एकर जमीन राहिली ह्मणजे शेंकडा ३ एकर अझून सर कारला देतां येईल. परंतु यांतील निमे जमीन इनाम्यानें वगैरे दिलेल्या खेड्यांत सामील असल्या कारणानें, शेंकडा १-२ एकर जमीन काय ती खालसा खेड्यांत बिन वहित अशी राहिली आहे. सन १८८३-८४ साली वहित जमीन ७३,९९,१३६ एकर होती तेव्हां गेल्या अकरा वर्षांत ३,२२,७७८ एकर जास्त जमीन वहितींत आली असें झालें. ठोंकळ मानानें असें ह्मणतां येईल की सव्वा दोन लक्षांनीं वस्ती वाढली, तिचा निर्वाह होण्याला सव्वा तीन लाख एकर जमीन जास्त वहितींत आणणें भाग पडलें. सन १८८३-८४ साली प्रत्येक मनुष्याला वहितीच्या जमिनीचें प्रमाण २.७

एकर पडत होतें तें सन १८९३-९४ सालीं थोडे कमी ह्मणजे २.६ एकर पडलें. या अवधींत सरकारचा जमिनीचा सारा १५,०१,३४६ पासून तों ६३,७७,९१७ रुपये वाढला. ह्मणजे वाढ ८,४६,५७१ रुपये झाली. ह्मणजे वस्तीची वाढ २१, लाख, वहितीची वाढ सव्वा तीन लाख एकर. व साऱ्याची वाढ पाऊण नऊ लाख रुपये झाली.)

---

हिंदुस्थानच्या जमा खर्चा विषयीं विचार करण्यासाठीं लार्ड वेल्बी यांच्या अध्यक्षतेखालीं जें रायल कमिशन बसणार आहे त्याच्या समोर फार गहन विषय आहे. मोठे भगिरथ प्रयास पडले तेव्हां अति मिनतवारीने मानीस्टेट सेक्रेटरी सर फौलर यांनीं रायल कमिशन नेमून दिलें. या कमिशनचें काम गुप्त रितीनें चालणार असल्यामुळें वर्तमानपत्रांच्या लघुलेखकांस कमिशन बसलें असतांना तेथें जाण्याची परवानगी नाहीं. आमच्या मतें ही मोठीच चूक होय. कमिशन पुढें जो प्रश्न मांडण्यांत येणार आहे तो असावा तितका व्यापक नसून अगदीं संकोचित आहे. तथापि त्यामध्यें सर्व जमाखर्चाच्या प्रस्तुत पद्धती विषयीं विचार होणार आहे हें ठीक आहे. मुळ प्रश्न हा आहे कीं हिंदूस्थानचा जो वसूल येतो व जो खर्च होतो त्यावर असावी तितकी देखरेख आहे किंवा नाहीं. पायरी पायरीनें एक एक अधिकारी दुसऱ्याला जबाबदार असतो हें खरें पण या सर्वांवर योग्य प्रकारची पैरवी राहते किंवा नाहीं या गोष्टीचा कमिशनला विचार करावयाचा आहे. खर्चाच्या बाबी अनेक आहेत व त्या सर्वांवर दक्षता पूर्वक देखरेख ठेऊन काटकसरीनें, बेताबानें व नेमस्तपणानें सर्व राज्यकारभार चालत असावा ही सर्वांची इच्छा आहे. सांप्रतच्या पद्धती प्रमाणें व्हाइसराय व त्यांचे एक्झीक्युटिव कौंसिलदार यांच्या मनास वाटेल त्या प्रमाणें सर्व खर्च होत असतो. खर्चाची पद्धती अति दोषमूलक आहे. खर्च करणाऱ्या व्हाइसराय, आदिकरून अधिकाऱ्यावर जबाबदारी अगदीं क्षुद्र आहे. त्यांच्याशीं विचारपूस व चौकशी करून त्यांचा जबाब विचारणारा अधिकारी कोणी नाहीं हेंच घातुक आहे. स्टेटसमन पत्रकर्त्यांनीं एक उत्तम उपाय सूचविला आहे कीं लोकनियुक्त कायदे कौंसिलदारांची संख्या वाढवावी आणि वार्षिक जमाखर्चाच्या बाबी सर्व कौंसिलदारांच्या बहुमता शिवाय पसार केल्या जाऊं नयेत. ह्मणजे हल्लीं विलायत सरकारचा सर्व जमाखर्च कामन्स सभेंत जसा पसंत करावा लागतो त्याप्रमाणें कौंसिलदारांच्या सल्ल्या शिवाय कांहींच निर्णय होऊं नये. विकल्पें दुसरी सूचना अशी आहे कीं व्हाइसरायच्या एक्झीक्युटिव कौंसिलावर सर्व देखरेख व हुकूम कामन्स सभेनें चालवावा. या दोन्ही सूचना चांगल्या आहेत पण त्या राज्यकर्त्यांस कितपत पथ्यकर होतील हें सांगवत नाहीं; कीं असा बंदोबस्त झाला तर अद्यातद्या लष्करी खर्च, काम्पेनसेशन अलावन्स, अफगाण राजपुत्र शहाजादा यांच्या विलायतच्या सफरीचा भक्कम खर्च वैगेरे सहसा हिंदुस्थानच्या तिजोरीवर बसविण्यांत येणार नाहींत. रायल कमिशन काय ठराव करितें पहावें.

---

# The Berar Samachar

MONDAY JULY, 15, 1895

## OUR LEGISLATIVE COUNCILS

Our rulers have got over the practical difficulties which rendered the introduction of a system of direct representation inexpedient. Those difficulties did not exist at least in capital cities. By compactness and by extent of population, by the greater diffusion of wealth, education, and public spirit, and by the attraction to itself of the eminent talents in the country, the metropolitan towns are well fitted to receive a measure of direct representation. We can not emphasize too strongly the importance of having at least one constituency in each of the Presidencies where the principle of direct representation is allowed free scope, and which will serve as a political model for the provinces and tend to keep before the eyes of the government itself the principle which it should endeavour to introduce into them, as fast as a change in their existing condition is admissible.

No doubt the Presidential governments have made some march tawards something approaching representation by distributing and assigning three or even four memberships to single metropolitan towns. This wise dispensation clearly shows that the government itself partly admits our reasoning and conclusions. For instance the Bombay Chamber of Commerce represents the commercial interests of that vast and most busy metropolis. The Corporation is given one seat and thus a free scope is given to the representation of eminent men of public spirit. Talents are by no means excluded in the share of representation granted to the metropolitan towns, for the Universities have heen given the franchise. This franchise is the more noteworthy for it is divested of all property consideration.

Yet in seeking to recognise the principle so partially, the governments have denied to the Presidencies a certain power and a certain means of self-culture and self-training. If, after the trial of the first representative councils in 1893, the government had extended the principle of direct representation to large towns at least more unmixed good would have arisen out of such an arrangement of assigning re—presentatives.

It is never too late to mend; if the representatives assigned to metropolitan towns were retained the same in number and the persons qualified to vote were both increased and a little recast the scheme we propose would be easily carried out. It remains for the people to convey their request to those in whose hands it is to grant. Exertion must be made from this time and we hope our metropolitan towns will make an effort to raise themselves to bring our political and model instructors.

---

The illusions of fanaticism have this year passed off apparently without a violent commotion, though Por—bandar and Bikaner outmatched Prabhas Pattan in a religious frenzy and tremendous enormities. But such occurrences have since grown into those quite of a forms. They have lost their sting and also germinating and productive power which threatened to heap mountains upon mountains. It is also a re—cognised fact now that those very officers who are the keepers of our peace and the retainers of order not only encourage such disturbances but often give an undue direction to them by rewarding and by unduly supporting one sect and by trying to visit the other with all the violence of the mythical furies. People thus sought to be duped and lulled into a persuasion of safety and evenhandedness have lost every confidence in the sweet gabbled professions of justice. One thing is certain, most Anglo Indian officers are far from countenancing the often acknowledged policy of their employers and are, by their actions widening the breach of long smothered religious schism and fanaticism. What—ever its consequences in remote times, such a uniforms conduct is very injurious to the best interests of this country and the people have already lost any assurance that an unflinchingly evenhanded treat—ment will be shown them in troubled times without racial and party distinc—tions. It is only this pervading spirit of a general understanding to which may be added the uncommonly wakeful vigilance on the part of all authorities which pre—vented a manifestation of those outbursts of fanatic disturbances, so common during the year before the past. No satisfactory and permanent rules or decisions have yet been arrived at. In the absence of a settled policy on the part of our rulers, there is no knowing when they may outbreak afresh. In that case who shall be the real malefactors? The mis—guiding officers whose doings smother them or the misled wretches driven to them?

Times are now favorable for a judicious settlement of such racial animosities. The Provincial Government are now under more just and unbiassed admini—strators. The great perturbers of the native mind or at least men supposed to be such by popular estimation and belief are now gone. These obstructions being removed, it is to be hoped that the root of such animosities will be removed. So long as it is has of late taken its hold, all vigilance and surveillance will only hold it in check to be manifested with an abnormal violence at its proper time.

This year's disturbances during the Mohorum have been too disseminated to demand any comments. It may be safely asserted that the festivities passed off without any considerable ill feeling and that the authorities almost every where did their utmost to keep peace and maintain orders.

---

## वऱ्हाड

हवामान— या आठवड्यांत पर्जन्यानें केवळ अमृतवृष्टीच केल्या प्रमाणें झालें. हा पाऊस ऐन वेळेवर, माफक व मधून मधून पडत आहे ह्मणून विशेष फायदेशीर आहे. एकंदर पाऊस ८ इंचावर झाला. पाऊस येण्यापूर्वी मनस्वी उकडत. रोगराई ह्मणण्या सारखी विशेष नाहीं.

रा. रा. रामराव बापूजी पतकी हें दोन वर्षांचा हक्क ठेवून हैदराबादेस गेल्या मुळें रा. रा. पांडुरंग सखाराम अग्निहोत्री क्लार्क आफ कोर्ट, खामगांव, यांस इलिचपूरास नेमून पुढील वर्गावर्गी करण्यांत आली होती. परंतु या नेमणुका रद्द करून रा. रा. यशवंत मोरेश्वर काळे आक्टिंग क्लार्क आफ कोर्ट यांस पूर्वी प्रमाणेंच सब प्रोटेम ठेवून खालील नेमणुका तशाच ठेविल्या.

खान बहादूर शमसुद्दीन आलीखान डेपुटी कामिशनर, वाशीम, यांच्या किरकोळ आठ दिवसांच्या रजेंत रा. रा. गोविंदराव अप्पा मुदलिआर एक्स्ट्रा असि. कमिशनर यांस इन-चार्ज डेपुटी कामिशनर नेमलें होतें.

मि. हेअर डेपुटी कमिशनर अकोला हे या आठवड्यांत चिखलदऱ्यास गेले होते. साहेब बहादूर आज बहुतक कचेरीला येतील.

येथील वर्षोत्सव व्याख्यानमालेंतलें दुसरें व्याख्यान रा. रा. विष्णु सदाशिव बापट, टेलिग्राफ सुपरिनटेंडेन्ट यांनीं इंग्रजींत काल सकाळीं दिलें. आपली रुद्याची असलेली स्थिती व ती कशी असली पाहिजे हा विषय होता. अध्यक्षस्थानीं रा. सा. सिताराम विश्वनाथ पटवर्धन डायरेक्टर हे होते.

मि. बुलक कामिशनर साहेब यांची स्वारी चिखलदऱ्याहून उमरावतीस काल रोजी दाखल झाली.

---


AUCTION SALE OF ONE-THIRD SHARE IN THE NEW AKOLA PRESS, BERAR.

On TUESDAY, the 23rd instant, at 4 p. m., Mesers. BENNETT and Co. will sell by public Auction, at their Rooms. by order of Bai Manbai, wife of Koorpal Khimji the mortgagee, and with the consent and concurrence of Charles Agnew Turner, Esq, Official Assignee and Assignee of the Estate and Effects of Bharmul Bhojraj, Insolvent, the mortgagor, the following property:—

All the right, title and interest of Bharmul Bhojraj in the land, hereditaments and premises in the New Akola Press, Berar, containing by admeasurement 240,000 square feet or thereabouts, together with all the messuages, tenements or buildings known as the Akola Press buildings, standing thereon, and bounded as follows:— That is to say, on or towards the east by the Public road leading to Akola, on or towards the west by fields belonging to certain cultivators, on or towards the south by the public road leading to the cotton market, and on or towards the north by a road leading to the river Mariba. And also all the presses, engines, boilers, gearings, drums, shafts, machines, tools, implements, utensils, fixtures, office furniture, articles and things which have been erected, brought upon or affixed to and which are now standing or being in or upon or affixed to the said premises.

For further particulars and conditions of sale application may be made to Messrs. Motabhai ane Jamietram Solicitors to the vendor, or to the Undersigned.

BENNETT & Co.


## वर्तमानसार

सन १९०० साली फ्रान्सांत होणाऱ्या बड्या प्रदर्शनांत जमिनींत एक मैल खोल एक भेंक पाहणार आहेत असें आह्मी मागें सांगितलेंच असून त्या विवराची रचना कशी असावयाची याबद्दलची कांहीं माहिती आज या खालीं दिली आहेः—

या अपूर्व विवरांत उतरण्यासाठीं आतुर झालेले प्रेक्षकगण भूपृष्ठभाग सोडून आंदोलायित झाले ह्मणजे त्याला पहिल्यानें ६० फुटापर्यंत उष्णता व हवा बरीच कमी झालेली आढळेल व त्याच्या खालीं जाऊं लागल्यावर दर ७९ फुटास १ डिग्री प्रमाणें उष्णतेचें मान वाढत्या प्रमाणावर आहे असें भासेल. हें उष्णतावृद्धीचें मान भूगर्भापर्यंत क्रमाक्रमानें वाढत जात असतें. असेंच भूगर्भशास्त्रवेत्त्यांचें ह्मणणें आहे. ह्या विवरांतील पहिल्या ग्यालरीवर प्रेक्षक येऊन उतरले ह्मणजे तेथें त्यास सूर्यप्रकाशाचा व ध्रुवा जवळील प्रदेशांत संचार करणाऱ्या आस्वलें, रेंडीर वगैरे चतुष्पादांचें तेथें भ्रमण आहे असें दिसेल! प्रेक्षकांस खालीं उतरण्यास फार श्रम झालेले असतील व हवेचे एकाएकी स्थित्यंतर झालेलें असेल ह्मणून त्याच्या परिहारासाठीं फ्रेंच लोकांस अपूर्व असें बर्फाचें पेयपदार्थ व थंडगार बीर, दारू वगैरे प्राशन करण्यास मिळणाऱ्या सोयीही केल्या जातील व ही ग्यालरी विद्युद्दीपमालेनें पूर्ण चंद्रिके सारखी प्रकाशित दिसेल. ह्याच्या खालीं दुसऱ्या ग्यालरीवर जाऊन पोचल्यावर तेथें प्रेक्षकांस चेंबरें दिसतील व त्यांत जगावरील सर्व राष्ट्रांत तयार झालेले, दृष्टिसुखातिशयाचे व कला कौशल्याचे जिन्नस मोठ्या टापटिपीनें व व्यवस्थेनें मांडलेले दिसतील. तिसऱ्या ग्यालरीवर तमाखूपान करणाऱ्या प्रेक्षकांची मात्र खूप मजा आहे. त्याला तेथें तमाखूची मेजवानीच मिळेल ह्मणाना! कारण व्हर्जीनियन, क्युबान, मेक्सिकन, टर्किश ब्राझीलियन इ. जे उंचीउंची तमाखू त्याचा संचय तेथें केलेला आहे, चवथ्या ग्यालरीवर निरनिराळ्या देशांतील सुग्रास पक्वान्नाची गर्दी झालेली असेल. तेथें प्रेक्षकांनीं अपेक्षित पक्वान्नाचें सेवन करून ढेंकरा द्याव्या व पोटावर हात फिरवीत फिरवीत पांचव्या तळघरांत उतरण्यासाठीं तयार व्हावें. त्या ग्यालरींत रुपें, लोखंड, शिसें, कोळसे इ. धातूंच्या खाणीचा व त्यांतील बोगद्यांत काम करीत असलेल्या लोकांचा वगैरे रमणीय देखावा दृष्टीस पडेल. ह्याच्या खालीं शेवटच्या मुक्कामाची ६ वी ग्यालरी लागेल. तेथें आह्मावर समुद्राच्या खालीं आपण आहों, व आपल्या डोकीवरून सागराच्या मोठमोठाल्या लाटा जात आहेत, असा प्रेक्षकांस भास होऊन त्याची चकभूल होऊन जाईल. ह्या ग्यालरींत वालुका पसरलेली असुन खडकेंही असतील. जणूं काय सागराच्या तळाशींच आपण आहों असें ती जागा पाहून क्षणैक प्रेक्षकांस वाटेल. या ठिकाणीं कृत्रिम प्रकाशाच्या योगानें दुसरी अशी एक मौज करावयाची आहे कीं आपण पाण्यामध्यें आहों, व आपल्या शेजारीं मोठाले देवमासे, मगर पाणहत्ती, वगैरे जलचरें तल्लीनतेनें जळक्रीडासक्त झालेलीं आहेत व कांहीं पाणबुडे समुद्राच्या तळीं बुड्या मारून तेथील प्रवाळ राशींतून सुंदर पोंवळीं काढून घेताहेत असें प्रेक्षकांस दिसावें व त्यांनीं आनंदातिरेकांत निमग्न होऊन जावें. या ग्यालरीच्या खालीं प्रेक्षकाची गति व्हावयाची नाहीं, तथापि त्याच्या खालीं विवर खणण्याचें काम धणाघाईनें चाललें आहे, ये ढेंच प्रेक्षकांस दिसेल. अशा रीतीनें या एक मैल खोलीच्या विवरांत सहा आसनें करून त्यावर जगांतील सर्वोत्कृष्ट वस्तुंची व रमणीय चमत्काराची फ्रेंच कारागीर केदणें करून बसविणार आहेत. त्याचें यत्किंचीत वर्णन ऐकूनच मन थक्क होऊन जातें. मग ज्या सुभाग्यांच्या दृष्टीस ही पृथ्व्यंतरगत लोकोत्तर चमत्कृतींची संवेव खाणी पडेल. त्याला फारच आनंद होणार आहे.

ठा० अ०

मिसिस लेस्टर नांवाच्या मडम बाईनें थोडे दिवसांपूर्वी गोव्यास आपल्या नवऱ्याचा खून केला होता त्या बाईस मुंबईच्या सेशन कोर्टांत १० वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा झाली.

मुंबई, पुणें, अलाहाबाद येथील ताबुतांचे सण तंटा फिसादी वाचून शांतपणें पार पडला. असें तेथून आलेल्या तारावरून समजतें.

दक्षिण हैद्राबादेस, एका मोठ्या दरोडखोरांचा नायक, फकीरी वेषानें फिरत असतां त्यास पकडलें आहे.

बंगाल प्रांतांतील चोवीस परगण्यांत वाफेची ट्राम्वे करण्याची वाटाघाट चालली आहे.

पंजाब युनिव्हर्सिटींत ५०० रुपये इनाम देण्याची तजवीज केली असून, तीं बक्षिसें, ढालीच्या रूपानें, उत्कृष्ट शारीरिक खेळ करणाऱ्या विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहेत

बिहार प्रांतांतील भागलपूर येथें डेपुटी माजिस्त्रेटनें एका अपराध्यास शिक्षा सांगितल्या बरोबर, त्यानें आपला जोडा काढून माजिस्त्रेटास लगावला. त्यावर ह्या दुसरा आरोप शाबीत झाला.

मणिपूर येथें बकरी इदीच्या दिवशीं मुसलमान लोक गोवध करणार होते. परंतु ही बातमी हिंदु लोकांनां समजतांच त्यांनीं धांवाधांव केली व तेथील दोघा युरोपियन लष्करी अधिकाऱ्यांनीं गायीच्या किंमतीचे २५ रुपये मुसलमानांस देऊन, गोवध होण्याचा टाळला.

जी. आय. पी. रेलवे कंपनीस एकंदर गेल्या वर्षांत, खर्च वजा जातां ऐन नफा १५,५२२२९ पौंडाचा झाला! तरी आशा आहेच.

पंजाब रेलवेनें, २४ रेलवेट्रेनी, धान्यानें भरून, तें धान्य विलायतेकडे जात असतें. दुष्काळ कां नाहीं पडणार!

हिंदुस्थानांत लष्करी कामावर येणाऱ्या इंग्लंडांतील लोकांच्या वरीं कांहीं तरी थापा मारून पैसे उपटनारी एक टोळी, तिकडे फार प्रसिद्धीस आली आहे. मुंबईच्या सोनेरी टोळीचीच ही बहीण आहे.

अमेरिकेंतील मोन्टाना प्रांतांत ग्रेट काल्स नांवाचें शहर आहे. तेथील सर्व प्रकारचीं यंत्रें, गाड्या वगैरे व्यवहार सर्व विजेच्या योगानें चालतो.

स० वि०

# जाहिरात

सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं कमेटीनें दररोजचे बाजारचे व्यवस्थे करितां म्युनिसिपाल कायद्याचें कलम ११६ ( इ ) प्रमाणें केलेल्या नियमां पैकीं नियम १ प्रमाणें मेहेरबान दिपुटी कमिशनर साहेब बहादूर जिल्हा अकोलें यांचे मान्यतेनें ताजनापेठेंतील दररोजचा भाजीबाजार आणि कसाई बाजार यांच्या खालीं लिहिलेल्या हद्दी म्युनिसिपाल कमिटीनें नमुद केल्या आहेतः—

( ताजनापेठेंतील दररोजचा भाजीबाजार जोरावरखाचे मशीदी समोर. )

पूर्वेस— कालेखा पैकुखा व करीमखा रोटीवाला यांचीं घरें.

दक्षिणेस— बुडनखा वल्लद हिदायतखा यांचें घर, बोळ व हसनखा वल्लद फरीदखा यांची पडीत जागा.

पश्चिमेस— काळ्या चबुऱ्या कडेस येणारी सडक, व पलिकडेस जोरावरखाची मैजत.

उत्तरेस— हुसेनखा वल्लद कालेखा यांचें घर, व बोळ.

कसाई बाजार

( ताजनापेठेंतील ओटपोष्टाचे मागें नाल्या खोदून नमुद करून ठेविलेली जागा)

पूर्वेस— पडीत जागा.

दक्षिणेस— खुली जागा व पलिकडेस इमारती.

पश्चिमेस— पडित जागा, विहीर व पलिकडेस महितापशा, राजमहद व नूरमहमद कागजी यांचीं घरें.

उत्तरेस— पडीत जागा.

सदर्हू चतुःसीमेचे जागेमध्यें १६ फुटाचा रस्ता ठेवून पश्चिमेकडील ७४×४० चा तुकडा गायकसाई यांचे दुकाना करितां व पूर्वेकडील ४०×७४ चा तुकडा बकरकसाई यांचे दुकाना करितां नमुद केला असून दोन्ही जाग्याच्या चौफेर सरहद्दीवर नाल्या खोदिल्या आहेत व दोन्ही बाजारचे पेंट्न्स १६ फुटी रस्त्या वरून केले आहेत.

भाजीबाजारचे हद्दींत सर्व प्रकारच्या भाज्या ( ताज्या किंवा वाळलेल्या ) कंदमुळें फळफळावळ (वाळलेलीं किंवा ताजीं) केळीचीं किंवा इतर पानें आणि फुलें या शिवाय इतर मालाची विक्री करूं नये.

कसाई बाजारचे हद्दींत मनुष्याचे खाण्यास योग्य प्राण्याचें मांस व मासोळ्या ( वाळलेल्या किंवा ताज्या ) विकाव्या या शिवाय दुसरे मालाची विक्री या जागेंत केली जाऊं नये.

या प्रमाणें दररोजच्या बाजारच्या हद्दीं मुक्रर केल्या आहेत या हद्दीचे बाहेर कोणीही कसायानें किंवा भाजी विकणारानें आपलीं दुकानें लावूं नयेत [illegible] कमिटीचे नियम [illegible] मोकदमे केले जातील. कळावें. ता० [illegible] इ०

Waman Narain Kale,
Secretary
Municipal Committee Akola,

# नाग, नरसे, व जिवत्या

आह्मी विक्री करितां नाग, नरसे, जिवत्या, व पिठोरी किंवा पाठोरा हीं चित्रें ठेविलीं आहेत. चित्रें फारच सुरेख व पहिल्या चित्रा पेक्षां त्यांत फरक करून व किंमतही कमी करून उत्तम प्रकारची छापलीं आहेत. ज्यांना पाहिजे असतील त्यांनीं खालील पत्यावर पैसे पाठविले असतां सदर्हू चित्राचे कागद पाठवून देऊं. किंवा व्हाल्यूपेबलनें पाठवूं. चित्राचा दर शेकडा १। रुपया प्रमाणें पडेल.

बाळकृष्ण अनंत कंपाझिटर
वऱ्हाडसमाचार छापखाना अकोला

SIMULTANEOUS EXAMINA-TION.

Notice of Motion
The House of Commons
1895

Mr. Naoroji— Civil Service ( India ) (Simultaneous open Competitive Examinations in England and India), —That, in the opinion of this House, in order to preserve and maintain the stability of British Power, the loyalty, confidence, contentment, and gratitude of the people of British India, to improve their material and moral condition, and to increase largely commercial and industrial benefits to the people of the United Kingdom, it is expedient that the solemn pledges of the Act of 1833, of the proclamation of 1858 after the Mutiny, of the Proclamation of 1877 on the assumption of the Imperial Title at the great Delhi Durbar, and of the further confirmation of these Proclamations on the Jubilee by Her Most Gracious Majesty the Queen and Empress of India, should be fulfilled by, among other reforms, giving effect to the Resolution adopted by this House on 3rd. June 1893, viz: That all open Competitive Examinations heretofore held in England alone for appointments to the Civil Services of India shall henceforth be held simultaneously both in India and England, such Examinations [illegible] both Countries being identical in their nature, and all who compete being finally classified in one list according to merit.

हिंदुस्थानांत ब्रिटिश अम्मल चिरस्थायी करण्यासाठीं, हिंदुस्थानांतील लोकांची राजनिष्ठा विश्वास आणि संतोष कायम ठेवण्यासाठीं त्यांची औद्योगिक आणि नैतिक स्थिति सुधारण्यासाठीं आणि त्याचे योगानें ब्रिटिश संयुक्त राज्याचा फायदा करण्यासाठीं, १८३३ च्या कायद्यांतील, बंडा नंतरच्या १८५८ सालच्या जाहिरनाम्यातील, १८७७ च्या दिल्ली दरबारच्या व. १८८७ सालीं जुबिली दरबारच्या वेळीं दिलेलीं वचनें पाळलीं पाहिजेत आणि १८९३ च्या जुन्या ३ च्या तारखेस [illegible] हिंदुस्थान [illegible] सारखी [illegible] केला तो अमलांत [illegible]."

☞ [illegible] येथें [illegible] बा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "[illegible]हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

नोटिशी बद्दल.
१० ओळींचे आंत रु० १
८ ओळीस .... ०१०६
दुसरे खेपेस .... .... ०१

# वऱ्हाडसमाचार.

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs.
Per line over 10 ... 4 as.
Repetition Per line 3 as.

THE BERAR SAMACHAR

VOL XXIX AKOLA MONDAY 22 JULY 1895 NO 28

वर्ष २९ आकोला सोमवार तारीख २२ माहे जूलै सन १८९५ इ० अंक २८

## नाग, नरसे, व जिवत्या

आह्मी विक्री करितां नाग, नरसे, जिवत्या, व पिठोरी किंवा पाठोरा हीं चित्रें ठेविलीं आहेत चित्रें फारच सुरेख व पहिल्या चित्रां पेक्षां त्यांत फरक करून व किंमतही कमी करून उत्तम प्रकारची छापलीं आहेत. ज्यांना पाहिजे असतील त्यांनीं खालील पत्यावर पैसे पाठविले असतां सदर्हू चित्राचे कागद पाठवून देऊं. किंवा व्हाल्यूपेबलनें पाठवूं चित्राचा दर शेकडा १। रुपया प्रमाणें पडेल.

बाळकृष्ण अनंत कपाळिशटर
वऱ्हाडसमाचार छापखाना अकोला

नंबर १४३

कोणी स्थानापन्न होते तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्या साठी सरटीफिकिट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयी जाहिरात.

सन १८८९ चा अक्ट ७ कलम प्रमाणें (वर्ग १५) वि. की. मि. नंबर ७ / १८९५

डिपुटी कमिशनर साहेब जिल्हा इलिचपूर यांचे कोर्टांत.

नांव देवीलाल
बापाचें नाव गिरधारीलाल मारवाडी
राहणार कापुसतळणी तालुके दर्यापूर
जिल्हा इलिचपूर यांस मयत

बिनराज बापाचें नांव गिरधारीलाल मारवाडी राहाणार कपुसतळणी तालुके दर्यापूर जि० इलिचपूर याचें कर्ज वसूल करिता ज्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून सदर्हू अर्जदार यानें अर्ज केला आहे त्याज करितां सदरहू मयत मनुष्याचे मालमिळकती वर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं त्यांणीं तारीख १० माहे आगष्ट १८९५ इसवी रोजीं सदर्हू अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपआपले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

तारीख ५ माहे जुलै सन १८९५ इ०

H. Godwin Austen.
Offg. Deputy Commissione
इलिचपूर
जिल्हा जज्ज

वऱ्हाडसमाचार

मिती आषाढ वद्य ३० शके १८१७

साधारण पणें लोकांचा समज असा असतो कीं पाणी प्यायला विहिरीचें जितकें चांगलें तितकें नदीचें नसतें. पण अलिकडील शास्त्रीय शोध असें सांगतात कीं विहिरीच्या पाण्यापेक्षां नदीचें गढूळ पाणी तिनशें पटीनें अधीक चांगलें होय. मि० हांकिन नांवाचे डाक्टर वायव्य प्रांतांत आहेत त्यांनीं गंगा, यमुना, गोग्रा गोमटी इत्यादि नद्यांचें गढूळ पाणी तपासून पाहिलें तेव्हां असें कळलें कीं हें पाणी विहिरीच्या पाण्या पेक्षां फार बरें! विहिरीच्या पाण्यांत सूक्ष्म किडे व जीवजंतु जितके आढळतात तितके नदीच्या गढूळ पाण्यांत आढळत नाहींत. हे किडे किंवा जंतु ह्मणजे उदकान्तर्गत बीज रूपानें असलेल्या दुखण्यांचीं व पटकीचीं माहेर घरें होत. डाक्टर हांकिन असेंही ह्मणतात कीं युरोपांतील तलावांचें व सरोवराचें निर्मळ काळेभोर पाणी देखील नदीच्या गढूळ पाण्याच्या मानानें अगदीं तुच्छ आहे. नदीचें पाणी इतकें पसंत असण्यास ते कारण हें लावितात कीं सूर्य प्रकाशाच्या तेजानें, उष्णतेच्या प्रखरतेनें आणि पाण्याचा संचय मोठा व प्रवाह वेगवान असल्यामुळें सूक्ष्म जंतु नदीच्या पाण्यांत जगत नाहींत आणि विहिरीच्या पाण्या संबंधानें प्रकार उलट असतो. नदीचा ओघ चांगला वाहता असला आणि तिच्यांतील जलसंचय प्रवाहाच्या जोरानें बदलत गेला ह्मणजे तें पाणी दिसण्यांत मध्यम दिसलें तरी तें पिण्याला अधिक रुचिकर व आरोग्यरक्षक होय.

तीन वर्षां पूर्वीं आकोल्यास पिण्याच्या पाण्या संबंधानें मोठा प्रश्न पडला होता. राव साहेब देवराव देवराव विनायक त्या वेळीं मुनसिपालिटीचे व्हाइस चेअरमन होते. पुष्कळांचा समज नदीच्या पाण्या विषयीं प्रतिकूळ होता आणि त्यामध्यें मुख्य अग्रेसर डाक्टर रेली सिव्हिल सर्जन हे होते. राव साहेब देवराव विनायक यांस नदीचें पाणी अधिक पसंत असे. त्यांचा अनुभव त्यांस नदीचें पाणी बरें ह्मणून सांगे आणि डाक्टर रेली त्याच पाण्याचा निषेध करीत. तेव्हां या वादाचा निर्णय करण्या करितां आठ दहा विहिरींचें पाणी निरनिराळ्या बाटल्यांत भरलें आणि एक बाटली नदीच्या पाण्यानेंही भरली. शास्त्रीय रीत्या त्या बाटल्यांचें परीक्षण डाक्टर रेली यांनीं केलें आणि त्यांत जी बाटली पसंत ठरली ती नदीच्याच पाण्याची होती. सारांश, नदीचें पाणी पुष्कळ गुणांनीं विहिरीच्या पाण्यापेक्षां चांगलें असें ठरतें.

---

हल्लीं तीन चाकी व दुचाकी पायगाड्यांचा मोठा प्रसार झाला आहे. मुंबई पुण्याकडे या पुष्कळ दृष्टीस पडतात. आमच्या प्रांतीं मुख्य मुख्य शहर गांवीं यावर बसून कोणी जातांना दृष्टीस पडला ह्मणजे मोठ्या मौजेनें प्रेक्षक क्षणभर थक्क होतो. या गाड्यांचें अद्याप बहुत नवल वाटतें कां कीं या प्रांतीं त्याचा उपयोग फार करून होत नाहीं. या गाड्या पायानें चालवावयाच्या असतात पण चालण्याच्या श्रमा पेक्षां गाडी चालविण्याचे श्रम कमी पडतात आणि अधिक वेगानें स्थलान्तर होत असतें. तिचाकी गाडी पेक्षां दुचाकी फार जलद चालते आणि हा वेग इतका असतो कीं त्यापुढें इतर गाड्या घोड्यांचा कांहीं निभाव लागत नाहीं. सांप्रतच्या काळाला खर्चाच्या मानानें पाहतां या पायगाड्या चैनीच्या प्रकरणांतल्या आहेत. सध्यां ही ऐषआरामाची बाब दिसते पण कांहीं काळानें उद्योग पुष्कळ वाढले व वेळेची किंमत वाढली व गाड्या स्वस्त झाल्या ह्मणजे या गाड्या फार सुखकर वाटतील. याच पायगाड्यांत नवीन सुधारणा झाल्या पासून ह्या गाड्या पायाच्या बळानें न चालतां रॉकेल तेलाच्या ग्यासानें चालतात. तीन चाकी गाड्या किंवा 'डाग कार्ट' नांवाची हलकी घोड्याची गाडी असते ती ही या ग्यासानें आपोआप चालते. या सुधारणेमुळें कांहीं कालान्तरानें बैल घोडे वगैरे जनावरांची जरूर राहणार नाहीं. आगगाडी निघाल्यामुळें इतर वाहनें बंद होऊन लोकांच्या सोयी बहुत वाढल्या व प्रवासही जलदीनें होतो त्या प्रमाणें पायगाड्यांना हा लोखंडी घोडा धांवूं लागला आणि तो ग्यासच्या जोरानें आपोआप चालू लागला ह्मणजे एका प्रकारची वाहना संबंधानें विचित्र सृष्टी दिसून पडेल. हीं यंत्रें व या युक्त्या विलायतेंत किंवा अमेरिकेंत निर्माण होतात. आपल्या देशांत यांचा गंधही नाही हें आपल्या लोकांचें दुर्भाग्य होय. यांत्रिक कलेचें ज्ञान या देशांत नसल्यांतच जमा आहे आणि त्यामुळें शोधकांचा ही अभावच आहे!

---

इंडियाचे फडणीस सर वेस्टलांड यांच्या बजेटवर इंडियन पार्लमेंटरी कमिटीच्या वतीनें सर डब्ल्यू वेडरबर्न यांनीं एक उत्तम निबंध लिहून तो पत्रव्यवहाराच्या रूपानें स्टेट सेक्रेटरी नामदार फौलर यांजकडे विचारासाठीं धाडला. प्रधानमंडळ बदललें तरी या लेखाविषयाचें मनन केलेंच पाहिजे. सर डब्ल्यू वेडरबर्न यांच्या लेखांचा सारांश येणें प्रमाणें:—

सन १८९४-९५ सालच्या बजेटांचा पूर्ण विचार करितां आमचा अभिप्राय ठाम झाला आहे कीं (१) हल्लीच्या तुटीला एकच कारण किंवा मुख्य कारण हुंडणावळीचा जबर भाव हें आहे ह्मणून हिंदुस्थान सरकार समजतात ही मोठी चूक आहे आणि (२) तूट पडण्याचें खरें कारण अवाढव्य लष्करी व सिव्हील खात्यांचा वाढता खर्च हें होय. सन १८९५-९६ सालच्या बजेटा वरून तर वरील दोन्ही सिद्धान्त खरे ठरतात आणि सरहद्दीवर चाललेल्या गोष्टी व चित्रळची लढाई यांनीं तर स्पष्ट होतें कीं जो पर्यंत सरहद्दी संबंधानें राजकीय प्रकरणें अशींच चालूं आहेत तों पर्यंत खजिन्याची स्थिती अधिकाधिक भयंकर होत जाईल. नंतर १८९४—१८९५ व १८९५—९६ या सालांच्या बजेटांतील आंकडे घेऊन असें सिद्ध केलें आहे कीं सर वेस्टलांड निष्पक्षपातानें न लिहितां लपंडाव, धरसोड व डोळेझांक फार करितात आणि गारुड्याच्या खेळा प्रमाणें विलक्षण तऱ्हेनें आंकडे मोडतात आणि भलतेच तर्क बसवितात. सन १८८२—८३ साला पासून बारीक दृष्टीनें पाहिलें असतां लष्करी व सिव्हील खर्चांतील अनुवार्षिक वाढवा चांगला लक्षांत येतो आणि या वाढीला कारण हुंडणावळीचें नाहीं असें स्पष्ट दिसत आहे. आणि राष्ट्रावर असलेलें कर्ज कमी न होतां उत्तरोत्तर वाढतच आहे. इंडियन पार्लमेंटरी कमिटीच्या ह्मणण्याचा योग्य विचार स्टेट सेक्रेटरीनीं न केल्यामुळें सर वेस्टलांड यांनीं इंडिया कौंसिलांत फुशारकी मारली कीं स्टेट सेक्रेटरींनीं बजेटावरील आक्षेपकांच्या अभिप्रायांचा जितका अव्हेर करावयाचा तितका केला आहे. स्टेट सेक्रेटरीचें दुर्लक्ष्य व सर वेस्टलांडचे उद्गार निराळाच बोध करितात. विनंती इतकीच कीं पार्लमेंटरी कमिटीचा असा तिरस्कार होऊं नये आणि कामन्स सभेंत इंडियाच्या जमाखर्चाचा चांगला खल होईल अशी तजवीज व्हावी. आतां हें खरें कीं कारणपरत्वें हिंदुस्थान सरकारास खर्च सिव्हील व लष्करी वाढवावे लागतात परंतु ते हल्लीं अतोनात, अमर्यादपणें, व बिनजबाबदारीनें वाढविले जातात हें वाईट आहे. हीच पद्धत चालूं ठेविल्यास खर्च प्रजेच्या शक्ती बाहेर गेले आहेत ते अधिकच जातील आणि ब्रिटिश राज्याच्या सुरक्षितपणाला व आबादानीला फार घातुक होतील. वेळेवरच उपाय योजण्यांत आला तर फार बरें!

---

रा० रा० विद्याधर वामन भिडे बी. ए. यांनीं विधवाविवाहाच्या विषयाचा विचार एका निराळ्याच दृष्टीनें केला आहे आणि त्यावर त्यांनीं रत्नागिरीस एक सुरस व्याख्यान दिलें त्याच्या उत्तरार्धांत त्यांनीं आपल्या ह्मणण्याचा एकंदरीनें गोषवारा देऊन खालील सात गोष्टी सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे ते ह्मणतात कीं:—

(१) विधवांचा पुनर्विवाह करण्याचा प्रघात पडला तर कांहीं अधिक कन्यका अविवाहित राहू लागतील आणि कांहीं अधिक पुरुष पुनर्विवाहामुळें विवाहित होतील. तूर्त पुनर्विवाहाची पद्धत चालूं नसतांना जितक्या पुरुषांना अविवाहित राहावें लागतें त्यांच्या पाव पटीपेक्षां किंचित् अधिक इतक्या

इतक्या प्रमाणानेंच फार झालें तर पुनर्विवाहाची रीत सुरू केली असतां उपवर मुली राहतील.

(२) पूर्वी कारण नसतांना पुष्कळच स्त्रीपुरुषांना अविवाहित रहावें लागत होतें परंतु आतां ह्या मानानें पाहिलें असतां अविवाहितांची संख्या फार थोडी राहील व ती राहण्याचा संभव स्त्रियांच्याच संबंधानें. आणि इतकें थोडें प्रमाण देखील जें राहतें तें राहणारच व त्याला इलाज नाहीं;

( ३ ) या मानानें ज्या अविवाहित स्त्रिया राहतील त्यांत पंधरा वर्षांहून कमी वयाच्या मुली पुष्कळ असणार; तेव्हां अर्थात त्यांच्या संबंधानें दुष्ट अनाचार घडण्याची मुळींच भिती नाहीं.

(४) आतां ह्या वेळपर्यंत आपण असें गृहीत धरलें आहे कीं प्रत्येक विधवेचा पुनर्विवाह होईल; तरी पण व्यवहारदृष्ट्या दिसून येईल कीं पुष्कळ विधवा आपणच होऊन पुनर्विवाहापासून अलिप्त राहतील. कारण कीं पती विषयीं प्रेम व पुज्यबुद्धि इतकी दृढपणें त्यांच्या हृदयीं वास करिते कीं पुनर्विवाहाचा शद्ध देखील त्या साध्वी कानावर पडूं देणार नाहींत आणि लेकरा बाळांचें संगोपनांतच आनंद मानणाऱ्या आया पुष्कळ आढळतात तेव्हां अर्थातच साधारणपणें वराची कमतरता असल्यामुळें उपवर राहण्याचा प्रसंग येईल किंवा नाहीं याची वानवाच आहे.

(५) संसारसुखाचा ज्यांना अनुभव घेतला आहे अशा पुष्कळ विधवांचें मन पुनर्विवाहाकडे वळणार नाहीं. आणि संसारांत अनेक यातना आहेत अशी ज्यांची खात्री झाली आहे अशा स्त्रियांस पुन्हा संसारसुखाच्या यातना मागण्याची इच्छाही होणार नाहीं.

[६] मुलींना वर मिळण्याची जरी पंचाइत पडूं लागली तरी एकंदरींत शेवटीं हा प्रकार परिणामीं सुखावह होईल कारण त्या मुळें लग्न करण्याच्या वयाची इयत्ता वाढेल. अशा प्रकारानें लग्नाच्या वयाची हद्दता वाढलेली आहे असें ज्या जातींत स्त्रियांची संख्या पुरुषाहून अधिक आहे अशा कांहीं जातींच्या उदाहरणावरून व्यक्त होत आहे. आणि उशिरा लग्न करण्याचा प्रघात मोडण्यापेक्षां तो अधिक वाढविणें हेंच इष्ट आहे.

आणि शेवटीं, उशिरां लग्न करण्याचा पद्धत पडली तर मुलींना पुष्कळ वर्षें पर्यंत शाळेंत शिकतां येईल व हीही एक सुधारणाच होईल.

हे वरील सात सिद्धांत विचार करण्यासारखे आहेत व राजश्री विद्याधरपंतांनीं जे परिश्रम केले ते वाखाणण्यासारखे आहेत. कोणाचें मत कसेंही असो, एखादा विषय हातीं घेऊन परिशिलन करून त्या विषयींचे आपले विचार लोकांपुढें प्रगट करणें ह्मणजे दीर्घ व स्तुत्य उद्योग आहे व असाच उद्योग आमचे वाचक करितील तर आपल्या समाजास अनेक गोष्टी लहान मोठ्या महत्वाच्या कळून येतील व त्यामुळें समाजाची स्थिती बदलून खरी सुधारणा ह्मणजे काय याचें मूर्तिमंत उदाहरण आपला समाज होईल.

---

मनुष्यमात्राचे मनोरथ कधीं वेगवान व कधीं निश्चल असतात. नयापनया प्रमाणें मनोरथ कधीं भरारी मारतांना दृष्टीस पडतात किंवा सर्वच विलयाप्रत जातात. हल्लीं पार्लमेंटच्या सभासदांची जी निवडानिवड चालली आहे तिच्या अनिश्चितपणामुळें व बऱ्या वाईट निकालामुळें आपल्या मनोवृत्ति अगदीं उचंबळल्या सारख्या होतात व कधीं हर्षभरित व कधीं शोकाकुल होतात. लार्ड रोझबरीचें प्रधान मंडळ बदलले, लार्ड सालिसबरी मुख्य प्रधान झाले आणि पार्लमेंट ही बरखास्त झालें तेव्हां पासून आपल्या देशाचे योग कांही चांगलेसे दिसत नाहींत. कान्सरव्हेटिव पक्षाची सरशी विशेष दिसते. आपल्या देशाचे खरे मित्र असे निवडलेल्या मंडळीं मध्यें थोडे आहेत. नामदार आल्फ्रेड वेब व नामदार स्वान साहेब हीं व आणखी कांहीं नांवें निवडलेल्या सभासदांमध्यें आढळतात पण निराशेच्या गोष्टी बहूत ऐकूं येतात.

हिंदुस्थानचे वृद्ध पितामह दादाभाई नवरोजी हे निवडले गेले नाहींत आणि त्याच प्रमाणें बाबू उमेशचंद्र बानरजी पराभूत झाले. मि. मंचरजी भावनगरी यांस बहूमतानें निवडण्यांत आलें आणि हे इंडियांतले आहेत हें खरें तथापि त्यांच्या विचारांच्या धोरणा वरून आणि अप्रसिद्ध चरित्रा वरून ते इंडियाच्या वतीनें सभासद आहेत असें मात्र आमच्यानें ह्मणवत नाहीं. चालूं निवडणुकींत आपल्या देशाचा मोठाच तोटा झाला आणि हा तोटा मापतां येण्या सारखा नसून अपरिहार्य आहे. १८९२ सालीं नामदार दादाभाई निवडले गेले त्या वेळचा तो आनंदसागर कोणीकडे! आतां सर्व प्रयत्न हरल्या मुळें निराशेनें अगदीं मंडावून सोडलें आहे. आमच्या देशाच्या सर्व आशा लिबरल प्रधानमंडळावर आहेत आणि सध्यां रंग तर कान्सरव्हेटिव प्रधानमंडळ होण्याचा दिसतो. वास्तविक पहातां, आह्मांस कोणताही पक्ष सारखाच आहे पण आजपर्यंतच्या अनुभवा वरून असें वाटतें कीं आपल्यास कांहीं गोष्टी लाभल्या तर लिबरल प्रधानकीच्याच कारकीर्दींत मिळतील. मनुष्याच्या चरित्रांत जसा नेहमीं अव्याहत सारखा सुखाचा काळ येत नाहीं तसा राष्ट्राच्या इतिहासांतही प्रकार आढळतो. इंडियन राष्ट्राला मध्यंतरीं योग चांगला आला होता पण सध्यां बिकट प्रसंग दिसतो! मनुष्यानें प्रयत्नवादी असलें पाहिजे आणि प्रयत्नाच्या सातत्यानें अशक्य वाटलेल्या गोष्टी फलद्रुप होतात हें विसरतां कामा नये.

---

बडोद्याच्या राज्यकारस्थानांत मोठा बखेडा माजला आहे. दोन पक्ष मुख्य आहेत: एक गुजराथी मंडळीचा व दुसरा दक्षिणी मंडळीचा. दोन्ही पक्ष परस्परांच्या उखाळ्या पाखाळ्या काढीत आहेत. कित्येक गुजराथी इतक्या थराला पोंचले आहेत कीं दक्षिणी गृहस्थ पाहिल्या बरोबर त्यांचें मस्तक भडकतें. उलट पक्षीं असाच मासला आढळतो. उभयतांचे तंटे विकोपास गेले आहेत, बडोदे संस्थानांतील अधिकाराच्या व हुद्याच्या जाग्यावर भरती करितांना ज्याचा हात साधतो तो आपल्याच पक्षीयांची योजना त्या त्या जागीं करितो. थोडा बहुत हा मनुष्यस्वभावच आहे कीं जो तो प्रथम आपल्या पाया पुरतें पाहतो, जरा दृष्टी लांबली तर स्वकीय आप्तांच्या कल्याणाकडे मनुष्य लक्ष पुरवितो आणि अधिकार मोठा हातीं असला तर आपापल्या पक्षाचे, गांवचे व प्रांताचे ओळखीचे लोकांची संभावना करीत असतो. तेव्हां तंजावरचे सर माधवराव दिवाण होते त्यावेळीं मद्रासेकडील लोक बडोदे शाहींत नोकर चाकर झाले किंवा रा. रा. मणिभाई दिवाण असल्यामुळें गुजराथी लोकांचें प्राबल्य वाढलें यांत कांहीं नवल नाहीं. सर्वच दुनियेंत हे भेदाभेद व आपपरभाव थोड्या बहुत प्रमाणानें अवलोकनांत येतात पण तशांत एखादी गोष्ट पराकाष्ठेच्या शिखरास पोंचली ह्मणजे लोकांची मनें खवळून दूषित होतात. आणि मग छिद्रान्वेषणाची धामधूम होते. बापट प्रकरणानें कांहीं मत्सरी लोकांस ऊत आल्या सारखें झालें आहे. हल्लीं खुद्द गायकवाड सरकारानें ज्या मुख्य मुख्य नेमणुका केल्या आहेत त्या गुजराथी मंडळीस न आवडल्यामुळें हताश लोकांनीं आकाश पाताळ एक करण्याचा घाट घातला आहे.

श्रीमंत महाराज सयाजीराव चांगले शिकलेले आहेत. त्यांच्या पाशी दक्षिणी किंवा गुजराथी हा फरक नाहीं. किंचित् असला तरी तो अणुरेणू इतका दृश्यमान असेल आणि क्षम्यही आहे. विलायतच्या सफरी श्रीमंतांनीं पुष्कळ केल्या आहेत आणि त्यांच्या मतांतील जातिभेद वगैरे फरक पर्यटणाच्या अनुभवानें उदार शीलानें व वैभवशालित्वानें लयासच पोंचल्या प्रमाणें आहेत गायकवाड दरबारांत हल्लीं मत्सर व स्पर्धा वाढली आहे हें ते ओळखून असतीलच आणि कार्याच्या श्रेष्ठ स्वरूपा प्रमाणें सर्व दरबार सुस्थितीला लवकर आणतील अशी आह्मी उमेद बाळगतों.

---

हिंदुस्थानांत कापूस विपूल पिकतो आणि त्याचें कापडही या देशीं बहुत बनत होतें. या देशांत नानाविध, उंची उंची व मौल्यवान वस्त्रें काढविण्याचे माग पुष्कळ होते. आणि मागाच्या कामांतले कुशल कोष्टी लोकही पुष्कळ होते. कापसाच्या व्यापार व तज्जन्य वस्त्रप्रावर्णाचा व्यापार हे इतके मोठे होते कीं सर्व राष्ट्र त्या व्यापारावर सावरत असें आणि बाहेर द्वीपान्तरींही आपल्या देशाचा माल जात असे. पूर्वीं दळणवळण थोडें आणि व्यापाराच्या सोयीही अगदीं थोड्या असें असूनही कोट्यावधि रुपयांचा माल हिंदुस्थानांतून बाह्य देशीं जात होता. या देशाचा कपडा मोठा नामांकित होता. देशाला लागेल तितका तयार होऊन त्या खेरीज बाहेर द्वीपान्तराला माल धाडण्यास पूर्वीं साधन असे' हिंदुस्थानच्या सांपत्रिक वैभवाला कारणीभूत असा हा कापसाच्या वस्त्रांचा व्यापार होता.

पण सांप्रत या व्यापाराची स्थिति किती शोचनीय आहे बरें! हा इतिहास अत्यंत मनन करण्या सारखा आहे. हा इतिहास ह्मणजे अव्वल इंग्रजी पासून इंग्लिश बनियेशाहीची साद्यंत कथा होय. हा इतिहास राज्यकर्त्यांच्या कर्तबगारीनें असा बनला आहे कीं एका पुराणप्रसिद्ध राष्ट्राचा अत्यंत ऱ्हास झाला व एक नवीन राष्ट्र वैभवाशिखरावर चढलें. व्यापारोन्नतीचीं कारणें एका राष्ट्रांत अस्तंगत झालीं आणि दुसऱ्यांत उदयास येत चाललीं. कापसाच्या व्यापाराची मूळपीठिका एक उत्तम धडा शिकविते. साम्पतिक वैभव राष्ट्राच्या चिरायुपणाला, अवादानीला व सुखसमृद्धीला मूळ कारणभूत असतें. इंग्रजी झाल्या पासून आपल्या देशाचें साम्पतिक वैभव लयास जात चाललें. इंग्रजी राज्यानें अद्भुत गोष्टी पुष्कळ या देशांत झाल्या आहेत तथापि मूलतत्व शोधिलें असतां इंग्लंडच्याच फायद्याला वरील सर्व गोष्टी मदत करितात असें दिसून येतें. कायानें सर्व रचना उलटीच झाली. हिंदुस्थानचे माग वगैरे बसले आणि विलायतचे कारखाने झपाट्यानें चालूं लागले. हिंदुस्थानांत पिकलेला कापूस विलायतेस जावूं लागून तिकडून वस्त्रप्रावरणाच्या रूपानें येऊं लागला. आणि हा आंतबाह्याचा व्यापार इतका प्रचंड वाढला आहे कीं, जगामध्यें अश्रुतपूर्व यंत्रालयांचा कारखाना विलायतेस चालला आहे.

इंग्रजी बनियेशाही अगदीं पूर्णतेस गेलेली आहे. हिंदुस्थानचा व्यापार बुडाला आणि विलायत त्याच व्यापारावर तरली. तथापि महात्वाकांक्षा, स्पर्धा व मत्सर हीं इंग्लिशांच्या हृदयामध्यें रात्रंदिवस नाचत आहेत आणि त्यामुळें कापडाचा व्यापार अन्य ठिकाणीं चालू झाल्यास तो बंद पाडण्यात आमचे राज्यकर्ते तत्पर असतात व त्यासाठीं हरतऱ्हा करितात. या हरतऱ्हा मध्यें अप्रतिबंध व्यापाराची एक गुरुकिल्ली उत्तम राज्यकर्त्यांच्या हातीं आहे. तिच्या साह्यानें सर्व विघ्नें टाळतां येतात. हल्लीं विलायतच्या यंत्रालयाची स्थापना इंडियांत होऊन थोडाबहुत कांहीं ओबड धोबड जाडा भरडा कपडा हिंदुस्थानांत तयार होऊं लागला आहे. पण तितक्याच व्यापारवृद्धीनें मांचेस्टर वाल्यांच्या व अन्य सर्व इंग्लिशांच्या हृदयांत निराळाच उजेड पडला आहे. त्यांस असें वाटतें कीं हिंदुस्थानचे यांत्रिक माग पुष्कळ झाले व सतत चालूं लागले ह्मणजे विलायतच्या पोटावर पाय आल्या प्रमाणेंच आहे. ही दहशत कांहीं छोटी नाहीं. या इंडियन व्यापराला खो देण्यास राज्यकर्ते काडीमात्र चुकत नाहींत आणि व्हाइसरायच्या कौंसिलद्वारास स्वतांच्या कृतीची चूक दिसली तथापि ते स्टेट सेक्रेटरीचा हुकूम ह्मणून वाटेल ती गोष्ट कायद्याच्या रूपानें अंमलात आणितात. हिंदुस्थानच्या खजिन्यांतली तूट भरून काढण्या[illegible] जे. आर. [illegible] कातीचा कायदा केला तेव्हां [illegible] सुतावर व कपड्यावर इतर जिन्नसा बरोबर जकात बसवावी लागली. ही जकात बंद करण्यासाठीं विलायतच्या लोकांनीं नाना खटपटी केल्या पण सर्व प्रयत्न हरले आणि जकात कायम झाली. तेव्हां विलायती मालापेक्षां इंडियन कपडा स्वस्त विकला जाईल ही ओरड केली आणि विलायतच्या भारी नंबराच्या सुता पेक्षां अगदीं कनिष्ठ प्रकारच्या नंबरच्या सुतावरही निराळी जकात बसविण्यांत आली. हा अप्रतिबंध व्यापाराचा अनुग्रह होय. विलायती कपडा २५ नंबराच्या सुतापासून तों वरील नंबराच्या सुताचा असू

इतक्या प्रमाणानेंच फार झालें तर पुनर्विवाहाची रीत सुरू केली असतां उपवर मुली राहतील.

(२) पूर्वी कारण नसतांना पुष्कळच स्त्रीपुरुषांना अविवाहित रहावें लागत होतें परंतु आतां ह्या मानानें पाहिलें असतां अविवाहितांची संख्या फार थोडी राहील व ती राहण्याचा संभव स्त्रियांच्याच संबधानें. आणि हतकें थोडें प्रमाण देखील जें राहतें तें राहणारच व त्याला इलाज नाहीं;

( ३ ) या मानानें ज्या अविवाहित स्त्रिया राहतील त्यांत पंधरा वर्षांहून कमी वयाच्या मुली पुष्कळ असणार; तेव्हां अर्थात त्यांच्या संबधानें दुष्ट अनाचार घडण्याची मुळींच भिती नाहीं.

(४) आतां हा वेळपर्यंत आपण असें गृहीत धरलें आहे कीं प्रत्येक विधवेचा पुनर्विवाह होईल; तरी पण व्यवहारदृष्ट्या दिसून येईल कीं पुष्कळ विधवा आपणच होऊन पुनर्विवाहापासून अलिप्त राहतील. कारण कीं पती विषयीं प्रेम व पुज्यबुद्धि इतकी दृढपणें त्यांच्या हृदयीं वास करिते कीं पुनर्विवाहाचा शब्द देखील त्या साध्वी कानावर पडूं देणार नाहींत आणि लेकरा बाळांचें संगोपनसंरक्षण आनंद मानणाऱ्या आया पुष्कळ आढळतात तेव्हां अर्थातच साधारणपणें वराची कमतरता असल्यामुळें उपवर राहण्याचा प्रसंग येईल किंवा नाहीं याची वनवाच आहे.

(५) संसारसुखाचा ज्यांना अनुभव घेतला आहे अशा पुष्कळ विधवांचें मन पुनर्विवाहाकडे वळणार नाहीं. आणि संसारांत अनेक यातना आहेत अशी ज्यांची खात्री झाली आहे अशा स्त्रियांस पुन्हा संसारसुखाच्या यातना मागण्याचा इच्छाही होणार नाहीं.

[६] मुलींना वर मिळण्याची जरी पंचाइत पडूं लागली तरी एकंदरींत शेवटीं हा प्रकार परिणामीं सुखावह होईल कारण त्यामुळें लग्न करण्याच्या वयाची इयत्ता वाढेल. अशा प्रकारानें लग्नाच्या वयाची इयत्ता वाढेली आहे असें ज्या जातींत स्त्रियांची संख्या पुरुषाहून अधिक आहे अशा कांहीं जातीच्या उदाहरणावरून व्यक्त होत आहे. आणि उशिरा लग्न करण्याचा प्रघात मोडण्यापेक्षां तो अधिक वाढाविणें हेंच इष्ट आहे.

आणि शेवटीं, उशिरां लग्न करण्याचा पद्धत पडली तर मुलींना पुष्कळ वर्षें पर्यंत शाळेंत शिकतां येईल व हीही एक सुधारणाच होईल.

हे वरील सात सिद्धांत विचार करण्यासारखे आहेत व राजश्री विद्याधरपंतांनीं जे परिश्रम केले ते वाखाणण्यासारखे आहेत. कोणाचें मत कसेंही असे, एखादा विषय हातीं घेऊन परिशिलन करून त्या विषयींचे आपले विचार लोकांपुढें प्रगट करणें ह्मणजे दीर्घ व स्तुत्य उद्योग आहे व असाच उद्योग आमचे वाचक करितील तर आपल्या समाजास अनेक गोष्टी लहान मोठ्या महत्वाच्या कळून येतील व त्यामुळें समाजाची स्थिती बदलून खरी सुधारणा ह्मणजे काय याचें मुर्तिमंत उदाहरण आपला समाज होईल.

---

मनुष्यमात्रांचे मनोरथ कधीं वेगवान व कधीं निश्चल असतात. ज्याप्रमाणें मनोरथ कधीं भरारी मारतांना दृष्टीस पडतात किंवा सर्वच विलयाप्रत जातात. हल्लीं पार्लमेंटच्या सभासदांची जी निवडानिवड चालली आहे तिच्या अनिश्चितपणामुळें व वऱ्या वाईट निकालामुळें आपल्या मनोवृत्ति अगदीं उचंबळल्या सारख्या होतात व कधीं हर्षभरित व कधीं शोकाकुल होतात. लार्ड रोझबरीचें प्रधान मंडळ बदललें, लार्ड सालिसबरी मुख्य प्रधान झाले आणि पार्लमेंट ही बरखास्त झालें तेव्हां पासून आपल्या देशाचे योग कांहीं चांगलेसे दिसत नाहींत. कान्सरव्हेटिव पक्षाचा सरशी विशेष दिसते. आपल्या देशाचे खरे मित्र असे निवडलेल्या मंडळीं मध्यें थोडे आहेत. नामदार आल्फ्रेड वेब व नामदार स्वान साहेब हीं व आणखी कांहीं नांवें निवडलेल्या सभासदांमध्यें आढळतात पण निराशेच्या गोष्टी बहूत ऐकूं येतात.

हिंदुस्थानचे वृद्ध पितामह दादाभाई नवरोजी हे निवडले गेले नाहींत आणि त्याच प्रमाणें बाबू उमेशचंद्र बानरजी पराभूत झाले. मि. मंचरजी भावनगरी यांस बहूमतानें निवडण्यांत आलें आणि हे इंडियांतले आहेत हें खरें तथापि त्यांच्या विचारांच्या धोरणा वरून आणि अप्रसिद्ध चरित्रा वरून ते इंडियाच्या वतीनें सभासद आहेत असें मात्र आमच्यानें ह्मणवत नाहीं. चालू निवडणुकींत आपल्या देशाचा मोठाच तोटा झाला आणि हा तोटा मापतां येण्या सारखा नसून अपरिहार्य आहे. १८९२ सालीं नामदार दादाभाई निवडले गेले त्या वेळचा तो आनंदसागर कोणीकडे! आतां सर्व प्रयत्न हरल्या मुळें निराशेनें अगदीं भंडावून सोडलें आहे. आमच्या देशाच्या सर्व आशा लिबरल प्रधानमंडळावर आहेत आणि सध्यां रंग तर कान्सरव्हेटिव प्रधानमंडळ होण्याचा दिसतो. वास्तविक पहातां, आह्मांस कोणताही पक्ष सारखाच आहे पण आजपर्यंतच्या अनुभवा वरून असें वाटतें कीं आपल्यास कांहीं गोष्टी लाभल्या तर लिबरल प्रधानकीच्याच कारकीर्दींत मिळतील. मनुष्याच्या चरित्रांत जसा नेहमीं अव्याहत सारखा सुखाचा काळ येत नाहीं तसा राष्ट्राच्या इतिहासांतही प्रकार आढळतो. इंडियन राष्ट्राला मध्यंतरीं योग चांगला आला होता पण सध्यां बिकट प्रसंग दिसतो! मनुष्यानें प्रयत्नवादी असलें पाहिजे आणि प्रयत्नाच्या सातत्यानें अशक्य वाटलेल्या गोष्टी फलद्रुप होतात हें विसरतां कामा नये.

---

बडोद्याच्या राज्यकारस्थानांत मोठा बखेडा माजला आहे. दोन पक्ष मुख्य आहेत: एक गुजराथी मंडळीचा व दुसरा दक्षिणी मंडळीचा. दोन्ही पक्ष परस्परांच्या उखाळ्या पाखाळ्या काढीत आहेत. कित्येक गुजराथी इतक्या थराला पोचले आहेत कीं दक्षिणी गृहस्थ पाहिल्या बरोबर त्यांचें मस्तक भडकतें. उलट पक्षीं असाच मासला आढळतो. उभयतांचे तंटे विकोपास गेले आहेत, बडोदे संस्थानांतील अधिकाराच्या व हुद्याच्या जाग्यावर भरती करितांना ज्याचा हात साधतो तो आपल्याच पक्षीयांचि योजना त्या त्या जागीं करितो. थोडा बहुत हा मनुष्यस्वभावच आहे कीं जो तो प्रथम आपल्या पाया पुरतें पाहतो, जरा दृष्टी लांबली तर स्वकीय आप्तांच्या कल्याणाकडे मनुष्य लक्ष पुरवितो आणि अधिकार मोठा हातीं असला तर आपापल्या पक्षाचे, गांवचे व प्रांताचे ओळखीचे लोकांची संभावना करीत असतो. तेव्हां तंजावरचे सर माधवराव दिवाण होते त्यावेळीं मद्रासेकडील लोक बडोदे शाहींत नोकर चाकर झाले किंवा रा. रा. मणिभाई दिवाण असल्यामुळें गुजराथी लोकांचें प्राबल्य वाढलें यांत कांहीं नवल नाहीं. सर्वच दुनियेंत हे भेदाभेद व आपपरभाव थोड्या बहुत प्रमाणानें अवलोकनांत येतात पण तशांत एखादी गोष्ट पराकाष्ठेच्या शिखरास पोचली ह्मणजे लोकांची मनें खवळून दूषित होतात. आणि मग छिद्रान्वेषणाची धामधूम होते. बापट प्रकरणानें कांहीं मत्सरी लोकांस ऊत आल्या सारखें झालें आहे. हल्लीं खुद्द गायकवाड सरकारानें ज्या मुख्य मुख्य नेमणुका केल्या आहेत त्या गुजराथी मंडळीस न आवडल्यामुळें हताश लोकांनीं आकाश पाताळ एक करण्याचा घाट घातला आहे.

श्रीमंत महाराज सयाजीराव चांगले शिकलेले आहेत. त्यांच्या पाशी दक्षिणी किंवा गुजराथी हा फरक नाहीं. किंचित् असला तरी तो अणुरेणू इतका दृश्यवान असेल आणि क्षम्यही आहे. विलायतच्या सफरी श्रीमंतांनीं पुष्कळ केल्या आहेत आणि त्यांच्या मतांतील जातिभेद वगैरे फरक पर्यटणाच्या अनुभवानें उदार शीलानें व वैभवशालित्वानें लयासच पोचल्या प्रमाणें आहेत गायकवाड दरबारांत हल्लीं मत्सर व स्पर्धा वाढली आहे हें ते ओळखून असतील व आणि कार्याच्या श्रेष्ठ स्वरूपा प्रमाणें सर्व दरबार सुस्थितीला लवकर आणतील अशी आह्मी उमेद बाळगतों.

---

हिंदुस्थानांत कापूस विपूल पिकतो आणि त्याचें कापडही या देशीं बहुत बनत होतें. या देशांत नानाविध, उंची उंची व मौल्यवान वस्त्रें काढविण्याचे माग पुष्कळ होते. आणि मागाच्या कामांतले कुशल कोष्टी लोकही पुष्कळ होते. कापसाच्या व्यापार व तज्जन्य वस्त्रप्रावर्णांचा व्यापार हे इतके मोठे होते कीं सर्व राष्ट्र त्या व्यापारावर सावरत असें आणि बाहेर द्वीपान्तरींही आपल्या देशाचा माल जात असे. पूर्वी दळणवळण थोडें आणि व्यापाराच्या सोयीही अगदीं थोड्या असें असूनही कोट्यवधि रुपयांचा माल हिंदुस्थानांतून बाह्य देशीं जात होता. या देशाचा कपडा मोठा नामांकित होता. देशाला लागेल तितका तयार होऊन त्या शिवाय बाहेर द्वीपान्तराला माल धाडण्यास पूर्वी साधन असें. हिंदुस्थानच्या सांपत्रिक वैभवाला कारणीभूत असा हा कापसाच्या वस्त्रांचा व्यापार होता.

पण सांप्रत या व्यापाराची स्थिति किती शोचनीय आहे बरें! हा इतिहास अत्यंत मनन करण्या सारखा आहे. हा इतिहास ह्मणजे अव्वल इंग्रजी पासून इंग्लिश बनिये शाहीची साद्यंत कथा होय. हा इतिहास राज्यकर्त्यांच्या कर्तबगारीनें असा बनला आहे कीं एका पुराणप्रसिद्ध राष्ट्राचा अत्यंत ऱ्हास झाला व एक नवीन राष्ट्र वैभवाशिखरावर चढलें. व्यापारोन्नतीचीं कारणें एका राष्ट्रांत अस्तंगत झालीं आणि दुसऱ्यांत उदयास येत चाललीं. कापसाच्या व्यापाराची मूळपीठिका एक उत्तम धडा शिकविते. साम्पतिक वैभव राष्ट्राच्या चिरायुष्याला, अन्नदानीला व सुखसमृद्धीला मूळ कारणभूत असतें. इंग्रजी झाल्या पासून आपल्या देशाचें साम्पतिक वैभव लयास जात चाललें. इंग्रजी राज्यानें अद्भुत गोष्टी पुष्कळ या देशांत झाल्या आहेत तथापि मूलतत्व शोधिलें असतां इंग्लंडच्याच फायद्याला वरील सर्व गोष्टी मदत करितात असें दिसून येतें. कालानें सर्व रचना उलटीच झाली. हिंदुस्थानचे माग वगैरे बसले आणि विलायतचे कारखाने झपाट्यानें चालूं लागले. हिंदुस्थानांत पिकलेला कापूस विलायतेस जावूं लागून तिकडून वस्त्रप्रावरणाच्या रूपानें येऊं लागला. आणि हा आंतबट्याचा व्यापार इतका प्रचंड वाढला आहे कीं, जगामध्यें अश्रुतपूर्व यंत्रालयांचा कारखाना विलायतेस चालला आहे.

इंग्रजी बनियेशाही अगदीं पूर्णतेस गेलेली आहे. हिंदुस्थानचा व्यापार बुडाला आणि विलायत त्याच व्यापारावर तरली. तथापि महात्वाकांक्षा, स्पर्धा व मत्सर हीं इंग्लिशांच्या हृदयामध्यें रात्रंदिवस नाचत आहेत आणि त्यामुळें कापडाचा व्यापार अन्य ठिकाणीं चालू झाल्यास तो बंद पाडण्यात आमचे राज्यकर्ते तत्पर असतात व त्यासाठीं हरतऱ्हा करितात. या हरतऱ्हा मध्यें अप्रतिबंध व्यापाराची एक गुरुकिल्ली उत्तम राज्यकर्त्यांच्या हातीं आहे. तिच्या साह्यानें सर्व विघ्नें टाळतां येतात. हल्लीं विलायतच्या यंत्रालयाची स्थापना इंडियांत होऊन थोडाबहुत कांहीं ओबड धोबड व जाडा भरडा कपडा हिंदुस्थानांत तयार होऊं लागला आहे. पण तितक्याच व्यापारवृद्धीनें मांचेस्टर वाल्यांच्या व अन्य सर्व इंग्लिशांच्या हृदयांत निराळाच उजेड पडला आहे. त्यांस असें वाटतें कीं हिंदुस्थानचे यांत्रिक माग पुष्कळ झाले व सतत चालूं लागले ह्मणजे विलायतच्या पोटावर पाय आल्या प्रमाणेंच आहे. ही दहशत कांहीं खोटी नाहीं. या इंडियन व्यापाराला खो देण्यास राज्यकर्ते काडीमात्र चुकत नाहींत आणि व्हाइसरायच्या कौंसिलद्वारास स्वतांच्या कृतीची चूक दिसली तथापि ते स्टेट सेक्रेटरीचा हुकूम ह्मणून वटेल ती गोष्ट कायद्याच्या रूपानें अंमलात आणितात. हिंदुस्थानच्या खजिन्यांतली तूट भरून काढण्या करितां कायदा केला तेव्हां ... सुतावर व कपड्यावर इतर जिन्नसा बरोबर जकात बसवावी लागली. ही जकात बंद करण्यासाठीं विलायतच्या लोकांनीं नाना खटपटी केल्या पण सर्व प्रयत्न हरले आणि जकात कायम झाली. तेव्हां विलायती मालापेक्षां इंडियन कपडा स्वस्त विकला जाईल ही ओरड केली आणि विलायतच्या भारी नंबराच्या सुता पेक्षां अगदीं कनिष्ठ प्रकारच्या नंबरच्या सुतावरही निराळी जकात बसविण्यांत आली. हा अप्रतिबंध व्यापाराचा अनुग्रह होय. विलायती कपडा २५ नंबराच्या सुतापासून तों वरील नंबराच्या सुताचा असून

तो आणि इंडियन कपडा २० पासून २४ पर्यंतच्या नंबराच्या सुताचा बहुतेक असतो. पण ही गोष्ट लक्ष्यांत न घेतां इंडियन वीस नंबरी सुतावर जकात बसली. इतके स्वार्थसाधु, परोत्कर्षासहिष्णु व परकार्यहन्ते आमचे राज्यकर्ते प्रत्यक्षपणें अगर अप्रत्यक्षपणें आहेत हें आपणांस विसरतां कामा नये. राज्यकर्त्यांच्या मनांतला "ब्रिटिश व इंडियन" हा भेदाभेद राजनिष्ठपणानें, संमेलनानें, व मित्रत्वाच्या अहमहमिकेनें आपण विलयास नेला पाहिजे आणि ब्रिटिश प्रजेच्या अधिकाराला व हक्कदारीला आपण पोंचलों पाहिजे.

---

चित्रळची मोहिम रडत रडत चालूंच आहे. कोट्यावधि रुपयांचा फन्ना झाला, तिजोरी अधिक रिकामी पडली, आणि डोंगराळ मुलूख काबीज करून रानटी लोकांवर राज्य करण्यांत आमच्या देशाचा फायदा नाहीं व राज्यकर्त्यांसही मोठेसें भूषण नाहीं. प्रमुख व पोंचलेले मुत्सदी यांनीं चित्रळचा प्रांत सोडून देण्याचा सल्ला प्रसिद्धपणें कळविला होता आणि स्टेट स्टेक्रेटरी यांचा ही संकल्प तसाच ठरला होता. पण पार्लमेंट बरखास्त झाल्या बरोबर सुकाणूं बदललें व राज्याच्या जहाजाला निराळीच दिशा लागली. सध्यां विचार असा ठरत आहे कीं चित्रळकडे रस्ते, रेल्वे वगैरे करून सर्व प्रांत सुगम करावा आणि सरहद्दीवरील इंग्रजी दळणवळणाचें ठाणें जबरदस्त करावें. राज्यतृष्णा मोठीच आहे पण तिच्याच पायीं इंडियाचा चुराडा होत आहे याचा कोण विचार करील बरें! चित्रळचे उमरावखान सध्यां अमीराच्या कैदेंतुन मुक्त आहेत आणि त्यांच्या गादीवर मनुष्यरूपी बाहुली बसवून खरे सूत्रधार इंग्रज बहादुर हल्लीं प्रमाणें चिरायु होतील असा रंग दिसतो.

---

# The Berar Samachar

MONDAY JULY, 22, 1895

We are glad to observe that the police report of the last year is an interesting and instructive document. It gives a full, accurate, and critical history of the working of the police department in the year 1894. Even a casual reader will feel the high moral tone of the writer and it will be no difficult task to recognize in the pages of the report the strong personality of Colonel Lane. The annual record speaks volumes in favour of the able, efficient and satisfactory administration of the department and redounds much to the credit of the Inspector General who has been controlling it for a series of years together. The report is more valuable than an ordinary annual statement. Its chief merit lies in the fact that it embodies a number of important suggestions which will serve as a land—mark for future reforms in the department.

The first and foremost subject that rivets our attention is the constitution of the Village Police Colonel Lane has written an able article in connection with the improved organization of this village-force that goes by the old name of *Jaglias*. The main spring of Colnel Lane's argument is that if the Jaglias constitute the Village Police it is but a trite principle that they should serve well in that capacity. The Jaglia-peons do not rightly understand the proper sphere of their work and it is most necessary to create in their minds a lively awakening to their duties. In order to secure this it is essential to effect a change in the very system itself· Colonel Szczepanski proposes to commission an experienced officer to inquire into the short—comings of the present Village Police and to report thereon. The suggested inquiry may do an important service but one should well bear in mind what Colonel Lane says in this connection. After a careful perusal of the paras quoted below we have made up our mind on the subject and we would like to endorse the solid opinion of that learned officer. He remarks:—

"The village police still remains as it was. Many of them belong to distinctly criminal classes, and are themselves responsible for much of the house-breaking which occurs. They are put in by patels on the understanding that they protect their own village from their fellow criminals. The first step towards improving them is to do what I have already recommended viz, to have all correspondence regarding their appointment and conduct go up to the Deputy Commissioner, through the District Superintendent of Police instead of through tahsilda. It has been stated that I wish to take the village police out of the control of patels and to put them under chief constables. I want nothing of the sort. What I am at is to bring home to these men that their primary duty is that of village policemen and not of acting as a sort of extra tahsil chapprasis for purpose of "sarbarai" or for personal attendance on officials as peons. Therefore, by paying them through the Station-house Officer, and by making the District Superintendent of Police the channel through which reports about the village police should reach the District Magistrate, I would make them feel that they had more to do with the police station than with the tahsil. I do not wish to weaken the control of village patels over their jaglias, but I would make them more effective instruments in the patel's hands for protecting the village and the roads in its limits against criminals. I would insist on patels always being allowed to nominate their own jaglias, and would not allow outsiders to be thrust on them as is now oftentimes done, resulting in what is frequently seen, a truculent jaglia thrusting his patel into the back ground and posing as head of the village. I would not allow jaglias to be withdrawn from their villages for any purpose but escort of the Government revenue, unless they are replaced. Lastly I would urge that the jaglia cess funds should be devoted purely to village and road protective purposes. At this moment our main roads are unsafe for want of road police, who cannot be given for want of funds; yet jaglias are used for miscellaneous purposes. If they are not required in villages could not their cost go for police.

I must ask to be excused for going so fully into this matter, but the settlement of the village police question in Berar is, in my opinion, what the future state of the province as regards crime will greatly depend upon. It is impossible to suppose that if the village police force of some 5,000 men, all of whom should have local knowledge, were brought into any kind of order, house-breakings, dacaitis and robberies could be as rife as they now are."

---

Dr. Little has made a fair remark in regard to the surgical operations by Hospital Assistants in Berar. It is gratifying to note that he promises a good reward by way of timely promotions to those who succeed well in surgery. He remarks:—

"I would here note that I have not pressed Hospital Assistants in the matter of major surgical operations. Though required to do the duty of Assistant Surgeons in independent charge of dispensaries, yet Hospital Assistants have neither the general nor professional education entitling them to be classed in the Assistant Surgeon's grade, and I am averse to press ing men in the matter of operations which they are not always qualified to undertake, as being neither right in itself, nor fair to the public. Those men who show a taste for surgery receive every encouragement, and their capabilities as operators will always be considered in making appointments to the more favoured stations.

The record of surgical work for the year is, however, far from unsatisfactory especially that of some of the comparatively junior men, whose work bears witness to the sound surgical training they receive in the Hyderabad Medical School."

---

Dry remissions, moderate assessments in *specie* and agricultural banks are the three great wants of the Indian peasantry The Kaiser—i—Hind of Bombay emphasizes this three—fold want in an eloquent manner:—

"We are of opinion that the true remedy for alleviating agricultural indebtedness, firstly in that practical suggession which was made 15 years ago by the late Sir James Caird in his separate report to the Secretary of State as one of the Famine Commissioners, viz, elasticity in the payment of the annual land-revenue assessment at dates when the ryot is most able to meet the demand. Secondly, in mitigating the burden of that assessment. The whole root of the mischief lies in the periodical survey which classifies and reclassifies soil according to the whim or caprice more or less of the survey and revenue officials with the sole object of increasing the revenue. This enhanced assessment every thirty years which also sweeps away all the ryots' improvements is the bane of the ryot and the real source and origin of his indebtedness. All the tall talk about his general improvidence, his expenditure on marriages and so forth are simply official cant to conceal official rapacity. With light assessments and elasticity of payment, the indebtedness will naturally diminish and if, meanwhile, the state reconsider the question of agricultural banks to tide over the Ryot's temporary difficulties we are sure an immense economic revolution will take place in the condition of the agriculturist. All other panacea are foredoomed to failure. As we have said more than once, while the ryot cries aloud for bread, the state presents him with the volume of a new code!

---

## वऱ्हाड

हवामान— पावसानें बहार करून सोडली. सध्यां आमच्या प्रांतांत पावसा संबंधानें आबादानी आहे. ढग वारंवार येतात आणि त्यांची मोठी गर्दी असते या वरून आणखी पाऊस पुष्कळ पडेल असें वाटतें. एकंदर पाऊस १० इंच झाला. हवा ऋतुमाना प्रमाणें किंचित रोगट आहे. पटकीचा वारा आकोटास मोठा आहे आणि येथेंही कांहीं तुरळक उदाहरणें आढळतात.

रा. रा. काशिनाथ श्रीराम जटार, अम्बाचीं, बुलढाणा यांस माजिस्ट्रेट वर्ग २ चे अधिकार देण्यांत आले.

पुसद येथील नायब तहशिलदारांस ५० रुपया पर्यंत स्माल कानच्या स्वरूपाचे दावे चालविण्याचा अधिकार देण्यांत आला आहे.

इलिचपूरचे नायब तहशिलदार रा. रा. उत्तमराव यशवंतराव यांस एक महिन्याची हक्काची रजा देऊन त्यांच्या जागीं रा. रा. नारायण बापूराव यांस आक्टींग नायब तहशिलदार नेमण्यांत आलें.

रा. रा. गणेश बापूजी हे रेसिडेन्टचे हेड क्लार्क झाल्या मुळें रा. रा. कृष्णाजी हरी कोल्हटकर यांस एक्स्ट्रा असि. कमि. वर्ग ५ ची कायमची जागा मिळाली.

मोठ्या आनंदाची बातमी कीं छत्रपति शिवाजी महाराजांच्या समाधिफंडा निमित्त सुरजी अंजनगांव येथें सभा भरली होती [illegible] णि ४०–५० रुपये वर्गणी जमा झाली. उमरावतीसही येत्या २८ व्या तारखेला सभा भरणार आहे.

गेल्या वर्षी अकोल्यास प्रांतिक जाहिर सभा भरली होती त्या प्रमाणें सार्वजनिक सभेच्या आज्ञेनें यंदा उमरावतीस भरविण्याचा विचार चालूं आहे.

राव बहादूर वामन नारायण बापट व अंबादास संतो या उभयतांनीं पेनशन घेतल्या कारणानें एक्स्ट्रा असि. कमिशनरच्या खालील बढत्या करण्यांत आल्या:—

| एक्स्ट्रा असि. कमि. चें नांव. | बढतीचा वर्ग. |
|---|---|
| मि. गणपत बाबजी सहस्त्रबुद्धे (हल्लीं एक्स्ट्रा असि. रसिडेंट) | ३ |
| ,, पी. गोविंदराज अय्या | ४ |
| ,, नारायण पांडुरंग जोशी | ५ (काय[illegible] |
| ,, इ. मार्शल | |
| ,, मिरझा सफदर अलीबेग | |
| ,, शापूरजी बेरजी | (काय[illegible] |

मुनशी अजिझुद्दीन एक्स्ट्रा असि. कमिशनर वर्ग ३ यांची बढती असिस्टंट कमि[illegible] वर्ग ३ च्या जागीं झाल्यामुळें खालील [illegible] व नेमणुका झाल्या:—

| मि. | वर्ग. |
|---|---|
| ,, जे. आर. ओग्रेडी | ३ |
| ,, गणेश बापूजी (हल्लीं रेसिडेन्टचे हेड क्लार्क) | ४ |
| ,, शेख महमद इस्मायल | ४ |
| ,, जे. एस. एडवर्डस (नवीन [illegible] रेल्वे इन्स्पेक्टर, निजाम रेल्वे. | ५ |

---

## वर्तमानसार.

लिंबांच रसांत पुष्कळ साखर घालून त्याचें सरबत प्यालें [illegible]तां खोकला राहतो व घसा दुखत असेल [illegible] तो राहतो.

मिठाचें पाणी करून गालिच्यावर शिंपून वाळूं द्यावा; कसर लागत नाहीं.

रेशमी व लोकरीचे वस्त्रांवर डाग पडले तर ते मिठानें व लिंबाचे रसानें घासून काढावेत. कापड स्वच्छ होतें.

कामाची वांटणी— एक सून आपले सासूस ह्मणते. "सासूबाई, तुमची आपली कामाची वांटणी करूं या. पहिलें काम मी घेईन व दुसरें तुह्मी करा. मी सकाळींच उठत जाईन; तुह्मी अंथरुण गोळा करा. मी परसाकडेस जात जाईन; तुह्मी चुलपोतेरें करा. मी तोंड धुईन; तुह्मी सडासारवण करा. मी आंग धुईन; तुह्मी साहित्य काढून ठेवा. मी तुळशीची पुजा करीन; तुह्मी स्वयंपाक करून ठेवा. मी जेवीन; तुह्मी खरकटी उष्टी काढा. मी वामकुक्ष करीन; तुह्मी भांडीं घासा. व मी पुराणास जाईन तुह्मी धुणें, पाणी करा !"

पगार वाढले— पलटणींतील नेटिव शिपायांस ता० १ जुलई पासून २१२ रुपये पगार वाढविण्याबद्दल हिंदुस्थान सरकारानें ठराव केला आहे.

अनावृष्टि— सर्व ठिकाणीं [illegible] पाऊस पडल्याची बातमी आली आहे, परंतु मृग लागल्यापासून सोलापूर येथें मुळींच पाऊस पडला नाहीं. काय तेथील लोकांचे दुर्दैव हें ! शेतकरी लोक फार हवालदील झाले आहेत.

कलकत्त्याच्या टांकसाळेंत दररोज ४१ लक्षांचें तांब्याचें नाणें पडत असल्याचें कळतें.

रशियन लोकांमध्यें गुप्त गोष्ट काढून घेण्याची एक विलक्षण रीति आहे. कैदी लोक आपला अपराध कबूल करीत नसले ह्मणजे एक प्रकारची वनस्पति त्यांच्या अन्नांत घालून त्यांस खाऊं घालतात. आणि त्या वनस्पतीचा अंमल त्या मनुष्यांवर बसला ह्मणजे ते मनांत असलेल्या अनेक गोष्टींविषयीं बडबड करतात. मग त्या बडबडीमध्यें त्यांजकडून घडलेल्या गुप्त गोष्टीही निघून येतात. आणि तेणेंकरून गुन्हेगारांचा पुरावा काढण्यास सहज सांपडतो.

[illegible]यतच्या हुंडीचा भाव रुपायास १ [illegible] पेन्स ठेवण्यांत आल्याचें ग. ग्याझेटमध्यें [illegible] झालें आहे.

आ. व.

[illegible]दा ताबुताचे दिवशीं पोरबंदरास जो [illegible]कर दंगा झाला, या दंग्याची हकीकत अशी बाहेर आली आहे कीं, या सणाच्या दोन दिवसांपूर्वीं तेथील खारवी लोकांची वरात, वाजतगाजत एका मशिदी वरून चालली असतां, मुसलमान लोकांनीं वाद्यें बंद करण्यास सांगितलें. पण मुसलमानलोकांचें ह्मणणें वहिवाटी नरुद्ध असल्यामुळें, खारवी लोक त्यांचें ह्मणणें ऐकेनात. हा वाद [illegible] माजला कीं, दोन्ही पक्षाचे हजारों [illegible] तेथें एकत्र झाले व दंगा होण्याचा रंग दिसूं लागला. हें वर्तमान समजतांच ॲडमिनिस्ट्रेटर साहेब स्वतः पोलीसच्या टोळी सह तेथें आले, व त्यांनीं मुसलमानांचा विशेष पाहून असें ठरविलें कीं, हिंदूंनीं मशिदीपुढें व मुसलमानांनीं हिंदूच्या देवळापुढें वाद्यें वाजवूं नयेत. या ठरावाखालीं लोक राजी होऊन, त्यांनीं आपला वरघोडा वाद्यें वाजविल्या वाचून मशिदी वरून नेला. दुसरे दिवशीं मुसलमान लोकांनीं, ज्या रस्त्यावर खारवी लोकांचें मठी पवित्रस्थान आहे, त्या रस्त्यानें मुद्दाम ताबुत काढले. आधींच सरकारी जाहिरनाम्यानें स्फुरण पावलेल्या मुसलमान भाईनीं त्यांचें न ऐकतां, उलट जास्त दुल्ला सुरू केला. अर्थात खारवी लोकांस त्वेष चढून मोठीच मारामारी झाली. त्यांत दोन्ही पक्षांचे मिळून १२९ वर लोक जखमी झाले. मुसलमानांतील चार मनुष्यें व खारव्यांकडील १ मनुष्य ठार झाले. आणि मुसलमानांकडील सुमारें ७५ मनुष्यांस जबर जखमा झाल्या असून, पैकीं ७ इसम मरणाच्या पंथास आहेत व सुमारें ८० मनुष्यें दुखावलीं आहेत. खारव्यांकडील सुमारें ४० मनुष्यें जखमी झालीं असून, सुमारें ७५ मनुष्यें दुखावलीं आहेत. हा दंगा सरासरी दोन तासच चालला होता; इतक्यांत पोलीसची व पलटणीची मदत येऊन पोंहचली तेव्हां लोक जिकडे तिकडे विखरून गेले. ताबुत तेथल्या तेथेंच दोन दिवस पडून राहिले. गांवांत हलकल्लोळ व जिकडे तिकडे अस्वस्थता झाली. शेवटी राजकोटहून पलटण व रिसाल्याची कुमक येऊन पोंचल्या नंतर तिसऱ्या दिवशीं चोहोंकडे शांतता झाली. हल्लीं या दंग्यांतील ४९ लोकांस पकडून त्यांजवर काम चालविलें आहे. अशा प्रकारें दंग्याचा वाईट परिणाम होण्यास, समजलेल्या हकीकती वरून असेंच ह्मणावें लागतें कीं, या कामीं ॲडमिनिस्ट्रेटर साहेबांनीं योग्य ती काळजी व समबुद्धी यांचा उपयोग केला नाहीं. अर्थात हा परिणाम अधिकाऱ्यांच्या वर्तनानें झाला.

दंग्याचें बीं जें आज दोन चार वर्षें पेरलें गेलें आहेत, त्याची उत्पत्ति किती होणार याचा कांहीं अंदाज लागत नाहीं. या साठीं या कामीं सरकारांनीं उभय जातींचा सलोखा लौकर घालून द्यावा. व हें काम मुख्यत्वें साम्राज्य करणाऱ्या सरकारांनीं करावें; तरच त्याचा उपयोग लौकर होईल इतकें येथें सुचविणें अगदीं जरूरच आहे.

मि. दादाभाई नवरोजी यांस "क्रिश्चयन कामनवेल्थ" पत्राच्या बातमीदारानें कांहीं बाबतींत खुलासा विचारला होता; त्यांत त्यांनीं असें सांगितलें कीं, 'युरोपियन लोकांचें ज्यांत हित आहे, त्या गोष्टी करतांना ब्रिटिश गव्हर्नमेंटाला कांहीं अडचणी येत नाहींत पण देशी लोकांच्या हिताची कांहीं गोष्ट करावयाची असली, ह्मणजे सगळ्या अडचणी एकदम उभ्या राहतात. शिवाय कमिशनें नेमून एखाद्या गोष्टीचा निकाल करण्या पासूनही कांहीं फायदा होत नाहीं. जर कमिशनचा अभिप्राय, एखाद्या कामीं सरकारी अधिकाऱ्यांच्या विरुद्ध पडला, तर त्या कमिशनचा कांहीं उपयोग होत नाहीं." अशा प्रकारें स्थिति असल्यावर उपयोग व्हावा कसा ! व लोकांच्या अडचणी दूर व्हाव्या कुठून ?

पंजाब प्रांतांतील उन्नाव येथील म्युनिसिपालिटीनें वकीलावर कर ठेवला आहे. नुकाच लखनौ येथील एक वकील, कर न देतां तेथें वकिली करूं लागला ह्मणून, त्यावर म्युनिसिपालिटीनें फिर्याद केली आहे.

कारण समजलें पाहिजे— बिकानेर जिल्ह्यांतील चुरू या शहरांत १०–१५ हजार मारवाडी लोकांची वस्ती आहे व १॥-२ हजार मुसलमानांची वस्ती आहे. तेथें राय बहादूर भगवानदासची पेढी मोठी नामांकित व श्रीमंत आहे. शिवाय रायबहादुर आनररी माजिस्ट्रेट आहेत. परंतु गेल्या ताबूताच्या दिवशीं मुसलमानांनीं पेढीसमोर ताबूत थांबवून, पांच सात लाख रुपयांचा माल लुटून पेढीस आग लाविली. शिवाय कित्येक हिंदूस मारलें. मुसलमानांच्या अशा कृतीचा परिणाम फार वाईट होईल.

जिकडू इंग्रजांची मानहानि होईल असें कृत्य करण्यास, रशिया एका पायावर तयार आहे असें आतां सर्वांस वाटूं लागलें आहे. त्या साठीं इंग्लंडनें आपलें सैन्यबळ वाढवावें असें लंडनेंच स्पेक्टेटर पत्र ह्मणतें.

पंजाबांत अतिवृष्टी होऊन तेथील [illegible] नाल्यास पूर आला होता.

व्हाईसराय साहेबांची स्वारी तारीख २४ आक्टोबर रोजीं सिमल्याहून निघून आग्रा, ग्वाल्हेर, भोपाळ, इंदोर, पुणें, हैद्राबाद, बंगलोर व म्हैसूर वगैरे ठिकाणीं फिरून मद्रास इलाखा पहून जलमार्गें दिसेंबरांत कलकत्यास जाण्याचें ठरलें आहे.

चित्रळ व डीर येथें ठेवलेलें लष्कर सपटेंबर पर्यंत तेथेंच ठेवण्याचें ठरलें.

सेंट्रल फिन्सबरी मार्फत दादाभाई नवरोजी, व ब्यारोइन फरनेस भागातर्फें बाबू उमेषचंद्र बानर्जी असे येत्या पार्लमेंटच्या निवडणुकींत येणार होते. पण बाबू बानरजी यांचा पराजय झाला आणि पहिल्या निवडणुकीचा अद्याप निकाल बाहेर आला नाहीं.

पुणें जिल्ह्यांतील शिरूर गांवीं ताबूताचे दिवशीं मुसलमान व मारवाडी यांच्यांत मोठी मारामारी होऊन पुष्कळ मारवाडी जखमी झाले आहेत.

ठिकठिकाणच्या बातम्या वरून असें समजतें कीं, गेल्या आठवड्यांत पंजाब इलाख्यांत व मध्यप्रांतांत चांगला पाऊस पडला, बाकी सर्व हिंदुस्थानांत पावसाची फार जरूर आहे.

वाईस हिंदूंच्या देवळापुढें वाद्यें वाजवूं नये असा सरकारी हुकूम सुटला असतां गेल्या ताबूताचे दिवशीं एका मुसलमानानें आस्वलाचें सोंग घेऊन गळ्यांत व कमरेस घंटा माळा वगैरे सारखीं वाद्यें अडकवून हिंदूंच्या देवळा पुढें नाच केला, ह्मणून तेथील मामलेदार साहेबांनीं त्यास कैद करून त्यावर काम चालविलें आहे.

स. वि.

मद्रास येथें एल. एल. बी. ची परीक्षा घेण्याची सरुवात करण्यास १८९६ पासून परवानगी मिळावी असें मद्रास युनिव्हर्सिटीचें ह्मणणें आहे.

पंजाबांतील कांहीं म्युनिसिपालिट्यांनीं आपल्या हद्दींत खपणाऱ्या मासळीवर अक्टाई कर बसविला आहे असें समजतें. ठाणे म्युनिसिपालिटी तसें करील तर बराच फायदा होईल.

अशा म्युनिसिपल हद्दींत असणाऱ्या प्रत्येक माणसास दरसाल ३४ प्रमाणें म्युनिसिपल कर द्यावा लागतो.

कायदेकौंसिलांतील मेंम्बरांस सरकारास प्रश्न करण्याचा जो अधिकार आहे त्यांत कांहीं फेरफार करण्याचा विचार चालूं आहे.

रशियाच्या हिफाजतीवर फ्रेंचसावकारां कडून चीनसरकारास जें कर्ज देण्यांत येत आहे तें परत करण्याची ३६ वर्षांची मुदत असून तें कर्ज परत देण्यास चीन असमर्थ झाल्यास तें परत देण्याची हमी रशिया आपल्यावर घेत आहे. चीनास बगलेंत मारण्याची ही खाशी युक्ती आहे.

आबिसीनियाचा राजा टर्कीच्या विरुद्ध वागत आहे

सैबेरियन रेल्वे मांचुरिया प्रांतांतून जाण्याचें ठरलें.

चित्रळ खालसा करण्याची अवश्यकता नाहीं, स्वात व पांजखोरा या नद्यांवर नावा करून तो रस्ता चालूं केला व त्याच्या रक्षणाचा बंदोबस्त केला ह्मणजे बस आहे असें रावटर्सचें ह्मणणें आहे.

चित्रळस्वारीचा आजपर्यंतचा खर्च दीड कोट रुपये झाला असून आतां तेथें जो फौज फाटा आहे त्याचा रोजचा खर्च ७९,००० रुपयांचा आहे ! अरेरे, हा सर्व पैसा हिंदुस्थानच्या खजिन्यांतून जो खर्च झाला त्याचा मोबदला काय तर मेटफर्ड बंदुका सरहद्दीवरच्या लढाईंत उपयोगीं पडण्या सारख्या नाहींत असें मात्र ठरवून घेतलें !! या चित्रळची पुढ काय व्यवस्था करावयाची हें अजून ठरावयाचें आहेच ! आणि तें ठरेपर्यंत तरी हा रोजचा पाऊण लाखाचा खर्च चालूंच आहे !!

अ०

गेल्या ४३ वर्षांमध्यें लंडन राजनगरांत ९,७२,१७७ नवीं घरें बांधण्यांत आलीं, आणि त्याच मुदतींत ११,७,८९ नवीन रस्ते व १०३ नवीन चौक लंडन येथें तयार करण्यांत आले. या वरून सदर राजनगराचा विस्तार कसा वाढत आहे हें दिसून येईल.

न्यूयार्क शहरांत २७ बायका न्हाव्याचा (हजामती करण्याचा) धंदा करणाऱ्या आहेत. ज्या देशांत स्त्री केशवपनाची दुष्ट चाल आहे त्या देशांत अशा न्हाविणींची अवश्यकता आहे; हें कांहीं वर्षे खालीं आपले प्रसिद्ध सुधारक मित्र कै. प्रि. आगरकर यांनीं विस्तारपूर्वक कळविलेलें वाचकांना आठवत असेलच.

इं. प्र.

जर्मनीच्या बादशाहाकडून जपानच्या बादशाहाला ब्ल्याक ईगलची पदवी देण्यांत आली. ही पदवी अगदीं आपल्या बरोबरच्या चक्रवर्तीस देण्यांत येते.

निजाम सरकारांनीं नुकताच एका स्त्रीबरोबर निका लाविला. व त्या संबंधानें चौमहाल राजवाड्यांत हैदराबादच्या अमीरउमरावांस मोठमोठ्या मेजवान्या देण्यांत येत आहेत.

उत्तर स्पेन, स्विट्झर्लंड व हंगारी ह्या प्रांतांत अतिशय पर्जन्यवृष्टि होऊन मागाहून फार भयंकर पुर आले व तेणें करून अतिशय जीवाची व वित्ताची हानि झाली.

ज्ञा० प्र०

---

☞ हें आकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

नोटिशी बद्दल.
१० ओळींचे आंत रु० १
दर ओळीस .... ०|०६
दुसरे खेपेस .... .... ०|१

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs.
Per line over 10 ... 4 as.
Repetition Per line 3 as.

VOL XXIX AKOLA MONDAY 29 JULY 1895 NO 29

वर्ष २९ आकोला सोमवार तारीख २९ माहे जुलै सन १८९५ इ० अंक २९

ESTABLISHED IN 1880.

HEALTH REGAINED AND STRENGTH MAINTAINED.

जी. बी' नाईक कंपनीच्या

जग प्रसिद्ध गुणावह.

विजेच्या आंगठ्या, पुतळया, कर्डी, लेखण्या व गळपट्टेवगैरे

प्रत्येक वस्तुवर G. B. N. मार्क पाहून घेत जा. खोटा माल घेऊन फसू नका.

११०००० वर विकऱ्या, रोज पुष्कळ खपत आहेत.



गुण आल्याचे हजारों दाखले मिळाले आहेत व नित्य मिळतात

रक्त हें मनुष्याचें जीवित आहे व विद्युलता रक्ताचें जीवन आहे




रक्त खराब असल्यामुळें होणारे सर्व रोग अशक्तपणा, संधिवायु, शिरागतवायु, पोटांत वायु धरणें फेंपरें, हातपाय गळून जाणें, स्त्रियांचे बाळंतरोग वगैरे काळजाचे दर्द, सर्व प्रकारचे ज्वर, अर्धशिशी, मस्तकशूल, मलावरोध, छातींत जळणें व दुखणें गळा सुजणें, सर्व प्रकारच्या मुळव्याधी. पाठींतील अशक्तपणा निद्रा न लागणें, मूत्राशयांतील रोग, खोकला, दमा, गजकर्ण, त्वचेचे विकार, मेह व इतर रोग, हे ह्या वस्तु वापरल्यानें बरे होतात, हें जगत्प्रसिद्ध आहे. गळपट्टा—लहान मुलांचे दंतोत्पत्तिसमयीं होणारे रोग शमन होऊन सुळे निर्विघ्नपणानें निघतात लेखणी—हातास कांपरें व स्मरणशक्ति, अशा ह्या उत्तम, गुणकारी, सर्व रोग शमविणाऱ्या, अंगावर सुशोभित दिसणाऱ्या, औषधी खटपट चुकविणाऱ्या वस्तूंच्या संग्रहावांचून राहूं नका.

सर्व इस्पितळांमध्यें विजेचा प्रयोग रोग्यांवर करितात, व ज्या मनुष्याच्या अंगांत शुद्ध रक्त नाहीं त्या मनुष्यावर विजेचा प्रयोग केलेला पुष्कळांनीं पाहिला असेल. व त्यापासून रोगी बरे झाले आहेत. त्याबद्दल हजारों डाक्टर साक्ष देतील.

विजेच्या वस्तूची किंमत.

| | | |
|---|---|---|
| पितळी आंगठीस किं. रु. १॥ | पि. पुतळीस किं. रु. १। | धातूचे कड्यास किं. रु. १॥ |
| चांदीचे आंगठीस किं. रु. ३ | चां. पुतळीस किं. रु. २ | धातूचे लेखणीस किं. रु. १॥ |
| सोन्याचे आंगठीस किं. रु. २० | सो. पुतळीस किं. रु. २२ | रेशमी गळपट्टा किं. रु. १॥ |

केवर पट्टा किं. रु. ६

एकदम बारा नग घेणारास एक नग जास्त मिळेल. रोख दाम आल्यास किंवा व्ही. पी. पार्सलनें मागविल्यास पाठवून देऊं. आंगठी करितां बोटाचें माप पाठवीत असावें पत्ता असावा. अनेक रोगांवर गुण आल्याचे डाक्टर, वैद्य, पत्रकर्ते, राजेरजवाडे वगैरे सद्गृहस्थांचे हजारों दाखल्याचे व विशेष माहितीचे, व एजंट व्यापारी दराचे पुस्तकाकरितां अर्धा आणा पाठवा, किंवा तें पुस्तक माला बरोबर फुकट पाठवूं. १ पासून ६ पर्यंत ट. ह. ६ आणे बंगी करणावळ माफ.

G. B. Naik and Company
Byculla Bombay

जी. बी. नाईक आणि कंपनी.

मुंबई, भायखळा जुन्या दावणी समोर; व पुणें, रविवार पेठ नं० ६०

## जाहिर खबर

बाहेर गांवच्या सर्व व्यापारी लोकांस कळविण्यांत येतें कीं; आमची पेढी मुंबईत फार दिवसांपासून चालू असून आह्मी पुष्कळ फायद्यानें माल खरेदी करून पाठवित असतों. ज्या व्यापारी लोकांस भुसारी, कापड, फरनीचरचें जातीचें सामान, लांकुड, लोखंड, किराणा, हार्डवेर ( चुका, स्क्रू वगैरे ) स्टेशनरी व ग्यासलेट वगैरे कोणत्याही जातीचा माल मागणें झाल्यास आह्मी पुष्कळ फायद्यानें आणि कसोशीनें व त्वरित पाठवूं. एक वेळ माल मागविल्यावर खात्री होईल. आमच्या कामिशनचा भावही फारच कमी ह्मणजे शेंकडा एक टक्या प्रमाणें आहे. माल मागविणें तो व्हाल्यू पेबलनें अगर आगाऊ रुपये पाठवुन मागवावा. पण व्हाल्यू पेबलनें माल मागविणारांनीं शेंकडा २५ रुपये प्रमाणें रकम आगाऊ पाठविली पाहिजे. ज्या लोकांस माल मागविणें असेल त्यांनीं खालील पत्त्यावर आपलें नांव, गांव, स्टेशन वगैरे स्पष्ट खुलासेवार लिहून पत्रव्यवहार करावा. पत्रें पोस्टपेड पाठवावीं व उत्तराकरितां टिकीट पाठवावें.

तईयब अली मुलावली भाई.

मच्छी बाजार, अबदुल रहिमान स्ट्रीट. मुंबई.

नमुना ( जी )

नादारी मुकद्दमा नंबर १६ सन १८९५

विद्यमान नादारी कोर्टाचे जज्ज जि० अकोला.

खालीं लिहिलेले धनको व इतर सावकार यांस नोटीस देण्यांत येते कीं, बंकटलाल भवानीदास राहाणार शेगांव तालुके खामगांव हा नादारी आहे असा आज तारीख ९ माहे ७ सन १८९५ इसवी रोजीं ठराव झाला आहे. आणि तारीख १० माहे आगष्ट सन १८९५ हा दिवस नादाराचे सावकारांनीं नेमण्या करितां आणि सावकारांनीं आपले तर्फेचा असायनी नेमून देण्या करितां व नादारानें आपल्या सुटके विषयीं दिलेल्या अर्जाचा निकाल करण्या करितां नेमला आहे.

नादाराच्या सुटके संबंधीं ज्या सावकाराची तकरार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं त्याबद्दल आठ आण्यांच्या स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटिशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल तें व त्या बद्दल ज्या साक्षीस समन्से करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नांवें नमूद करावीं. ही नोटीस नेमण्या करितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस तरी पूर्वीं दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पहाण्या करितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत. ज्यास नादारावर दावे नोंदविणें असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी व ते दावे खरे असल्या बद्दलचा प्रतिज्ञा लेख लिहून त्याजवर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे राहणार असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशियल आफिसरापुढें तिच्या खरेपणा विषयीं शपथ लिहावी आणि ती यादी टपालाकडून कोर्टांत पाठवावी. ह्मणजे दावे रजिस्टरांत दाखल होतील. कळावें ता. ११।७।९५ इ०

B. B. Sule
Judge.
Bankruptcy Court
Akola District.

| धनकोचें नांव | रकम रुपये |
|---|---|
| १ दुलिचंद बंकारदास मा. शामलाल बंकारदास दुकान खामगांव | २३८ |
| २ नरसिंगदास डिडवणा राहणार खामगांव | १७०५।०६ |
| ३ नानकराम गंगाराम दुकान पंचगव्हाण | ३००० |
| ४ रामसुकदास रामरतनदास राठी दुकान अकोट | ७५ |
| ५ नैसिंगदास हंसदास दुकान खामगांव | २०७ |
| ६ जव्हारमल बालमुकुंद मारवाडी मा. बालमुकुंद दुकान उमरावती | ७५० |
| ७ टिकमदास सुंदरलाल दुकान अकोलें | २१८ |
| ८ कस्तुरचंद मिकमचंद मा. मिकमचंद दुकान खामगाव | २४०० |
| ९ लक्ष्मणदास माहीदास दुकान शेगांव मा० सेवाराम | ४१००८ |
| १० गणेशदास बुलाखीदास व० काळीराम दुकान ऊमरावती | २५०० |
| ११ जगंनाथ जीतमल दुकान अकोलें भागीदार दवलतराम | ५०० |
| १२ बलदेवदास रामप्रताप दुकान तेल्हारे | १९० |
| १३ हरीराम छगुलाल मा० हरीराम दुकान तेल्हारे | १५५ |
| १४ गणेशदास केशवदास मा. व० लक्ष्मीनारायण दुकान अकोले | ५२५ |
| १५ जगरामदास फापट दुकान खामगांव | ३२५ |
| १६ छोटमल रामप्रताप दुकान उमरावती तर्फे खरेदीदार शालग्राम छगनलाल व० पृथ्वीराज दुकान अकोले | ५५० |
| १७ हरनंदराय फुलचंद व० गंगाराम मारवाडी दुकान मुंबई मारवाडी बाजार | ४८५ |
| १८ गुरुमुखराय सुखानंद दुकान अकोलें वहिवाटदार उमेदमल | ७६ |
| १९ कानजी पर्वत मुंबई मा० कानजी भाई भाटे मांडवी बाजार | ६०० |
| २० जगंनाथ सुरजमल दुकान तेल्हारें मा० जीतमल | ५२५ |
| २१ मंगळीराम तनसुकराय दुकान तेल्हारे | ३५० |
| २२ गोपाल गोविंद भावने दुकान सेगांव | ६२७ |
| २३ खेतसीदास हरमुखराय मा० हरमुखराय दुकान मुंबई मारवाडी बाजार | १५०० |
| २४ बिहारीलाल हिरालाल साहू दुकान पंचगव्हाण | ११५०० |
| २५ करीमखा दाऊतखा मु० खामगांव | १६०० |
| २६ बागमल रामुलाल जीन कंपनी पंचगव्हाण मा० गणेश नारायण मारवाडी | ५००० |
| २७ अण्णाजी केशव एजंट मोफेशल कंपनी शेगांव | १५००० |
| २८ श्रीराम शालीग्राम मा० व० मथुरादास राऊतमल दुकान शेगांव | १५०० |
| २९ सावतराम रामप्रसाद व० जयकृष्ण बगाजी दुकान अकोलें | ९० |
| ३० हरीराम अनंदराम मा० शिवबक्ष दुकान अकोलें | ७५ |
| ३१ जयदेव शामदेव दुकान अकोलें मा० रामदेव शामदेव | ५० |
| ३२ चुनिलाल रामप्रताप मा० चुनिलाल दुकान अकोलें | ७० |
| | ५११०८०१३०६ |

B. B. Sule.
Judge
Bankruptcy Court
Akola.

वऱ्हाडसमाचार

मिती श्रावण शुद्ध ८ शके १८१७

## भ्रम अथवा खूळ

"संतापशमनाच्या दोन्ही प्रयोगास हजर असलेल्या एका प्रेक्षकास" आपण मोठी बहादुरी केली असें वाटून त्यानें शुद्धवऱ्हाडी पत्रांत तारीख १७ माहे जुलई रोजीं पत्रव्यवहाराखालीं एक पत्र छापविलें आहे. आह्मी नाटकासंबंधानें क्वचितच लिहितों. ज्या वेळीं संतापशमनावर आह्मी आपला अभिप्राय दिला तेव्हां तो देण्याचें कारणही आह्मी ध्वनित केलेंच आहे. प्रेक्षकानें आमच्या अगर आमच्या बातमीद्वारा संबंधानें कांहींही आणि कसलीही विधानें काढलीं तरी त्याचा आह्मांस तिलप्राय विषाद न वाटतां ज्या लोकांबद्दल आह्मास विशेष कळकळ वाटते त्यांना थोडाफार तरी सुमार्ग दाखविल्याबद्दल आह्मांस संतोषच होत आहे.

नाटकें वाईट असें विधान करणारे आह्मी नाहीं. त्या दृश्य काव्यानें जितका लवकर समाजास बोध होतो तितका बोध दुसऱ्या कोणत्याही काव्यानें किंवा निबंधानें अगर व्याख्यानानें होण्यासारखा नाहीं. परंतु निव्वळ शृंगाररसप्रचुर लावणी छंदांतील नाटक ह्मणजे सुधारलेला सामना उर्फ छकड होय. अशा सामन्यापासून जनसमूहाचें हित न होता उलट त्याची सहृदयता दूषित होऊन त्याची प्रवृत्ति दुर्मार्गाकडे अधीक होते. लळितें व तमाशे पहाणारे पुष्कळ अज्ञ व असमंजस लोक आहेत एवढ्यावरून त्यांची योग्यता विशेष मानतां येत नाहीं. संतापशमनाचा दुसरा प्रयोग पूर्वींपेक्षांही अधीक प्रिय होऊन त्या प्रयोगाचे वेळीं मंडळीचा तोबा उडाला असेल. "खुर्ची मंडळी पूर्वींपेक्षांही अधीक जमली असेल." परंतु एवढ्यावरून प्रयोग योग्य असें होत नाहीं. गवळ्याचा गाणार भाऊ सोनार याच्या तमाशास पुण्याच्या थेटरांत तांबोळी, लोहार, तालीमबाज यांची इतकी गर्दी होत असे कीं त्या ठिकाणीं आमचा प्रेक्षक गेला असता तर तो संतापशमनास इतका भुलला आहे त्या अर्थी खास तेथेंच तल्लीन होऊन गुंगला असता आणि निदान अशा मंडळींत डफ ठोकण्याच्या कामगिरीला राजी झाला असता. झुकानेवाला मिळाला कीं लागला फडावरचें गायन करायाला ! अशा प्राज्ञ प्रेक्षकाची गवैक्ति कशी टुमदार निवेल बरें ? आणि अशानें आह्मांस नांवें ठेवलीं असता आह्मांस आनंद वाटणेंच साहाजीक आहे.

पुण्याकडे छकडी, व सामने लोकांनीं कलेक्टरांकडून बंद करविले आहेत. ह्मणजे अस... प्रकार चव्हाट्यावर आणि थेटरांत ... व ते बंद करणारांवर आमच्या मार्मिक प्रेक्षकाच्या पुण्यग्रामस्थ बंधूंचा व व्यवसायांचा इतका कोप झाला होता कीं त्यांपैकीं एकास काळोख्या रात्रीं एका गुळ हौसी प्रेक्षकानें मृत्युतुल्य प्रहार देऊन षण्मास शय्याच धरावयास लावलें. पुण्यांत छकडी बंद झाल्यामुळें बऱ्याच हौशी लोकांची इच्छा तृप्त करण्या करितां येथील नाटक मंडळीनें तेथें जरूर जावें. व कदाचित असले प्रयोग छकडींत जमा होऊन छकडीच्या कायद्यांत तेथील मंडळी धालू लागल्यास आमच्या वीर प्रेक्षकानें जरूर तेथें जाऊन त्यांची तरफदारी करावी. व त्यानें जय मिळविल्यास आह्मी त्याचें सर्वांच्या अगोदर अभिनंदन करूं.

आह्मीं विक्रम शशिकलेवर टीका केली नाहीं पण संतापशमनावर कां केली याचें कारण आह्मीं पूर्वी दिलेंच आहे. "रंगीनायकीण प्रहसन" उर्फ भर रंगाचा तमाशा व विक्रमशशिकला उर्फ रंगबाजीचा गोंधळ हे प्रयोग इतके घाणेरडे आहेत कीं आमच्या प्रेक्षकानें डोळ्यांत अंजन घातल्या शिवाय अगर त्यांस उपनेत्र लावल्या शिवाय त्यास दुसऱ्या प्रयोगांतील दोष तरफदारी करीत असतांही आढळून आले आहेत. व प्रेक्षकाच्या योग्यतेच्या लोकांस जर ते इतके स्पष्ट दिसतात तर आह्मी दाखविण्याची जरूर नाहीं.

डायाजिनीज ह्मणून एक ग्रीक महान् तत्त्ववेत्ता होऊन गेला. त्या वेळच्या पद्धतीस अनुसरून व्याख्यानें देत असतां तीं फार गहन असत ह्मणून श्रोतृसमाज जमेना. हें पाहून तो तत्त्ववेत्ता वेड्याचें सोंग घेऊन चिखलांत लोळणीं घेऊं लागला. त्या वेळीं हजारों लोक त्याच्या भोंवतीं जमले व त्याच्या वेडगळपणांत आनंद मानून मोठ्यानें हर्ष करूं लागले. मग डायाजिनीज यानें त्या लोकांस यथेष्ट पंकपिंडांचा मार दिला. खरेंच आहे सुबोध प्राशन करणारे थोडे असतात; कुबोधाच्या भक्तांचा भरणा अतिशय भारी प्रमाणावर असतो. परंतु प्रेक्षक पडला दीर्घ पंडीत त्याचें मत "जनसमूहाच्या गर्दीस जी गोष्ट संमत ती श्लाघ्य." तसेंच प्रेक्षकसमूहांत कांहीं मार्मिक, सूज्ञ, शिक्षित असे होते व असावयाचेच. परंतु त्यांची रुचि, त्यांचें प्रयोगास जाण्याचें कारण इत्यादि "प्रेक्षकास" न समजणें साहजिकच आहे.

संतापशमन नाटक रचणाऱ्यांस ग्रंथकर्त्याची योग्यता देतां येईल किंवा नाहीं, त्यांच्या दोन तीन संस्कृत नाटकांच्या मिश्रणानें तयार केलेल्या निर्मितीस रमणीयार्थप्रतिपादक काव्याची संज्ञा देतां येईल किंवा नाहीं, पुन्हां त्या काव्यानें मराठी भाषेचें भांडार एका ग्रंथानें वाढलें किंवा कमी झालें— इत्यादि गोष्टींचा विचार करून टीका करावी लागते. तसेंच त्यांची ही कविनिर्मिती रंगभूमी शिवाय कोठें उपलब्ध आणि प्रसिद्ध नसल्यामुळें ग्रंथकर्त्यांचा उद्देश नाटकाचा तमाशा करण्याचा किंवा नाटकाचा शृंगारिकरस करण्याचा, किंवा नाटकाचा फार्स करून लोकांच्या मनावर आणि विचारांवर बीभत्स परिणाम घडविण्याचा हेतु असेल तर तें आह्मास समजत नाहीं आणि प्रेक्षकानें "पत्रलेखच्या पात्रानें आपलें काम ग्रंथकर्त्याच्या उद्देशास अनुसरून फारच उत्तम बजावलें." असा अभिप्राय दिला आहे त्या अभिप्रायावरून प्रेक्षकांस ग्रंथकर्त्याचा उद्देश पूर्ण अवगत आहे हें उघड आहे. व या रहस्याचा त्यानें स्फोट केला या बद्दल त्याचे आभार मानावे तितके थोडे. परंतु पहिल्या प्रयोगाच्या वेळच्या पत्रलेखेचें काम उत्तम झालें किंवा दुसऱ्या प्रयोगाच्या वेळच्या पत्रलेखेचें हें ध्वनीत व स्पष्ट झालें नाहीं.

त्याच प्रमाणें टीका करितांना गुणांचें व दोषांचें विवेचन करावें लागतें तें अशा साठीं कीं जर काव्य अथवा ग्रंथ पुन्हां प्रकाशित होणें असेल तर एका प्रेक्षकावर अगर नुसत्या टोळगर्दीवर नजर न देतां समंजस लोकांच्या आदरास ग्रंथ प्राप्त होईल अशा सुधारणा करण्यास ग्रंथकर्त्यास सोपें पडावें.

कोणत्याही नाटकाचा उद्देश ह्मणजे कांतेप्रमाणें युक्तीनें बोध करण्याचा. विक्रमशशिकलेंत किंवा रंगीनायकिणींत देखील विगलित वेद्यान्तर आनंद होऊन कांहींना कांहीं उपदेश व बोधपर तत्व आहे. संतापशमनांत तसें ठळक तत्व कांहींच नाहीं. संविधानकास संविधानक हें नांवही शोभत नाहीं. बरें भाषाशैली ह्मणावी तर "एकांत मोडला क्षमा करा रणधारी"— अशा प्रकारची. ह्मणजे रणधार हा शद्ब कसा तयार झाला आणि याचा अर्थ काय करावा याचें देखील गूढ पडतें.

या प्रकारें आमची विशेष टीका त्या नाटका संबंधानें होती. आतां पात्रांच्या संबंधानें वगैरे बारीक सारीक गोष्टी विषयीं टीका करण्याचें आह्मांस फारसें प्रयोजन नाहीं. तरी ज्या कोणी पहिल्या प्रयोगांतील पत्रलेखेच्या भूमिकेचे अभिनय पाहिले असतील व ज्यानें कधीं छचोर हावभाव पाहिले असतील त्यास आपली लोकरुचि व नाटकाभिरुचि किती अपकृष्ट होत चालली आहे व अशा नाटकांपासून प्रेक्षकासारख्या अदूरदर्शावर काय भयंकर परिणाम होत चालले आहेत हें पहून फार खेद न होईल तर तो या आर्यभूमीचा पुत्रच नाहीं असें ह्मटलें तरी चालणार आहे.

"वन्समोअर ह्मणण्याला काय हरकत आहे?" या विदर्भांत हल्लीं चालू असलेले अपूर्वदृष्ट तमाशे पहाण्यांत निमग्न झालेल्या प्रेक्षकानीं "वन्समोअर" ह्मणून आपली मार्मिकता योग्य प्रकारें दाखविली तर त्यापासून आनंदच होईल. प्राणिमात्रास दुसऱ्याचें नुकसान न करितां वाटेल तें करण्याचा अधिकार आहे व हा हक्क आह्मी प्रेक्षकाचा काढूं पहात नाहीं किंवा खुर्ची मंडळीचा अगर दुसरे कोणाचाही घेऊं पहात नाहीं. प्रेक्षकांची मार्मिकता तर इतकी दिसली कीं ज्या ठिकाणीं वन्समोअरचा अवाज निघे तेथीलच दुसरी मंडळी नो मोअर ह्मणत होती. बनलेल्या पंडितांबद्दल आमचे कांहींच ह्मणणें नाहीं. व अशा मंडळींनीं सुधारावें व समंजस व्हावें अशी आह्मास कितीही इच्छा असली तरी ती निष्फळ होणें साहजिकच आहे. त्याच प्रमाणें पोटार्थी मंडळीबद्दल ही आह्मांस फारसा विचार करणें नाहीं.

परंतु पहिल्या प्रयोगाच्या वेळीं विद्यार्थ्यांचा भरणा इतका मोठा कीं त्यांतील "पुष्कळ विद्वान होतकरू मागील मंडळी" लपून जात होती. अशी मंडळी थोडी बहिरी होत चालली आहे याबद्दल ही आह्मांस खेद वाटत नाहीं. त्यांचा बहिरेपणा ज्या ठिकाणीं पद एकास ऐकूं गेलें नाहीं ह्मणून वन्समोअरचा आवाज येतो त्याच ठिकाणून दुसऱ्यास त्याचा विट आला ह्मणून "नो मोअरची" गर्जना होति यावरून स्पष्ट होतो. वा! काय मार्मिकता हा!" स्टेजच्या मागें बऱ्याच अंतरावर असलेली मंडळी कांहीं बहिरी असते हें उघडच आहे. व बहिरेपणाबद्दल आह्मांस तिळप्राय वाईट वाटत नाहीं. "वन्समोअरचा" अधिकार काढून घ्यावा असें आह्मांस वाटत नाहीं. व आह्मी पूर्णपणें जाणून आहोंत कीं खटपट केल्यास अशीं नाटकेंच बंद करवणें जितकें सुलभ आहे तितकेंच दुर्लभ प्रेक्षकांचीं मनें बदलवणें आहे. परंतु ही हेमगर्भाची मात्रा झाली. हिचा उपयोग त्रिदोषाच्या वेळीं करावयाचा. व तोही ज्याला जगविणें असेल त्याच्या योग्यतेवर अवलंबून असणारा उपाय. पहिल्यापेक्षां दुसऱ्या प्रयोगास गर्दी विशेष होती परंतु तींत विद्यार्थ्यांचा— निदान पुढें मार्गें अधीक ज्ञानसंपादन करण्यास योग्य अशा विद्यार्थ्यांचा —भरणा कमी होता. व हीच गोष्ट अभिनंदनीय होय. प्रेक्षकानें मार्मिकपणानें तारे तोडले त्यांचा अर्थ असा कीं एका ठिकाणीं वन्समोअरचा ध्वनि निघतो त्याच ठिकाणीं नो मोअरचा ध्वनि निघणें, व तसेंच नाटकवाल्यांनीं वन्समोअरची बनावणी करणें ह्मणजे होऊन गेलेल्या पद्याच्या शेवट शेवटच्या एकदोन ओळी ह्मणणें व तेवढ्यावर प्रेक्षकांनीं संतुष्ट होणें हे प्रकार मार्मिकतेचे नसून नुसत्या टारगेपणाचें झाले तसेंच येथील व्याख्यानमालेस ज्यांचीं व्याख्यानें फुकट असूनही गर्दी न होणें आणि नाटक तमाशांस निदान तीन चतुर्थांश गर्दी तरी पैसे खर्चून होणें हे मार्मिक लोकांच्या मार्मिकतेचेंच चिन्ह होय. अधिकाराचा दुरुपयोग होऊं लागला ह्मणजे तो नुसतां काढून घेतला जातो इतकेंच नाहीं तर त्याबरोबर ज्यांचा अधिकार काढून घेतला जातो त्यांस थोडासा खाऊ ही मिळतो. मग तो त्यांस रुचो अगर न रुचो.

वन्समोअर बद्दल लिहितांना प्रेक्षकासारख्या मार्मिक प्रेक्षकांची आह्मांस मुळींच काळजी वाटली नाहीं व अद्यापही वाटत नाहीं परंतु होतकरू विद्यार्थ्यांनीं असा टारगेपणा केल्यास तो कोणत्याही विचारी पुरुषास सहन होण्यासारखा नाहीं व ही सुचना मुलांपेक्षां मुलांच्या पालकांस अधीक होती. आपलीं मुलें टारगीं होऊं देणें त्यांस आवडल्यास त्यांनीं त्यांची फी वगैरे भरण्याचें सोडून खुशाल "प्रेक्षक" हक शोकीत असतां कोल्ह्यांस वारा घालण्यास पाठविलीं तरी आमचें कांहीं ह्मणणें नाहीं. परंतु सुमार्ग दाखविण्याचें आमचें काम होतें तें आह्मी बजावलें.

हल्लीं काळच असा येऊ पहात आहे कीं शाळागृहांची रंगभूमी होऊ पहात आहे. अशा वेळीं आमच्या लेखांचा ह्मणजे फारसा उपयोगही नाहीं हें आह्मी जाणून आहों तरी कर्तव्यास जागलें पाहिजे ह्मणून प्रेक्षकासारख्या ह्मणजे स्वयंमेव विद्वान होतकरू ह्मणूनच घेणाऱ्या तमासगिरास उत्तर देण्याचा आह्मी यत्न केला आहे. नाहीं तर त्यास योग्य उत्तर मौन तेंच दिलें असतें. आतां प्रेक्षकानें कितीही अपलाप केला तरी आह्मी उत्तर देण्याच्या भानगडींत पडणार नाहीं.

The Berar Samachar

MONDAY JULY, 29, 1895

In the wake of the Hon'ble Mr. Ranade's Protestant Hinduism. a historical account is given of the religious reformation set in motion by saints and prophets of the Maharashtra since the beginning of the 13th century. This appears as an 'unwritten chapter' in the last number of the Poona Quarterly. We would reproduce the summary which the writer gives towards the close with a view to invite the reader to read the whole in original. It runs as follows:—

"It gave us a literature of considerable value in the vernacular language of the country. It modified the strictness of the old spirit of caste exclusiveness. It raised the Shudra classes to a position of spiritnal power and social importance, almost equal to that of the Brahmins. It gave sanctity to the family relations, and raised the status of woman. It made the nation more humane, at the same time more prone to hold together by mutual toleration. It suggested and partly carried cut a plan of reconciliation with the Mahomedans. It subordinated the importance of rites and ceremonies, and of pilgrimages and fasts, learning and contemplation, to the higoer excellence of worship by means of love and faith. It checked, the excesses of polytheism It tended in all these ways to raise the nation generally to a higher level of capacity both of thought and action, and prepared it in a way no other nation in India was prepared, to take the lead in re-establishing a united native power in the place of foreign domination. These appear to us to be the principal features of the religion of Maharastra which Saint Ramdas had in view when he advised Shivaji's son to follow in his father's footsteps. and propagate this faith, at once tolerant and catholic, deeply spiritual and yet not iconoclastic."

The religious movement in India was beset with political difficulties. The Hindu religion had to run a zigzag course of transition before it could triumph against the despotic intoleration of the Mahomedan rulers. Politically, India was a nation of warring elements but the foreign administration tied together the various castes by cementing bonds of harmony and self-preservation, Toleration was preached from public platforms and conservation of one's own religion was the grand motive to keep men aloof from the proselytism of the Mahomedan and Christian rulers. There was no doubt a total blank of activity amongst the Hindu world of the Maharashtra when the English people first landed in India. The progress in religion was retarded and with it the literature of the nation came to a standstill. The dial of our progressive reforms was put backward a century or two and customs good or bad got the force of prevailing laws. A period of retrogression was actually gone through before we began a new battle of life under the benign English rule. This new struggle is less religious and more materialistic. Materialism is gaining ground every day and we are afraid that we shall realize the painful effects of a godless life. The very foundations of morality we undermine when we deliberately put aside the spiritual cravings of our hearts which we have inherited as dwindled sons of an ancient historic nation.

---

The Great Indian Peninsula Railway Company is in short a bad master to its *native* servants. We grant that the Company has suffered losses from a falling traffic and unsuccessful litigation. It is equally right that expenditure should be cut down so as to make it commensurate with the revenue. Finances are the true criterion whereby we should determine the usefulness and prosperity of an institution. The fatal policy of disturbing the equilibrium between receipts and disbursements has threatened ruin and bankruptcy to the Indian Government and it is a pure consolation that the company lays down a policy of retrenchment and reduction. But what we require of the managers of the Company is straightforwardness in behaviour and honesty of the real purpose in view. We are sorry that we have to confess a painful truth that the ways of reducing expenses are purely illusory and illustrative of the maxim—"penny wise, pound foolish." The Anglo-Indian servants of the Company do not feel the pinch of the straitened circumstances. They thrive well at the cost of the *Native* agency in the employment of the company. The Company cares a fig for the aspirations, long service, and hard and honest work of its *native* servants and manages by hook or crook to move the machinery of the whole administration. Such a state of things cannot however long continue. Complaints are being lodged one after another; and the stability of the railway—service is almost nothing. The Company is a guaranteed one and the Government of India have every controlling power over the management of the Company. If proper measures be not adopted to remedy the evil in time, we shall have to move the Government by the one unanimous vote of the whole nation. We would however much mind to voice the grievances from one of the petitions to the higher Railway authorities and quote below the following paras for the information of the public and the guidance of those in power whoever they be:—

"( 1 ) Firstly, it is no news to any body connected with the G. I. P. Ry. service that retrenchment and reduction is being made everywhere among the Native employees of the Company to an alarming extent. Several are daily being sent on compulsory in season and out of season and without any provision for their helpless families. No doubt every year there are a few cases of compulsory, but this year the number is pushed to an extent alarmingly great. Besides the periods of leave are long and frequent. Here they simply pray to you to give full effect to rule No. 8 of Agent's Circular No. 16 of 30th December 1891, which unfortunately has been suffered to remain a dead letter hitherto.

(2) Secondly, Besides, they beg to state that if reduction has, as they are told, become a sad necessity, they fail to understand the philosophy of the policy which, while professing to save expenditure by depriving a poor Native employee of his daily two—penee, is fattening the purse of the other employees, in the same breath. They further beg to state that, the policy of reduction has not only turned adrift many an old faithful servant of the Company, but it has added to the hardship and oppression of the already overworked hands that still remain behind. In these days of enlightement and humanity while Government are taking prompt measures to prevent hard labour even with lower animals, it defies one's wits to comprehend how possibly the Company can in the broad daylight, load its almost underfed servant with crushing load and thus indirectly make his lot as insufferable as that of his brother just turned out of service by the Company. They therefore pray that measures of retrenchment and reduction be sought elsewhere.

( 3 ) Thirdly, the next grievance is the irregularity in *issuing Passes* to those that are sent on leave. The procedure in this case is sometimes far from being rational. Because the *passes* in many instances reach the men almost on the eve of the expiry of leave; this is simply to be regretted. If passes are to be granted, why not grant them on the day on which the men are to leave; why tantalise them and keep them hanging. The petitioners will feel highly obliged if punctuality be observed in the issuing of passes.

(4) Fourthly, The last but not the least grievance is the manner in which Bhatta is allotted. With an amusing ingenuity, some of the officers have hit upon a strange devise of avoiding the giving of Bhatta. Instead of allotting a man this allowance as hitherto, whenever he is out on duty, he is told that he is not *sent out*, but rather *transferred* [ of course for the time being ] and so he has no face to claim the Bhatta. Strange devices these! Would that some other decent way befitting the dignity of the Company were found instead."

---

"The work of the Indian Parliamentary Committee is most beneficial. It is likely to do a great deal of good. Nothing could be better for India than that there should be a vigilant party watching the interests of the country in the House of Commons. The hostile criticisms of bureaucrats like Lord Lansdowne show that the Committee is doing great good. If your policy is a wise policy, what have you to lose by having it thrashed out in the House of Commons? But it is important to get some portion, however small, of Indian expenditure charged upon the British Exchequer—not in order to secure financial aid, but in order to make the British public scrutinize the action of their agents, the Government of India. There is another reform which India needs—the generous extension of education, both primary and secondary. Let me add, in conclusion, that care must be taken to prevent higher education from being starved by primary education." India

---

## वऱ्हाड

हवामान— या आठवड्यांत पुन्हा पाऊस चांगला झाला. आणि हा पाऊस कोंकणच्या तोंडाकडील असल्यामुळें मुंबई पासून इकडील सर्व भागांत झाला आहे. हवा थंड व सर्द आहे. वाऱ्याचा उपद्रव वऱ्हाडांत कांहीं ठिकाणीं अद्याप चालूच आहे. खरिपाचीं पीकें आतां उत्कृष्ट जो पाणी येतील. एकंदर पाऊस १६ इंच झाला

उमरावतीस गेल्या मंगळवारीं श्री शिवाजी महाराजांच्या समाधि-फंडाला मदत करण्यासाठीं विद्यार्थ्यांची सभा रा. रा. श्रीधर रामचंद्र पिंपळखरे यांच्या अध्यक्षतेंत खालीं भरली होती. विद्यार्थीं असें पुढारपण घेतात हें सुचिन्हच होय.

मे. आबर्ड साहेब जुडिशिअल कमिशनर, यांची स्वारी अकोल्यास आली असून आज येथील आफिसें तपासण्यांत येणार आहेत असें कळतें.

नवे पोस्टल सुपरिनटेंडेन्ट मि. फर्थ हे अजमीराहून वऱ्हाडांत आले. हे पूर्वीं अकोल्यास पोस्ट मास्तर होते. हे सुपरिनटेंडेन्टचें आफिस उमरावतीहून परत आकोल्यास आणण्याच्या विचारांत आहेत.

रा. रा. व्यंकटेश कृष्ण हे उमरावतीच्या पोस्ट मास्तरचे कामाचा चार्ज देऊन पुन्हां आपले पोस्टल इन्स्पेक्टरच्या जागीं रुजूं झाले.

---

बडनेरा ता. २१।७।९५

बडनेरा हा गांव रेल्वे स्टेशना संबंधानें व कापडाचे गिरणीचे कारखाना येथें असल्यानें बराच प्रसिद्धीस आला आहे. या गावचे पेठ व गांव असे दोन भाग असून येथें दिवाणी कोर्ट ही आहे. स्टेशनापासून गांव बराच लांब आहे. गावापासून स्टेशनावर येण्याचा रस्ता बराच रहदारीचा आहे. परंतु या रस्याचे दुरुस्तीकडे अधिकारी वर्गाचे लक्ष नाहीं असें दिसतें सदरहू रस्त्यावर कंदीलाची फार अवश्यकता आहे ही उणीव अधिकारी वर्ग लवकर दूर करतील अशी आशा आहे.

येथें पूर्वीं दवाखान्याची फार उणीव होती परंतु ती कांहीं सद्गृहस्थांच्या खटपटीनें दूर झाली. हल्लीं गांवांत काळज्याचा आजार बऱ्याच जारीनें सुरु आहे आमचे येथील अस्पिटल डाक्टर हे त्याजकडेस द्यावें तसें लक्ष देत नाहींत. त्यांनीं न बोलवतां गांवात जेथें जेथें आजार असेल तेथें समक्ष येऊन रोग्याची औषधपाण्याची व्यवस्था लावणें जरूर आहे. परंतु हे आमचे येथील धन्वंतरी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रीतीनें रोगाची हकीगत कळली असतांही स्वस्थ आहेत तरी या प्रसंगीं अशा तऱ्हेचें वर्तन न करितां आपल्या ज्ञानाचा उपयोग सर्वांस करून देतील अशी उमेद आहे.

हल्लीं गांवांत चोऱ्या व घर फोड्या बऱ्याच होत आहेत. गुरुवारीं रात्रीं रा. आप्पाराव लोकल आफिसचे हेडक्लार्क यांचे नातलगाचे घरीं सुमारें आठशें रुपयाची चोरी झाली आमचे येथील लोकप्रिय रा. रा. नारायण हरी चिफकान्स्टेबल यांनीं सदर्हू चोरीचा पत्ता फार शिताफीनें लावला. एक रोहिला, एक कसाई व सोनार हे पकडले आहेत व रोहिल्याचे जवळ बराच मुद्देमाल सांपडला आहे. आणखी तपास बराच जारीनें सुरु आहे. या तपासांत मागील कांहीं चोऱ्यांचा पत्ता लागला आहे असें समजतें. येथें ही चोरांची टोळी बऱ्यांच दिवसापासून असून रेल्वेतून चोऱ्यांचा धंदा यांणीं बरेच दिवस चालविला होता.

जी० आय पी. कंपनीनें अलीकडेस बरेच रिडक्शन केल्यामुळें नेटिव नोकर बरेच गांजून गेल्या सारखे झाले असून त्यांजवर कामाचा बोजा अतिशय पडत आहे त्यांची अवस्था पाहून कोणास वरें द्रव येणार नाहीं. कंपनीचे मुख्य कामगाराकडेस जागजागचे नेटिव रेल्वे कामगांराकडून न्याय मिळावा म्हणून अर्ज झाले आहेत याचे अर्जाचा पूर्ण विचार होऊन कंपनी आपली झालेली चूक कबूल करून या गरीब बिचाऱ्या लोकांस न्याय देतील अशी आशा आहे.

## वर्तमानसार.

मोठा पाऊस पडण्याचा संभव आहे असें वातचक्रद्रष्टे अधिकारी ह्मणतात.

दिल्लीस पाऊस पुरेसा झाला; विशेष चिन्हें दिसत नाहींत.

धुळ्याकडे जास्त पाऊस पाहिजे. हल्लीं बराच झाला आहे. पिकें साधारण आहेत.

अमदाबादच्या मीलमजुरांनी हडताळ मोडून पूर्ववत गिरण्या सुरू झाल्या.

चित्राळकडील तारायंत्राच्या बऱ्याच मैल लांबीच्या तारा तोडण्यांत आल्या आहेत तोडणारांचा तपास चालला आहे.

जपानांत अमेरिकेचा कापूस विशेष जाऊं लागला. हिंदुस्थानांत अमेरिकेच्या कापसाचें बी लावणें फार जरूरीचें आहे. नाहींपेक्षां हिंदुस्थानचा व्यापार बसण्याचा संभव आहे.

केंब्रिज युनिव्हर्सिटींत असा गवगवा झाला आहे कीं, उंच प्रतीच्या परीक्षांतील युरोपियन विद्यार्थ्यांनां इंग्रजी भाषा शुद्ध लिहितां येत नाहीं. या कामा नेटीव विद्यार्थी हुशार आहेत.

इराणांत रशिया रेल्वे वाढवीत आहे.

हिंदुस्थानांत सोन्याच्या खाणी बऱ्याच उच्चप्रतीला येऊं लागल्या आहेत. पण त्याचा सर्व नफा परकी लोक घेऊन जात आहेत; त्यामुळें हिंदुस्थान भिकारी तें भिकारीच !

लुकाईसराईपासून गयेपर्यंत खानगी लोकांना, रेल्वे लाईन बांधण्यास सरकारांतून परवानगी मिळाली.

मेमण लोकांच्या जातीनिर्बंधाची सभा, सिकंदराबादेस भरली होती. जुन्या पंचाईतपद्धतीप्रमाणें या जमातीचें काम फार सुरख झालें. इतरांनीं अवश्य अनुकरण करावें.

स. वि.

निजामच्या राज्यांतील वाडीजवळच्या तांडूर गांवीं अत्यंत भयंकर पटकी उठली असून तेथील निमे लोक तर या साथीनें मरूनही गेले व बाकीचे भीतीनें पळून चालले आहेत असें समजतें.

सुमारें ३ वर्षांपूर्वी हिंदुस्थानचें अबकारीचें उत्पन्न १३० लक्ष रुपये होतें, तें आतां ५०० लक्ष झालें आहे.

लहान मुलें भाड्यानें उसनी देणें—इंग्रज लोकांच्या द्रव्यलोभीपणाच्या ज्या ज्या गोष्टी ह्मणून ऐकाव्या त्या त्या अपूर्व असें ह्मणावें लागतें. लंडन शहरांतील कित्येक आया आपलीं मुलें लंडन शहरांतील भिकाऱ्यांस भाड्यानें देतात. हे भिकारी लोक हीं मुलें लोकांस दाखवून दयाळू लोकांपासून बरेच पैसे उपटतात असें ह्मणतात. या पेक्षां नीच व्यापार तो कोणता ?

तीनशें वर्षांचें वय— काफीर जातीच्या एका रानटी लोकांचे राणीला नुकतेंच पकडण्यांत आलें आहे. तिचें वय तीनशें वर्षांचें आहे. येवलें येथील राघवभूषण वर्तमानपत्रकर्ते लिहितो कीं, आतां तरी ह्यातारी झाली आहे कीं, तरुण पोरी सारखी लुसलुशीत दिसते आहे, नकळे.

सिलोन कोर्टांत साक्षीला हाक मारली त्या वेळीं साक्षीदार सुपारी खात होता ह्मणूनच एकाला नुक्तीच शिक्षा झाली.

एकंदर हिंदुस्थानांत ११,२०,००,००० स्त्रिया आहेत असा हिशेब निघाला आहे.

अन्नपचनाला लागणारा काळ — भात खाल्ल्या नंतर एक तासानें पचतो. ऊन दूध तीन तासानी व कच्चें दूध दोन तासांनीं पचतें. आणि गव्हाची पोळी ३॥ तासांनीं पचत होते, असें प्रमाण एका शारीरशास्त्रज्ञानें काढलें आहे.

जर्मनींत एकानें वर्ष्याळ केलें आहे तें नऊ हजार वर्षें किल्ली दिल्या खेरीज चालेल असें तो ह्मणतो.

ज्ञा० व०

एकंदर जगांत सुमारें ३६००० वर्तमानपत्रें निघतात असा अदमास आहे. त्यांत १६ व १७ हजारांच्या दरम्यान नुसत्या इंग्रजी भाषेंत निघतात. ह्मणजे सगळ्या जगांतल्या वर्तमानपत्रांच्या संख्येच्या जवळ जवळ निम्मे झालीं! जर्मन भाषेंत सुमारें ८००० निघतात, तिचा नंबर दुसरा होय.

व०

यंदाची आद्यौगिक सभा पुण्यास सप्टेंबरच्या तिसरे सोमवारापासून सुरू होणार.

पुण्यास एका न्हाव्यानें आपल्या नायकोला वाईट शिव्या दिल्यामुळें माजिस्ट्रेटांनीं त्याला ७५ रुपये दंड केला.

पंजाब प्रांतांतील उन्नाव येथील म्युनिसिपालिटीनें वकीलांवर कर ठेविला आहे

क. त.

भयंकर कारखाना—— आग्र्यास गुरें मारण्याचा एक फार मोठा कारखाना आहे ह्यांत दररोज २०० ह्मणजे सालाचे ७२००० गुरें मारलीं जातात. ह्या गुरांच्या मांसाचे तुकडे करून वाळवून तें वाळलेलें मांस ब्रह्मदेशांत विकावयास पाठवितात. हा कारखाना ह्मणजे मृत्यूचें वसतिस्थानच समजलें पाहिजे.

स्त्रीशिक्षक तयार करण्यासाठीं स्त्रियांचें हायस्कूल स्थापन करावें असा ह्मैसूरच्या महाराणी रीजंट साहेबानीं हुकूम दिला आहे.

शु. सू.

इंदुरकडे नाहल भिल्लांचे नायक व इतर दरोडखोर यांना पकडल्याचें कळतें.

लोहगरी एथें एका मुलीचे घशांत मासळीचा कांटा अडकल्याचा संशय होता, पुढें बऱ्याच काळानें मानेजवळ दुखूं लागल्यामुळें वैद्यानें चिरून पाहिलें तेव्हां टांचणी सांपडली.

केरोसीन तेलाची वाफ तयार करून एका लहान्या इंजिनाचे योगानें तिचाकी गाड्या चालविण्याची युक्ती फ्रान्सामध्यें निघाली आहे; व तिचा लवकरच सर्वत्र प्रसार होण्याचा संभव आहे.

ह्मैसूरच्या राणी साहेबांनीं फार वयाच्या विधवांची ( त्यांची इच्छा असल्यास ) फुकट शिक्षणाची व्यवस्था केली आहे. राणी साहेबांचा विचार असा आहे कीं. अशा वयस्क विधवांस शिक्षण देऊन शिक्षकिणी बनवावें.

स्थानिक कायदेकौन्सिलचे ज्यादा सभासद भलभलतेच प्रश्न करून त्यांस मिळालेल्या हक्काचा दुरुपयोग करितात ही गोष्ट सरकारच्या लक्षांत येऊन त्याबद्दल सरकार लवकरच विचार करणार आहे; आणि जरूर वाटेल तर ह्या नियमांत सुधारणाही होणार आहे असें ह्मणतात.

संस्थानिकांवर आरोप— कृष्णानगरच्या महाराजावर तुह्मी पशुघात केला त्यामुळें गरीब अनाथ बोकडाचे प्राण गेले, असला अघोर शाक्त करण्याचा खटपट चालली आहे. यावर महाराजांनीं उत्तर दिलें कीं, आह्मी आपल्या धर्मचालीस अनुसरून यज्ञ केला. पशूला कोणतेही तऱ्हेची वेदना व्हावी अशा पैकीं आमचा मुळींच हेतु नाहीं. सध्यां हें प्रकर्ण पोलिटिकल खात्यांत गुप्त रीतीनें चालूं आहे असें ह्मणतात.

जुलूम— मद्रासेकडे अनंतपूरच्या माजिस्ट्रेटांनीं एका धनगरणीला घुशात देवी न काढल्याबद्दल तीन महिन्याची शिक्षा ठोकली.

कुत्र्यांना मारलें— गेल्या मार्च ३१ पर्यंत संपणाऱ्या सालामध्यें कलकत्ता म्युनिसिपालिटीच्या टपूंत सुमारें ९,००० उनाड कुत्रे मारले. त्यांना मारण्याची त्यांनीं नवीनच एक युक्ति काढली आहे. एका मोठ्या येरल्या पिंजऱ्यांत एकदम ५१० कुत्री भरायाची व तो पिंजरा पाण्याच्या डोहांत कांहीं वेळ बुडवून ठेवावयाचा!

इं. प्र.

पूर— यमुना नदीला पुनः पूर आला आहे. दिल्लीच्या तटापर्यंत पाणी लागलें आहे.

कांसवाची मान तुटल्यावर तें ५०० यार्ड पर्यंत धांवतें इतकेंच नव्हे परंतु त्याच्या उराची धुगधुग थंडशा जाग्यांत धड ठेवलें तर मान वेगळी झाल्या पासून ३ दिवस पर्यंत असते.

सन १९०१ मध्यें सध्यांच्या सूर्याच्या बदला नवीन सूर्य येणार तो फारच ताप देणार असें ह्मणतात.

२४ तास पर्यंत पाण्याविरहीत फुलें सुकलीं तर तीं ऊन पाण्यांत बुडऊन काढावीं पुनः जशाचीतशी टवटवीत होतात.

हल्लीं आस्ट्रियांत १४ कुत्रे लढाईच्या वेळीं हुकुम पाठविण्या करितां, दारु गोळा पोंचविण्या करितां व जखमीं माणसें शोधून काढण्या करितां उपयोगीं पडण्यासारखे झाले आहेत. दरवर्षी असे तयार करण्यांत येतील असें समजतें.

हिंदुस्थानच्या जमाखर्चाची तूट भरून काढण्या करितां तंबाखूवर व लग्नावर कर बसवावे असें सर लिपल ग्रिफन सुचवितात.

बंगाल्यास ४३ लक्ष रुपयांची अफू गेल्या जूलईंत विकली.

विंध्यपर्वतंत लिव्हरपूर स्टेटमध्यें विजेचे अग्निरथ चालूं करण्याचा विचार आहे.

न्या. सिं.

निझाम रेल्वेवर सिंकदराबादेपासून ९५ मैलांवर चिंटापिली नांवाच्या स्टेशनावर २६ बिगारी डब्याखालीं विश्रांती करितां बसले असतां एक एंजीन येऊन त्यांस धक्का बसला व त्याच्या योगानें त्यांतील एक बिगारी लागलीच मेला व २५ कमी जास्त घायाळ झाले व २१३ पुढें लवकरच मेले.

मुंबईस एक संभावीत किरिस्तव थोड्या दिवसा पूर्वी मरण पावला. त्याचें मरणें संशयात्मक वाटल्या वरून चवकशी सुरू झाली व त्यांत त्याच्या मरणास कोणी कारण झाला असावा असें ध्वनीत झालें. मरणारानें आपल्या आयुष्याचा विमा १०,००० रुपयांस उतरला होता व ती रकम भरणाराच्या पश्चात ज्यास मिळावयाची होती तोच त्याच्या मरणास कारण झाला असावा अशा बद्दल त्या मनुष्यावर हल्लीं खटला सुरू झाला आहे. पैसा किती दुष्ट आहे हें या वरून सिद्ध होतें.

चालूं हिंदुस्थानी वर्षाचा बजेट ता. ७ अगष्ट रोजीं पुण्यास कायदेकौंसला पुढें ठेवण्यांत येणार आहे.

नुकत्याच झालेल्या तारीफ अक्टा प्रमाणें मांडलिक संस्थानिकांनीं आपल्या हद्दींतील गिरण्यांत निघणाऱ्या कापडावर पांच टक्के जकात बसाविण्याचें नाकारल्यास त्याचा माल इंग्रजी हद्दींत न येण्या बद्दल सरकार तजवीज करणार असें ठरलें आहे

ठा. अ.

## नाग, नरसे, व जिवत्या

आह्मी विक्री करितां नाग, नरसे, जिवत्या, व पिठोरी किंवा पठोरा हीं चित्रें ठेविलीं आहेत. चित्रें फारच सुरेख व पहिल्या चित्रा पेक्षां ह्यांत फरक करून व किंमतही कमी करून उत्तम प्रकारची छापलीं आहेत. ज्यांना पाहिजे असतील त्यांनीं खालील पत्यावर पैसे पाठविले असतां सदहू चित्रांचे कागद पाठवून देऊं. किंवा व्हाल्यूपेबलनें पाठवूं. चित्राचा दर शेकडा ११ रुपया प्रमाणें पडेल.

बाळकृष्ण अनंत कंपाझिटर

वऱ्हाडसमाचार छापखाना अकोला

### कवाइतीचें पुस्तक

फारच उपयुक्त; हुकमाचे शब्द मराठींत व इंग्रजींत ( उच्चारासह ) जेथल्या तेथें सुरेख चित्रें. उत्तम अभिप्राय वऱ्हाड शाळा खात्यानें पसंत केलेलें किंमत ०१०

गोविंद भास्कर ओक

वाशिम, वऱ्हाड.

### उत्तम सोय

आह्मी हिंदुस्थानांतील सर्व लोकांकरितां [ व्यापारी अथवा खासगत ] सोलापूर येथें सुती व रेशमी लुगडीं, खणाळी, संत्र्याच्या ( कच्चे व पक्के रंगाच्या ) खाद्या, धोंगड्या, नाना तऱ्हेच्या, ठाना क्लाथ व येथील गिरणींत तयार होणारें सर्व प्रकारचें कापड तसेंच कर्नाटक व मद्रास इलाख्यांतील उपरणीं रुमाल धोतरजोडे साधे व रेशमी व जरीचे रोख पैशानें अगर व्ही. पी. रीतीनें माफक कमिशन घेऊन ताबडतोब रवाना करूं.

आमचे तंबाखूचे कारखान्यांत मुंबई, पुणें व कल्याण येथील नमुन्याप्रमाणें उंची मध्यम व मिश्र विड्या तयार होत असतात भाव किरकोळ व ठोक असे दोन आहेत. समक्ष अगर पोस्टपेड पत्रद्वारा चौकशी आह्मापाशी करावी.

केशवराव साटये

सदर बाजार, सोलापूर

☞ हें आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.